नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २३३ * * अकोला * रविवार, दिनांक १६ फेब्रुवारी २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)




## आपचे ३ नगरसेवक भाजपमध्ये सामील

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १५ :**

विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर, भाजप आता दिल्ली महानगरपालिकेत देखील सरकार स्थापन करू शकते. शनिवारी आम आदमी पक्षाचे तीन नगरसेवक भाजपमध्ये सामील झाले.

भाजपमध्ये सामील झालेल्यांमध्ये अँड्र्यूज गंज येथील नगरसेवक अनिता बसोया, आरके पुरम येथील नगरसेवक धर्मवीर आणि छपराणा येथील नगरसेवक निखिल यांचा समावेश आहे. भाजप अध्यक्ष वीरेंद्र सचदेवा यांनी त्यांना पक्षात प्रवेश दिला. याशिवाय ४ आप नेतेही भाजपमध्ये सामील झाले. संदीप बसोया त्यांच्या समर्थकांसह भाजपमध्ये सामील झाले. ते नवी दिल्लीत आपचे जिल्हाध्यक्ष राहिले आहेत.

## थोडक्यात

### महाकुंभात पुन्हा आग



■ **प्रयागराज :** शनिवारी महाकुंभात पुन्हा आग लागली. रुग्णवाहिका आणि अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी रवाना झाल्या. जत्रेत प्रचंड गर्दी असल्याने वाहनांना घटनास्थळी पोहोचण्यास अडचण येत आहे.

आगीत अनेक तंबू जळाले आहेत. अग्निशमन दल आग आटोक्यात आणण्यात व्यस्त आहे. गर्दीला घटनास्थळावरून हटवण्यात आले आहे.

यापूर्वी १९ जानेवारी, ३० जानेवारी, ७ फेब्रुवारी आणि १५ फेब्रुवारी अशी चार वेळा महाकुंभात आग लागली.

### माजी आमदार सुरेश जेथलिया यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

■ **मुंबई :** विधानसभा निवडणुकीत बंडखोरी केल्याने हकालपट्टीची कारवाई करण्यात आलेले जालना जिल्ह्यातील काँग्रेसचे माजी आमदार सुरेश जेथलिया यांनी शनिवारी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पक्षाने परतूर येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत जेथलिया यांनी राष्ट्रवादीचा झेंडा हातात घेतला.

### लग्न वरातीत घोड्यावरच नवरदेवाचा मृत्यू

■ **श्योपूर :** घोड्यावर बसलेल्या वराचा अचानक मृत्यू झाला. तो लग्नाच्या मिरवणुकीसह वधूच्या घरी पोहोचला. तिथे पारंपारिक स्वागतानंतर, त्याने दारावर तोरण मारले. मग तो डीजेच्या तालावर नाचू लागला. जेव्हा तो पुन्हा घोड्यावर बसला, तेव्हा काही वेळाने तो बेशुद्ध पडला. त्याची प्रकृती गंभीर झाली. त्याला रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची शक्यता आहे.

## लाडकी बहीण योजनेचा इतर योजनांवर परिणाम?

# अर्थखात्याची खर्चाला कात्री!

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १५ :**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा परिणाम राज्यातील इतर योजनांवर होत असल्याचे दिसत आहे. राज्याच्या अर्थखात्याने विविध खात्यांना एकूण वार्षिक तरतुदीच्या फक्त ७० टक्केच निधी खर्च करण्याच्या सूचना दिल्या आहेत, त्यामुळे अनेक योजनांवर आर्थिक मर्यादा येऊ शकतात. परिणामी, अर्थखात्याने नव्या मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

महाराष्ट्राच्या वित्त विभागाने २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे सुधारित अंदाजपत्रक निश्चित केले आहे. त्यानुसार राज्यातील विविध विभागांना निधी खर्चाच्या मर्यादा घालून देण्यात आल्या आहेत. यामध्ये काही विभागांना १०० टक्के निधी खर्च करण्याची मुभा असेल, तर काही विभागांसाठी खर्च मर्यादित करण्यात आला आहे.



निवृत्ती वेतन, शिष्यवृत्ती आणि विद्यावेतन, सहायक अनुदानित वेतन, कर्ज रक्कम आणि कर्ज परतफेड, अंतरलेखा हस्तांतर या विभागांना १००% निधी खर्च करता येणार आहे.

दुसरीकडे, बक्षीसे, विदेश प्रवास खर्च, प्रकाशने आणि संगणक खर्च, जनहितार्थ खर्च, लहान बांधकामे आणि सहाय्यक अनुदाने, मोटार वाहने आणि यंत्रसामग्री, मोठी बांधकामे आणि गुंतवणूक यासाठी मर्यादित खर्च करावा लागणार आहे. जर या विभागांना अधिक निधी आवश्यक असेल, तर १८ फेब्रुवारीपूर्वी निवेदन सादर करावे लागतील, अशी सूचना अर्थखात्याने दिली आहे.

या आर्थिक धोरणाचा परिणाम राज्यातील शेतकऱ्यांवरही होत असल्याचे बोलले जात आहे. ठिबक सिंचन योजनेसाठी मिळणारे अनुदान गेल्या वर्षभरापासून थांबले असून, शेतकऱ्यांना कृषी कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत.

माजी आमदार बच्चू कडू यांनी सरकारवर निशाणा साधत म्हटले की, लाडकी बहीण योजना बहिणींसाठी नाही, तर सत्तेसाठी होती. राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनीही टीका करताना लाडकी बहीण योजनेतून अनेक महिलांना वगळले जात आहे, त्यामुळे सरकारचा खरा हेतू काय आहे? असा सवाल केला आहे.

विरोधकांच्या मते, लाडकी बहीण योजनेसाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च केला जात आहे, त्यामुळे इतर विकासकामांना आणि कृषी योजनांना आर्थिक फटका बसत आहे. अनेक महत्वाच्या योजना रखडल्या असून, राज्यातील सामान्य नागरिक आणि शेतकरी याला फटका बसत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

दुसरीकडे, राज्य सरकारने यावर स्पष्टीकरण देणे आवश्यक असल्याचे बोलले जात आहे. लाडकी बहीण योजनेसाठी इतर योजनांवर आर्थिक बंधने घालण्यात आली आहेत का? हे सरकारला स्पष्ट करावे लागणार आहे. तथापि, राज्याच्या तिजोरीवरील वाढता बोजा लक्षात घेता, वित्त विभागाने आर्थिक मर्यादा घातल्या आहेत.

## तहव्वूर राणासाठी तुरुंग तयार

■ **वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. १४ :**



मुंबई हल्ल्याचा सूत्रधार तहव्वुर राणा याला ठेवण्यासाठी राज्यातील तुरुंग पूर्णपणे सुरक्षित असल्याचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. जर आपण अजमल कसाबला ठेवले असेल तर त्यात काय मोठी गोष्ट आहे. राणालाही तुरुंगात ठेवता येईल, असेही ते म्हणाले.

राणाला भारतात आणण्यासाठी यापूर्वीही प्रयत्न करण्यात आले होते. भारताने ऑनलाइन चौकशी केली आणि अमेरिकेला सर्व संबंधित पुरावे दिले. पण अमेरिका त्याला पाठवायला तयार नव्हती. आता पंतप्रधान मोदींच्या पुढाकारानंतर अमेरिकेने सहमती दर्शवल्याचे त्यांनी सांगितले.

२५ जानेवारी रोजी, अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने भारत-अमेरिका प्रत्यार्पण करारांतर्गत राणाच्या प्रत्यार्पणाला मान्यता दिली. तहव्वुर राणा यांना २००९ मध्ये एफबीआयने अटक केली होती. पाकिस्तानी वंशाचा कॅनेडियन नागरिक राणा सध्या लॉस एंजेलिसच्या डिटेंशन सेंटरमध्ये आहे.

१३ फेब्रुवारी रोजी, पंतप्रधान मोदींनी त्यांच्या अमेरिका दौऱ्यादरम्यान वॉशिंग्टनमध्ये राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेतली. ट्रम्प यांनी दहशतवादी तहव्वुर राणाच्या प्रत्यार्पणाबद्दलही वक्तव्य केले होते. लवकरच राणाला अमेरिकेतून भारतात आणले जाईल.

तहव्वुर राणा भारतात परतल्यानंतर मुंबई हल्ल्यातील शहीदांना खरी श्रद्धांजली मिळेल, पंतप्रधान मोदी यांच्यामुळे कुख्यात राणाला अमेरिकेने भारताच्या ताब्यात दिले आहे. देशातील जनता याची वाट पाहत होती. देशाची दीर्घ प्रतीक्षा संपली आहे. मुंबई हल्ल्याच्या सूत्रधाराला आता शिक्षा होणार आहे. यामुळे मुंबई हल्ल्यांना न्याय मिळेल, असे मुख्यमंत्री फडणवीस माध्यमांशी बोलताना म्हणाले.

## नवीन आयकर विधेयक
## ३१ सदस्यीय समिती स्थापन

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १४ :**

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी शुक्रवारी नवीन आयकर विधेयकासाठी ३१ सदस्यांची निवड समिती स्थापन केली. भाजप खासदार आणि ओडिशातील केंद्रपाडा येथील खासदार बैजयंत पांडा यांना अध्यक्ष बनवण्यात आले आहे. समितीला पुढील सत्राच्या पहिल्या दिवशी अहवाल सादर करावा लागेल.

चालू अर्थसंकल्पीय अधिवेशन ४ एप्रिल रोजी संपेल. पावसाळी अधिवेशन जुलैच्या तिस?या किंवा चौथ्या आठवड्यात सुरू होऊ शकते. समितीच्या सदस्यांमध्ये निशिकांत दुबे, जगदीश शेट्टर, पीपी चौधरी, सुधीर गुप्ता, नवीन जिंदाल, अनिल बलुनी, दीपेंद्र हुड्डा, महुआ मोइत्रा, सुप्रिया सुळे इत्यादींचा समावेश आहे.

ही समिती नवीन आयकर विधेयकावर आपल्या शिफारसी देईल, त्यानंतर सरकार मंत्रिमंडळामार्फत निर्णय घेईल की या सुधारणांचा समावेश करायचा आहे की नाही. त्यानंतर हे विधेयक संसदेत परत येईल आणि त्यानंतर सरकार त्याच्या अंमलबजावणीची तारीख ठरवेल.

## ७३ लाख लोकांचे स्नान

■ **वृत्तसंस्था**
**प्रयागराज, दि. १४ :**

शनिवार हा महाकुंभाचा ३४ वा दिवस होता. वीकेंड असल्याने गर्दी जास्त होती. शहरातील रस्ते जाम झाले आहेत. दुपारी १२ वाजेपर्यंत ७३.७५ लाख लोकांनी संगममध्ये स्नान केले.

३३ दिवसांत ५० कोटींहून अधिक भाविकांनी संगमात स्नान केले. ही इतिहासातील सर्वात मोठी घटना होती. ४५ दिवस चालणाऱ्या महाकुंभाला अजून १२ दिवस शिल्लक आहेत.

आज, सुमारे १५ हजार स्वच्छता कर्मचाऱ्यांद्वारे एकाच वेळी घाट स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यापूर्वी, २०१९ मध्ये कुंभमेळ्यादरम्यान १०,००० स्वच्छता कर्मचाऱ्यांनी स्वच्छता केली होती.

आज, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री चिराग पासवान, वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल, शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, त्रिपुराचे माजी मुख्यमंत्री बिप्लब कुमार देव यांच्यासह अनेक नेते आणि मंत्री महाकुंभात स्नान केले.

तत्पूर्वी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी लखनऊमध्ये एक बैठक घेतली. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः रस्त्यावर यावे आणि प्रत्येक स्तरावर जबाबदारी सुनिश्चित करावी, प्रयागराज महाकुंभाकडे जाणाऱ्या रस्त्यांवर कुठेही वाहतूक कोंडी होऊ नये, असे स्पष्ट निर्देश योगी आदित्यनाथ यांनी दिले.

## व्होल्वो ट्रक्सकडून पहिले रोड ट्रेन सोल्यूशन लाँच



केंद्रीय मंत्री गडकरी यांच्या हस्ते ध्वजवंदन

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १५ :**

रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी नागपुरात भारतातील पहिल्या रोड ट्रेनला हिरवा झेंडा दाखवला. व्होल्वो ट्रकने विकसित केलेले आणि दिल्लीवेरी लि. द्वारे संचालित, हे वाहन लांब पल्ल्याची वाहतुक आणि लॉजिस्टिक्स उद्योगातील कार्यक्षमता वाढवण्यासाठी उपयुक्त आहे.

२०२० मध्ये रोड ट्रेनची संकल्पना नियमांमध्ये समाविष्ट करण्यात आली होती, ज्यामुळे वाहनांची लांबी २५.२५ मीटरपर्यंत होती. रोड ट्रेनमध्ये ट्रॅक्टर युनिट दोन किंवा अधिक ट्रेलर टोइंग करतात, ज्यामुळे मालवाहू क्षमता लक्षणीय वाढते. कठोर चाचण्या यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर, रोड ट्रेनला नागपूर आणि भिवंडीच्या दिल्ली केंद्रांदरम्यान चालवण्यासाठी प्रमाणित केले आहे.

रोड ट्रेन इलेक्ट्रॉनिक ब्रेकिंग सिस्टम आणि इलेक्ट्रॉनिक स्थिरता कार्यक्रम, ३६० डिग्री कॅमेरा सिस्टीम, ट्रेलरवरील सेल्फ-स्टीरेबल एक्सल, डॅशबोर्ड लोड मॉनिटर, डाउनहिल क्रूझ कंट्रोल, स्ट्रेच ब्रेक टू कंट्रोल आणि स्ट्रेच ब्रेक यासह प्रगत सुरक्षा वैशिष्ट्यांसह सुसज्ज आहे.

व्हीई कमर्शिअल व्हेइकल्स लिमिटेडचे विनोद अग्रवाल म्हणाले, व्होल्वो एफएम ४२० ४२ रोड ट्रेन ही भारतीय बाजारपेठेसाठी व्होल्वो ट्रक्सची आणखी एक अग्रगण्य ओळख आहे. भारतीय बाजारपेठेतील रस्ते वाहतुकीची कार्यक्षमता आणि किफायतशीरता वाढवण्यासाठी डिझाइन केलेली आहे आणि ती भारतीय सरकारी वाहतुकीत परिपूर्णपणे बदलते. गती शक्ती मास्टर प्लॅन. व्होल्वो ट्रक्स इंडिया अशा प्रकारच्या प्रगतीला चॅम्पियन केल्याबद्दल नितीन गडकरी आणि एआरएआय यांचे आभारी असल्याचे सांगत भारतात आणखी जागतिक नवकल्पना आणण्यासाठी वचनबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दिल्लीवरी येथील सह-संस्थापक आणि मुख्य जनसंपर्क अधिकारी सूरज सहारन म्हणाले, व्हॉल्वो ट्रक्ससोबतची आमची भागीदारी अधिक मजबूत करण्यास उत्सुक आहोत कारण आम्ही उच्च-कार्यक्षमतेकडे, लांब पल्ल्याच्या लॉजिस्टिक्सकडे पुढे जात आहोत. ट्रॅक्टर-ट्रेलर्सचा अवलंब करण्यापासून ते इलेक्ट्रिक ट्रक्सपर्यंत, आमच्या पुढच्या प्रवासात योग्य मार्गासाठी व्हॉल्वो हे महत्त्वाचे साधन आहे. भारताच्या एक्स्प्रेसवे नेटवर्कचा वेगाने विस्तार होत असल्याने, नजीकच्या भविष्यात अधिक मार्गांवर या नावीन्यपूर्णतेचा विस्तार करण्यास उत्सुक आहोत.

## नामांकित कंपन्यांच्या नावाने तेलाची विक्री

### गोदामावर पोलिसांची धाड, साडेआठ लाखांचा माल जप्त

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १५ :**

अदानी विल्मर आणि अंबूजा एक्सपोर्टच्या नावाने लोकल तेलाची विक्री करणाऱ्या व्यावसायिकावर गुन्हे शाखा युनिट ४ च्या पथकाने धाड टाकली. गोदामाच्या झडतीत रिकाम्या पिप्यांवर वरील कंपनींचे स्टिकर चिपकवून त्यात लोकल तेल भरल्यानंतर बाजारात विक्री केल्या जात असल्याचे आढळले.

पोलिसांनी या प्रकरणी अनूप संभाजी कोळप (४८) रा. मुंबईच्या तक्रारीवरून व्यावसायिकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. नीलेश दिलीप शाहू (३४) असे आरोपी व्यावसायिकाचे नाव आहे.

अनूप हे मुंबईत अदानी विल्मर आणि गुजरातच्या अंबूजा एक्सपोर्ट लिमिटेड कंपनीसाठी तपास अधिकारी म्हणून काम करतात. त्यांना अदानीच्या फॉर्च्यून सोयाबीन ऑईल आणि अंबूजा गोल्ड रिफाइंड ऑईलच्या नावाने बनावट तेलाची बाजारात विक्री केल्या जात असल्याची माहिती मिळाली होती. त्यांनी गुन्हे शाखेकडे तक्रार केली.

पोलिस उपायुक्त राहुल माकणीकर आणि सहायक पोलिस आयुक्त अभिजीत पाटील यांच्या मार्गदर्शनात युनिट ४ च्या पथकाने अनूप यांच्यासोबत मिळून आऊटर रिंगरोडवरील ममता कॉलनीतील गोदामावर धाड टाकली. आरोपी नीलेश शाहू कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून पिप्यांमध्ये लोकल तेल भरताना दिसला. त्याने फॉर्च्यून आणि अंबूजाच्या नावाने पिप्यांवर हुबेहुब स्टिकरही चिपकवले होते. पोलिसांनी पॅकिंग मशीर, पट्टी, भरलेले २८ पिपे, मोटर पंप, तेलाचे ड्रम आणि चारचाकी मालवाहूसह ७ लाख रुपयांचा माल जप्त केला. चौकशीत नीलेशने चार दुकानदारांची नावे सांगितली, ज्यांना त्याने मालाचा पुरवठा केला होता.

## दाढीवाल्यांना हलक्यात घेऊ नका..

■ **वृत्तसंस्था, रत्नागिरी, दि. १४ :**



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या वतीने राज्यभरात आभार मेळावा आयोजित केला जात आहे. आज हा मेळावा कोकणातील रत्नागिरीत पार पडला.

विधानसभा निवडणुकीत दिलेल्या आशीवार्दामुळे मी तुमच्यासमोर नतमस्तक व्हायला आलो आहे, शिवसेनेच्या विजयामध्ये कोकणचा सिंहाचा वाटा आहे. एकही आमदार निवडून येणार नाही असे म्हणणाऱ्यांची बोलती महाराष्ट्राने बंद केली, अशा शब्दांत ठाकरे गटाला टोला लगावला.

कोण एकनाथ शिंदे, कोण रामदास कदम असे म्हणायचे. आम्ही करून दाखवले. आम्हाला हलक्यात घेऊ नका. दाढीवाल्यांना हलक्यात घेऊ नका. किती शिव्या देणार, किती आरोप करणार. होती दाढी म्हणून उद्ध्वस्त झाली तुमची आघाडी, अशा शब्दात त्यांनी ठाकरे गटाला सुनावले.

## काँग्रेस देणार उद्धव ठाकरेंना मोठा झटका?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :**

विधान परिषदेमधील विरोधी पक्षनेते पदावरून काँग्रेस आणि शिवसेना (उबाठा) यांच्यात मतभेद उफाळण्याची शक्यता आहे. सध्या उद्धव ठाकरे गटाचे अंबादास दानवे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते आहेत, परंतु त्यांची मुदत येत्या ऑगस्टमध्ये संपणार आहे.

विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते पदासाठी काँग्रेसने दावा सांगण्याची तयारी सुरू केली आहे. सध्या काँग्रेसकडे विधान परिषदेत सर्वाधिक आठ सदस्य आहेत, तर ठाकरे गटाकडे सात आणि शरद पवार गटाकडे दोन सदस्य आहेत. त्यामुळे संख्याबळाच्या आधारे काँग्रेसने हे पद मागितले आहे. परिणामी, काँग्रेस आणि उबाठामध्ये वादंग होण्याचे संकेत आहेत.

## हिट्स ऑफ समीर अंजान कार्यक्रम सूपर हिट

### खासदार ज्येष्ठ नागरिक सांस्कृतिक महोत्सवाचे अभिनेते जितेंद्र यांच्या हस्ते उद्घाटन

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :**

ज्येष्ठ नागरिकांच्या आयुष्यात अधिक आनंद पसरावा, त्यांचे आयुष्य सुखी समाधानी व्हावे, त्यांच्यात सकारात्मकता वाढावी या दृष्टिकोनातून गेल्या तीन वर्षापासून ज्येष्ठ नागरिक सांस्कृतिक महोत्सव आयोजित करण्यात येत आहे. ज्येष्ठ नागरिकांना सहलीचा आनंद घेता यावा यासाठी चार इलेक्ट्रिक बसेसची व्यवस्था तसेच अल्पदरात वैद्यकीय व्यवस्था व सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे, निःशुल्क सभागृह व ऑरगॅनिक फ्रुट बाजार याची ज्येष्ठ नागरिकांसाठी सोय करण्यात येत असल्याची माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी खासदार ज्येष्ठ नागरिक सांस्कृतिक महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी दिली.

या महोत्सवाचे उद्घाटन बॉलीवूड अभिनेते व जम्पिंग जॅक म्हणून प्रसिद्ध असलेले सुप्रसिद्ध अभिनेते जितेंद्र यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नेते दत्ता मेघे, डॉक्टर संजय उगेमुगे, अशोक मानकर, हाजी शकील सैफी, प्रताप सिंग चव्हाण, डॉक्टर विलास डांगरे उपस्थित होते.



### तरी मी पूर्णपणे महाराष्ट्रीयन...

मी जरी अमृतसरला जन्मलो तरी माझ्या आयुष्याची पहिली १८ वर्ष मी गिरगावात काढली. तिथे मला जे प्रेम, आनंद मिळाला तो आनंद प्रसिद्धी झोतात आल्यानंतर मोठ्या मोठ्या गोष्टीतून मिळाला नाही. व्हि. शांताराम यांनी मला पहिला ब्रेक दिला तो मी पंजाबी असूनही माझ्या मराठी बोलण्याने. माझी नाळ मराठी माणसाशी नेहमीसाठी जोडली गेली आहे. असे ते उद्घाटनपर भाषणात म्हणाले. मराठीत बोलण्याच्या आग्रहाने त्यांनी मराठीत काढलेले हे भावोद्गार रसिकांच्या मनाला भिडले.

घुंगट की आड से दिलबर का, छूकर मेरे मन को किया तूने क्या इशारा, परदेसी परदेसी जाना नही यासारखी सुपरहिट ठरलेली गीते प्रसारित होण्यापूर्वी कधी त्यातील शब्दरचनेने तर कधी त्याच्या लईने रद्दबादल झाली होती. पण मी दाखवलेल्या आत्मविश्वासातून ती गाणी जेव्हा प्रसारित झाली तेव्हा त्या गाण्यांनी इतिहास रचला. अशा आपल्या लेखणीतून अजरामर झालेल्या गीतांच्या किस्सा वजा कहाण्या गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड करणाऱ्या गीतकार समीर अंजान यांनी हिट्स ऑफ समीर अंजान या कार्यक्रमात कथित केल्या.

कार्यक्रमाची सुरुवात कुंभमेळ्यातील शाही स्नानाला समर्पित मानू तो मै गंगा मा हू, ना मानो तो बहेता पाणी हू या गीताने झाली. त्यानंतर आपल्या अजरामर गीतांच्या पुस्तकाचे एक एक पान उलटवीत हलक्या फुलक्या शेरोशायरी व गीतांमागील रंजक कथा व किस्से सांगत त्यांनी श्रोत्यांना खिळवून ठेवले.

७० ते ९० च्या दशकातील त्यांच्या सुपरहिट गाण्यांपैकी शंभर वर्षांच्या इतिहासात समाविष्ट असलेले कुछ कुछ होता है हे सदाबहार गीत सादर झाले. तेरी उम्मीद तेरा इंतजार करता हू या गीतासाठी मजरूह सुलतानपूरी यांच्याकडून फिल्मफेअर अवॉर्ड मिळाला ही माझ्यासाठी भाग्यची गोष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. अनेक आठवणींना त्यांनी उजाळा दिला.



# राज्यात लव्ह जिहाद विरोधात कायदा येणार

## पोलिस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती गठीत



■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६ :

राज्यात लव्ह जिहादच्या विरोधात कायदा करण्यात येणार आहे. लव्ह जिहादच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर फसवणूक व बळाचा वापर करून केलेले धर्मांतरण रोखण्यासाठी कायदा करण्यात येणार आहे. यासाठी राज्य सरकारने पोलिस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष समिती गठीत केली आहे. तसेच महाराष्ट्रात हा कायदा लागू झाल्यावर महाराष्ट्र हे देशातील दहावे राज्य असणार आहे.

पोलिस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेली समिती राज्यातील सध्याच्या परिस्थितीचा अभ्यास करून लव्ह जिहाद, फसवणूक आणि बळाचा वापर करून केलेले धर्मांतरण यावर उपाययोजना सुचवून कायद्याचा मसुदा तयार करणार आहे. देशात आत्तापर्यंत उत्तर प्रदेश, हरियाणा, हिमाचल प्रदेश, गुजरात, झारखंड, मध्यप्रदेश, उत्तराखंड, ओडिसा आणि छत्तीसगड या नऊ राज्यांनी लव्ह जिहादविरोधी कायदा आणला आहे. या धर्तीवर महाराष्ट्रातही लव्ह जिहाद कायदा लागू करण्याची मागणी भाजपाचे नेते आणि मंत्री नीतेश राणे यांच्यासह राज्यातील विविध हिंदू संघटनांनी केली होती.

धर्मांतराच्या तक्रारीनंतर देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री असताना या विरोधात कायदा करण्याची ग्वाही विधानसभेत दिली होती. त्यानुसार राज्य सरकारने पोलिस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष समिती गठीत केली आहे. या समितीत महिला व बालकल्याण विभागाचे सचिव, अल्पसंख्यांक विकास विभागाचे सचिव, विधी व न्याय विभागाचे सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव, गृहविभागाचे सचिव तसेच गृह विभागाचे (विधी) सचिव हे सदस्य असतील.

# राज्य सरकारच्या संचालक मंडळावर बिर्ला, महिंद्रा, अंबानी, किर्लोस्करांसह ७ उद्योजक

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :

राज्यात उद्योजकतेला चालना देण्यासाठी राज्य सरकारने महा हब इन्क्युबेटर आणि इनोव्हेशन सेंटर उभारण्याचा निर्णय घेतला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे जिल्ह्यात हे सेंटर उभारण्यात येणार आहे. त्यासाठी संचालक मंडळ नियुक्त करण्यात आले आहे. राज्य सरकारच्या संचालक मंडळावर प्रसिद्ध उद्योजक बिर्ला, महिंद्रा, अंबानी, किर्लोस्कर यांच्यासह ७ उद्योजक आणि ६ प्रशासकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागाचे उपसचिव सुदाम आंधळे यांनी शासन निर्णय काढला आहे.

राज्यातील युवा पिढीला स्टार्टअप स्थापन करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळावे तसेच राज्यात रोजगारनिर्मितीला चालना मिळावी या हेतूने राज्यात महा हब इनोव्हेशन आणि इन्क्युबेटर सेंटर उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. राज्यातील युवा पिढीला स्टार्टअप स्थापन करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळावे तसेच राज्यात रोजगारनिर्मितीला चालना मिळावी या हेतूने राज्यात महा हब इनोव्हेशन आणि इन्क्युबेटर सेंटर उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे.

ना नफा ना तोटा या सूत्रानुसार उद्योजकांना प्रभावी व्यासपीठ उपलब्ध केले आहे. १५ ऑक्टोबर २०२४ संचालक मंडळाची विहित रचना करण्यात आली. मात्र त्यावर आक्षेप नोंदवण्यात आल्याने सुधारित रचना करण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यानुसार महा हब इन्क्युबेटर आणि इनोव्हेशन सेंटरचे संचालक मंडळ स्थापन केले असून त्यात उद्योगपतींसह प्रशासकीय अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

या महा हब इनोव्हेशन आणि इन्क्युबेटर सेंटरचा



सर्व उद्योजकांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

राज्य सरकारच्या महा हब इन्क्युबेटर आणि इनोव्हेशन सेंटरच्या संचालक मंडळावर १३ सदस्य असून आदित्य बिर्ला ग्रुपच्या कुमारमंगलम बिर्ला यांची अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे, तर महिंद्रा ग्रुपचे आनंद महिंद्रा, जियो प्लॅटफॉर्म लिमिटेडचे अनंत अंबानी, कल्याणी ग्रुपचे संस्थापक बाबा कल्याणी, टोयोटा किर्लोस्कर मोटार ग्रुपच्या उपाध्यक्षा मानसी किर्लोस्कर, चैतन्य ॲग्रोबायोटेक लि.चे संचालक प्रसन्न देशपांडे, कोटक महिंद्रा बँकेचे संस्थापक जय कोटक या ७ उद्योगपतींसह माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ नितीन गुप्ते, मुंबई आयआयटीचे प्रतिनिधी, एनएलयूचे प्रतिनिधी, मुंबई आयआयएमचे प्रतिनिधी, एसआयडीबीआय प्रतिनिधींची सदस्यपदी निवड केली आहे. माहिती व विभागाचे प्रधान सचिव पदसिद्ध संचालक असणार आहेत.

# लाडक्या बहिणींची घरी जाऊन होणार पडताळणी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :

राज्यातील महायुती सरकारने आपल्या महत्त्वकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांची पडताळणी सुरू केली आहे. या अंतर्गत लाभार्थी महिला या योजनेचे निकष पूर्ण करतात का? याची घरोघरी जाऊन छाननी केली जात आहे. त्यामुळे ही पडताळणी पूर्ण झाल्यानंतरच लाभार्थी महिलांना या योजनेचा फेब्रुवारीचा हप्ता मिळणार असल्याचा दावा केला जात आहे.

महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहीण योजना सुरू केली होती. या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांना दरमहा 1500 रुपयांचे अर्थसहाय्य केले जाते. यामुळे अनेक निराधार महिलांना हक्काची मदत मिळाली आहे. पण यात अनेक खोटे लाभार्थीही आढळून येत आहेत. या पार्श्वभूमीवर सरकारने या योजनेतील लाभार्थ्यांची पडताळणी सुरू केली आहे. या अंतर्गत पात्र महिलांच्या घरी चारचाकी वाहन आहे का? किंवा त्या या योजनेतील पूर्ण निकष पूर्ण करतात का? याची पडताळणी केली जाणार आहे. यामुळे ही पडताळणी पूर्ण होईपर्यंत महिलांना फेब्रुवारीचा हप्ता मिळणार नाही असे सांगितले जात आहे. या प्रकारामुळे महिला वर्गात चिंतेचे वातावरण पसरले आहे.

विशेष म्हणजे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे तब्बल 2 कोटी 59 लाख लाभार्थी आहेत. त्यांना दरमहा 3 हजार 885 कोटी रुपयांची रक्कम सरकारी तिजोरीतून दिली जात आहे. या योजनेतील हजारो महिलांना सरकारच्या इतरही योजनांचा लाभ मिळत आहे. यात संजय गांधी निराधार योजना व नमो शक्ती योजनेतील लाभार्थ्यांचाही समावेश आहे. पण आता या दोन्ही योजनांसह स्वतःहून लाडकी बहीण योजनेचा लाभ नाकारणाऱ्या महिलांचा आकडा 5 लाख 40 हजारांपर्यंत पोहोचला आहे.

विशेषतः पडताळणीत अनेक महिला या योजनेसाठी अपात्र ठरल्या जाण्याची शक्यता आहे. यामुळे हा आकडा आणखी काही लाखांत पोहोचण्याची शक्यता आहे. सरकार या पडताळणीसाठी अंगनवाडी सेविकांची मदत घेत आहे. त्यांना या योजनेतील लाभार्थी महिलांच्या नावांची यादी दिली गेली आहे. त्याचा पडताळणी अहवाल पुढील 8 दिवसांत शासनाला सादर होईल. त्यानंतर फेब्रुवारीचा हप्ता वितरित केला जाईल. या सर्व प्रक्रियेसाठी मार्च महिना उजाडण्याची शक्यता आहे. या पडताळणीमुळे सरकारने मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेचा लाभ थांबवल्याचेही सांगितले जात आहे.

दुसरीकडे, लाडकी बहीण योजनेवर अमाप खर्च होत असल्यामुळे सरकारच्या विविध विभागांच्या खर्चाला कात्री लावण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्याच्या वित्त विभागाचा सन 2024-25 चे सुधारित अंदाजपत्रकावरून ही बाब स्पष्ट झाली आहे. या अंदाजपत्रकात सरकारी विभागांनी किती निधी खर्च करावा याचे अनुमान घालून देण्यात आले आहे. एकूण वार्षिक तरतुदीच्या 70 टक्के निधीच खर्च करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्यात. या 70 टक्क्यांपैकी निवृत्ती वेतन, शिष्यवृत्ती व विद्यावेतन, सहाय्यक अनुदानित वेतन, कर्ज व कर्जाची परतफेड, अंतरलेखा हस्तांतरे या विभागांना 100 टक्के निधी खर्च करण्याची मुभा देण्यात आली आहे.

# शक्तिपीठ महामार्ग विरोधात शेतकऱ्यांचे आंदोलन होणार तीव्र

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६ :

शक्तिपीठ महामार्गाविरोधात शेतकऱ्यांनी आता निर्णायक लढा उभारण्याचा निर्णय घेतला आहे. या महामार्गामुळे शेतकऱ्यांचे, पर्यावरणाचे आणि करदात्यांचे मोठे नुकसान होणार असल्याचा आरोप करत २० फेब्रुवारी रोजी कोल्हापुरातील शाहू स्मारक भवन येथे राज्यव्यापी बैठक होणार आहे.

ही बैठक विधान परिषद गटनेते आमदार सतेज पाटील आणि संघर्ष समितीचे समन्वयक गिरीश फोंडे यांच्या नेतृत्वाखाली होणार असून, यात बारा जिल्ह्यांतील महामार्ग बाधित शेतकरी सहभागी होणार आहेत.

महायुती सरकारने शपथविधीनंतर १०० दिवसांच्या प्राथमिक कामांच्या यादीत शक्तिपीठ महामार्ग समाविष्ट केला आहे. त्यामुळे शेतकरी संघटनांनी आंदोलनाची तीव्रता वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. गिरीश फोंडे यांनी सांगितले की, या महामार्गाच्या संदर्भात कोणतेही अधिकृत सर्क्युलर, नोटिफिकेशन किंवा पेपर सरकारकडून प्रसिद्ध करण्यात आलेला नाही. तरीदेखील सरकार खोट्या प्रचाराचा आधार घेत हा महामार्ग जबरदस्तीने लादण्याचा प्रयत्न करत आहे.

शक्तिपीठ महामार्गाविरोधात गेल्या वर्षभरात १२ पैकी १० जिल्ह्यांत शेतकऱ्यांनी तीव्र आंदोलन केले आहे. मात्र, सरकारने वस्तुस्थितीचा विपर्यास करत या महामार्गाला फक्त कोल्हापुरातून विरोध आहे, असा दावा केला. याला प्रत्युत्तर म्हणून २४ जानेवारी रोजी १० जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांनी राज्यव्यापी धरणे आंदोलन केले. पण तरीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नांदेडमधील भाषणात महामार्गाला सर्व आमदारांनी पाठिंबा दिला आहे, असे चुकीचे वक्तव्य केल्याचा आरोप शेतकरी संघटनांनी केला आहे.

शेतकऱ्यांचा दावा आहे की, शक्तिपीठ महामार्गामुळे लाखो कोटींचे नुकसान होणार असून, आधीच अस्तित्वात असलेल्या महामार्गाचे रुंदीकरण करून तो विकसित करता आला असता. मात्र, फडणवीस सरकार कंत्राटदारांच्या फायद्यासाठी हा प्रकल्प जबरदस्तीने रेटत आहे. आता शेतकऱ्यांनी आरपारची लढाई लढण्याचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर २० फेब्रुवारी रोजी कोल्हापुरात राज्यव्यापी बैठक आयोजित केली असून, तेथून आंदोलनाचे रणशिंग फुंकले जाणार आहे. या बैठकीस बारा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार असून, पुढील आंदोलनात्मक कार्यक्रम ठरवला जाणार आहे.

# शिवजयंती सोहळ्याचा आरंभ

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. १६ :

छत्रपती शिवाजी महाराज का श्रेष्ठ आहेत?.. तर त्यांनी उपास-तापास न करता किंवा कुठलाही आव आणून कर्मकांड न करता कमार्लाच देव मानले. ते सत्कमार्मुळे सर्वश्रेष्ठ बनले. त्यामुळे संपत्ती सोबतच दयाभाव ज्यांच्याकडे होता, तेच छत्रपती होते, असे शिवगुणगाण महाराष्ट्रातले गाजलेले विनोदी किर्तनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदुरीकर यांनी करुन, बुलढाणा येथील छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या शिव जयंती सोहळ्याचा आरंभ दणक्यात केला. छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने शिवजयंती सोहळ्याचा आरंभ शुक्रवार १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी शिवनेरी जिजामाता क्रीडा व व्यापारी संकुल मैदानात ह.भ.प. इंदुरीकर महाराज यांच्या शिवकीर्तनाने झाला.

या शिवकीर्तनासाठी जवळपास १५ हजार शिवप्रेमींचा जनसागर उसळला होता सर्वप्रथम छत्रपती शिवरायांच्या मुर्तीचे पुजन व दिपप्रज्वलन कार्यक्रमाचे उद्घाटक धर्मवीर आमदार संजय गायकवाड व कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवसाई पतसंस्थेचे मार्गदर्शक नेत्रतज्ञ डॉ.वसंतराव चिंचोले, दौलतराव नरवाडे यांच्यासह आयोजक शिवजयंती समितीचे अध्यक्ष राजेंद्र काळे, सचिव उमेश शर्मा, प्रमुख पाहुणे ॲड. दिनोदे, माजी अध्यक्ष रणजीतसिंह राजपूत, गोपालसिंग राजपूत आदिंची उपस्थिती होती.

# दुचाकी चोरट्याकडून २५ दुचाकी जप्त

■ महासागर प्रतिनिधी पुणे, दि. १६ :

वाहन चोरीचे ५० हून जास्त गुन्हे दाखल असलेल्या चोरट्याला गुन्हे शाखेने अटक केली. चोरट्याकडून २५ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहे. पाच महिन्यांपूर्वी दुचाकी चोरीच्या गुन्ह्यात जामीन मिळवल्यानंतर चोरट्याने पुन्हा दुचाकी चोरीचे गुन्हे करण्यास सुरुवात केली. शंकर भरत देवकुळे (वय ३२, रा. मेमाणे वस्ती, ऊरुळी देवाची, सासवड रस्ता) असे अटक करण्यात आलेल्या चोरट्याचे नाव आहे. पर्वती भागातून एक दुचाकी चोरीला गेली होती. गुन्हे शाखेच्या युनिट तीनचे पोलीस कर्मचारी ज्ञानेश्वर चित्ते तपास करत होते. पर्वती भागातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासण्यात आले. तेव्हा दुचाकी चोरीचा गुन्हा देवकुळेने केल्याची माहिती तपासात मिळाली. त्यानंतर पोलिसांनी तपास करुन त्याला इचलकरंजी परिसरातून ताब्यात घेतले. चौकशीत तो पाच महिन्यांपूर्वी जामीन मिळवून कारागृहात बाहेर पडला होता.

पुणे शहर, परिसरातून दुचाकी चोरी केल्यानंतर तो वाहन क्रमांकाच्या पाट्या काढून टाकायचा. त्यानंतर दुचाकी त्याचा ओळखीचा गॅरेज मालक अनिकेत सुनील कुदळे (वय २७, रा. खडकी, ता. दौंड) याला नेऊन द्यायचा. कुदळे त्याच्या गॅरेजमधून जुन्या दुचाकींची विक्री करायचा. वित्तीय संस्थेचे हप्ते थकल्याने दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत, अशी बतावणी कुदळे करायचे. देवकुळेने तुळजापूरमधील मित्राकडे दुचाकी ठेवण्यास दिल्या होत्या. त्याच्याकडून दोन दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. त्याच्याकडून २५ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.

# न्यू इंडिया सहकारी बँकेवर आरबीआयने लादले निर्बंध

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६ :




भारतीय रिझर्व्ह बँकेने न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह (सहकारी) बँकेवर सहा महिन्यांसाठी आर्थिक निर्बंध लागू केले. याची माहिती मिळताच बँकेतून पैसे काढण्यासाठी व्यापारी आणि ठेवीदारांनी बँकेबाहेर एकच गर्दी उसळली होती. त्यांना पैसे मिळणार नाहीत, असे सांगून परत पाठवण्यात आले. आमचे पैसे कधी मिळणार ? अशीच चिंता प्रत्येकाच्या चेहऱ्यावर पसरली होती. दर महिन्याचा घरखर्च, शाळेची फी, औषधी, ईएमआयचा खर्च कसा करायचा, असाच सवाल हजारो ग्राहकांनी अश्रूंना वाट करून देत उपस्थित केला.

न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेच्या कामकाजात अनियमितता आढळून आली आहे. बँकेला २०२३ आणि २०२४ या दोन वर्षांत सुमारे ५३ कोटींचा तोटा आला आहे. म्हणून आरबीआयने गुरुवार, १३ फेब्रुवारी २०२५ पासून निर्बंध लागू केले. म्हणून शुक्रवारी सकाळी आठ वाजेपासूनच हजारो ठेवीदारांनी बँकेच्या मुंबईतील शाखेबाहेर मोठी गर्दी केली होती.

बँकेकडून कोणतीही माहिती दिली जात नसल्याने कर्मचाऱ्यांवर प्रश्नाचा भडिमार करीत संताप व्यक्त केला. अखेर त्यांना लॉकरमधील दागिने वस्तू काढण्याची परवानगी देण्यात आली.

ठेवीदारांना क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशनकडून पाच लाख रुपयांपर्यंतचा दावा करता येईल, असे सांगण्यात आले. बँकेच्या मुंबईतील अंधेरी, बांद्रा, बोरिवली, चेंबूर, घाटकोपर, गिरगाव, गोरेगाव, नरिमन पॉइंट, कांदिवली, मालाड, मुलुंड, सांताक्रूज, वसोर्वा तर नवी मुंबईत नेरूळ आणि ठाणे जिल्ह्यात मीरा रोड, माजिवडे पाचपाखाडी, पालघर जिल्ह्यात वसई-विरारमध्ये, पुण्यात बिबवेवाडी येथे शाखा आहेत. आर्थिक वर्ष २०२३ मध्ये बँकेला तब्बल ३० कोटी ७५ लाख रुपयांचा तोटा झाला होता, तर आर्थिक वर्ष २०२४ मध्ये बँकेला २२ कोटी ७८ लाख रुपयांचा तोटा झाला आहे.

# तुळजापूर भवानी मंदिराच्या जिर्णोद्धारासाठी पंधरा दिवसांत बैठक

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६ :

तुळजापूरच्या आई भवानी माता मंदिराच्या जिर्णोद्धारासह रायगड किल्ल्याचा विकास आणि एक पडदा चित्रपटगृहांसाठी सवलतीच्या योजनेबाबत लवकरच ठोस निर्णय घेतला जाणार आहे. यासंबंधी सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. पुढील १५ दिवसांत या तिन्ही विषयांवर स्वतंत्र बैठक घेण्यात येणार आहे.

तुळजापूरच्या भवानी माता मंदिराचा संरचनात्मक अहवाल (स्ट्रक्चरल ऑडिट) शासनास सोमवारी सादर केला जाणार आहे. मंदिराच्या दुरुस्तीचे काम करणाऱ्या दोन एजन्सींमध्ये समन्वय साधून काम वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश मंत्री शेलार यांनी दिले.

मंदिराच्या मुख्य गर्भगृहातील खांबांना तडे गेल्याने दैनंदिन पूजा, मूर्तीची देखभाल यावर काय परिणाम होईल, याबाबत अभ्यासक, पुजारी, मंदिर ट्रस्ट आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी बैठक घेऊन उपाय सुचवावेत, असे निर्देशही त्यांनी दिले. पुढील १५ दिवसांत सर्व संबंधितांशी चर्चा करून पुढील कार्यवाही ठरवली जाईल. रायगड विकास प्राधिकरणाने ६०० कोटी रुपयांचा कृती आराखडा तयार केला आहे. रायगड किल्ला आणि परिसराचा विकास करण्यासाठी या आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले असून याचा अभ्यास करून लवकरच संयुक्त बैठक घेण्यात येणार आहे. या बैठकीत रायगड प्राधिकरण, स्थानिक जिल्हाधिकारी, केंद्रीय आणि राज्य पुरातत्व विभागाचे अधिकारी सहभागी होणार आहेत.

राज्यातील १२०० एक पडदा चित्रपटगृहांपैकी फक्त ४७५ सुरू असून उर्वरित बंद पडली आहेत. ही चित्रपटगृहे पुन्हा सुरू करून मराठी चित्रपटांसाठी त्यांचा वापर करण्यासाठी सवलतीच्या योजनेचा मसुदा तयार करण्याचे आदेश मंत्री शेलार यांनी दिले. या योजनेबाबत चित्रपटसृष्टीतील तज्ज्ञ, थिएटर मालक आणि संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन पुढील १५ दिवसांत निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. मराठी सिनेसृष्टीच्या विकासासाठी सरकार सकारात्मक असून लवकरच या योजनेची अंमलबजावणी केली.

# इंधन बचतीतून शाश्वत विकासाला चालना : मंत्री आदिती तटकरे

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६ :



सौर ऊर्जा आणि इंधन बचतीचा व्यापक उपयोग केल्यास देशाच्या ऊर्जा सुरक्षेला मदत होईल, पर्यावरणाचे संरक्षण होईल आणि शाश्वत विकासाला चालना मिळेल, असा विश्वास महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केला. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संरक्षण क्षमता महोत्सव (सक्षम २०२४-२५) च्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

१४ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारीदरम्यान सक्षम २०२४-२५ हा जनजागृतीपर उपक्रम राबवण्यात येणार आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे झालेल्या उद्घाटन सोहळ्यात प्रमुख उद्योग आणि सरकारी अधिकाऱ्यांसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी रंगमंच समूहाच्या पथनाट्यातून इंधन बचतीचा संदेश देण्यात आला. तसेच, इंधन बचतीसाठी उपस्थितांनी सामूहिक प्रतिज्ञा घेतली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केंद्र सरकारने २०२५ पर्यंत इंधनात २० टक्के इथेनॉल मिश्रणाचे लक्ष्य ठेवले असल्याचे सांगितले. यामुळे जीवाश्म इंधनाचा वापर कमी होईल आणि पर्यावरणपूरक ऊर्जेचा मार्ग मोकळा होईल. इंधन बचतीसाठी छोट्या गोष्टी महत्त्वाच्याः घरगुती गॅस आणि वीजेचा कार्यक्षम वापर,इमारतींवर सौर पॅनेलचा उपयोग, सिग्नलला गाडी बंद करणे यासारख्या छोट्या सवयींमधून इंधन बचतीला चालना देता येईल आणि शाश्वत विकास साधता येईल, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात भारत पेट्रोलियम, हिंदुस्थान पेट्रोलियम, इंडियन ऑईल आणि GAIL इंडिया लिमिटेडच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला.

या उपक्रमांमधून इंधन कार्यक्षम तंत्रज्ञान आणि पद्धतींचा अवलंब करण्यास प्रवृत्त करण्यावर भर दिला जाणार आहे, असे कुलकर्णी यांनी सांगितले. या महोत्सवाच्या निमित्ताने राज्यभरात इंधन बचतीबाबत जनजागृती होणार असून, इंधनाच्या कार्यक्षम वापराने शाश्वत विकासाचे उद्दिष्ट गाठता येईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# व्हॉईस ऑफ मीडिया महिला प्रदेश कार्यकारिणी निवडणूक राज्यभरात उत्साहात



## प्रदेश अध्यक्ष म्हणून नाशिकच्या मारवाडी, यवतमाळच्या चंद्रे यांना पसंती, कार्याध्यक्ष पदावर शेलार, धोंडगे यांची निवड

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६ :

व्हॉईस ऑफ मीडिया या पत्रकारांच्या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या महिला प्रदेशाध्यक्ष पदासाठी निवडणूक संपन्न झाली असून नाशिकच्या रश्मी मारवाडी या सर्वाधिक मते घेऊन प्रदेशाध्यक्ष पदासाठी निवडून आल्या आहेत. दुसऱ्या क्रमांकाची मते मिळवून सविता चंद्रे उमरखेड यवतमाळ या प्रदेशाध्यक्ष ग्रामीण या पदासाठी दावेदार ठरल्या आहेत. पुण्याच्या स्वाती धोंडगे आणि सातारा येथील प्रतिभा शेलार या कार्याध्यक्ष म्हणून निवडून आल्या आहेत. स्वाती धोडगे,सविता चंद्रे,रश्मी मारवाडी,प्रतिभा शेलार,या चार महिला उमेदवारांनी या निवडणुकीत सहभाग नोंदवला होता. महाराष्ट्रातील महिला सदस्यांनी गुरुवार दिनांक १३ फेब्रुवारी रोजी आपला मतदानाचा हक्क बजावला. शुक्रवारी सायं. पाच वाजता पसंती क्रमानुसार मतमोजणी करून निकाल जाहीर करण्यात आला.

ॲड. संजीव कुमार कलकोरी यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम केले.राष्ट्रीय, राज्य प्रदेश कार्यकारिणीने नवनिर्वाचित महिला पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून संघटनात्मक बांधणीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

सर्व प्रकारच्या पत्रकारांचे मजबूत संघटन म्हणून व्हॉइस ऑफ मीडिया आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करीत असून मुद्रित माध्यमासोबत डिजिटल, इलेक्ट्रॉनिक, साप्ताहिक, रेडिओ, यु ट्यूब, महिला विंग अशा विविध शाखा कार्यरत आहेत. या सर्व शाखाचा कारभार पाहण्यासाठी लोकशाही पद्धतीने कारभारी निवडण्याची प्रथा व्हॉइस ऑफ मीडियाने स्थापनपासून जपली असून त्याच प्रथेचा एक भाग म्हणून महिला प्रदेश कार्यकारिणीसाठी निवडणुक घेण्यात आली होती. पत्रकारितेत महिलांचा सहभाग वाढवणे,महिला पत्रकारांच्या समस्या शासन दरबारी पाठपुरावा करून सोडवणे, त्यांचे हक्क यासाठी संघटन कौशल्य पणाला लावून कामकाज करणे या ध्येय धोरणावर व्हॉइस ऑफ मीडियाची महिला प्रदेश विंग कार्यरत आहे.ही निवडणूक पार पडल्यानंतर लवकरच नूतन कार्यकारिणी पदभार स्वीकारून उर्वरित प्रदेश कार्यकारिणी जाहीर करून महिला जिल्हा अध्यक्षांची निवड करणार आहे.

# हॉटेलच्या बिलावरून तरुणाची हत्या

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १६ :

पुण्यातील वाघोली परिसरातील कटकेवाडी येथे एका हॉटेलमधील बिलावरून झालेल्या वादातून एका कंटेनर चालकाने दुसऱ्या चालकाला कंटेनरखाली चिरडून ठार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. नांदेड येथील परमेश्वर बालाजी देवराये (३५) या व्यक्तीचा मृत्यू झाला असून, रांजणगाव येथील राम दत्ता पुरी (२५) याला पोलिसांनी अटक केली आहे.

घटनेची माहिती अशी की, परमेश्वर देवराये आणि राम पुरी हे दोघेही कंटेनर चालक असून, त्यांच्यात हॉटेलमध्ये जेवणाच्या बिलावरून वाद झाला. देवराये यांनी बिल न भरल्याने राग आल्याने पुरी याच्या गालावर चापट मारली. या प्रसंगाचा राग मनात धरून पुरी याने आपला कंटेनर (एमएच १२ डब्ल्यूएक्स ८३०७) भरधाव वेगाने देवराये यांच्या दिशेने चालवला. त्याने देवराये यांना धडक दिली आणि त्यांच्या अंगावरून कंटेनर फिरवून निर्दयपणे ठार केले.

घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. आरोपी राम पुरी याला अटक करून न्यायालयात हजर केले असता त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या प्रकरणी खेड तालुक्यातील कडाची वाडी येथील रामचंद्र शिवराम पोले (४४) यांनी वाघोली पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून पोलीस उपनिरीक्षक वैजनाथ केदार पुढील तपास करत आहेत.

## शेततळे खारपाणपट्ट्यातील शेतीसाठी वरदानः अर्ज करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**अकोला :** खारपाणपट्ट्यातील शेतीसाठी शेततळे वरदान ठरू शकते. मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेत शेततळ्यांसाठी चांगले अनुदान मिळते.त्यामुळे अकोला जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतक-यांनी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी केले आहे.



जिल्ह्यातील बहुतांश शेती पावसावर अवलंबून असलेली कोरडवाहू शेती आहे. विविध भागातील पावसाचे असमान वितरण व पावसातील अनिश्चित खंड यासारख्या नैसर्गिक आपत्तीही अनेकदा उद्भवतात. सिंचनाअभावी पीकाचे उत्पादन घटते. अनेकदा पाण्याअभावी पीके नष्टही होतात. जेव्हा मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो तेव्हा झरे, ओढे, नाले, नदीद्वारे वाहून जाते, अशा पाण्याची शेततळ्यात साठवणूक शक्य आहे. त्यामुळे शेती उत्पादनात व शेतक-यांच्या उत्पन्नात वाढ होते. शेतक-यांनी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हाधिका-यांनी केले.वैयक्तिक शेतकरी या घटकात १५ बाय १५ बाय ३ मी. आकारमान असल्यास २३ हजार ८८१ रू, २० बाय २० बाय ३ मी. आकारमान असल्यास ४३ हजार ६७८ रू, २५ बाय २५ बाय ३ मी. आकार असल्यास ७० हजार ४५५ रू व ३० बाय ३० बाय ३ मी. आकारमान असलेल्या शेततळ्यासाठी ७५ हजार रू अनुदान मिळते. शेतक-यांनी mahadot.maharashtra. gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. अर्जदाराच्या नावावर ०.६० हेक्टर क्षेत्र असावे. क्षेत्राबाबत कमाल मर्यादा नाही. काही अडचण किंवा माहिती हवी असल्यास कृषी सहायक, तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# स्व.बिडकर हे विविध क्षेत्रांचे जाणकार व कार्यशील नेतृत्व





## ▪राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून श्रद्धांजली

▪**अकोला,दि.१५ (प्रतिनिधी):** विदर्भ वैधानिक विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष तथा मुर्तीजापूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार स्व. तुकाराम बिडकर हे विविध क्षेत्रांचे जाणकार व विकासासाठी कार्यशील नेतृत्व होते. त्यांच्या जाण्याने मोठी हानी झाली असल्याची भावना राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज येथे व्यक्त केली.उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी स्व. बिडकर यांच्या अकोला येथील रामनगर परिसरातील निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या कुटुंबीयांची विचारपूस केली व सांत्वन केले. खासदार सुनील तटकरे, आमदार किरण सरनाईक, आमदार विक्रम काळे, आमदार अमोल मिटकरी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.स्व. बिडकर यांचे सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक, क्रीडा क्षेत्रात मोठे कार्य आहे. ते अष्टपैलू व्यक्तिमत्व, लोकांच्या सुखदुःखाशी समरस होणारे सच्चे लोकनेते होते. ते सामाजिक प्रश्नांची जाण असलेले व विकासासाठी कार्यशील नेतृत्व होते, अशी भावना उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी यावेळी व्यक्त केली.



▪**कृषिमंत्र्यांच्या विरोधात निषेध आंदोलन :** शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या वतीने कृषीमंत्री माणिकराव कोकाटे त्यांनी शेतकऱ्यांच्या पिक विमा संदर्भात केलेल्या वक्तव्याचे निषेध आंदोलन केले यावेळी त्यांच्या प्रतिमेला जोडेमारो व काळी शाई लावून निषेध केला यावेळी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अकोल्यात तरुणाची धारदार शस्त्राने भोसकून हत्या

## ▪कुख्यात गुन्हेराला पोलिसांनी केली अटक

▪**अकोला,दि.१५ (प्रतिनिधी):** अकोटफैल पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका युवकाची चाकूने वार करून हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याच्या शुल्लक कारणावरून कुख्यात गुंडाने युवकावर हल्ला केला. हल्ला करून पसार होण्याच्या बेतात असलेल्या आरोपीला अकोटफैल पोलिसांनी रेल्वेस्थानक परिसरातून अटक केली आहे. सौरभ दिलीप खोब्रागडे (२७) रा. पिंपळफैलअकोला असे हत्या झालेल्या युवकाचे नाव असून, अंकुश रवींद्र कदम (३०) रा. भीम चौक अकोटफैल अकोला असे कुख्यात आरोपीचे नाव आहे. सौरभ हा जेवण झाल्यामुळे १३ फेब्रुवारी रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास पायी फिरण्यासाठी घराबाहेर पडला. त्यावेळी



त्याला रस्त्यात अडवून कुख्यात गुंड अंकुश कदम याने दारू पिण्यासाठी पैशांची मागणी केली. परंतु, खिशात पैसे नसल्याचे सांगताच संतापलेल्या आरोपी अंकुश कदम याने धारदार चाकूने अचानक सौरभ खोब्रागडे याच्यावर प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात वापरलेला चाकू सौरभच्या मानेत अडकला. गंभीर जखमी झाल्यामुळे सौरभ जागेवरच कोसळला. हे पाहून आरोपी अंकुश कदमने पळ काढला. दरम्यान, स्थानिक रहिवाशांनी धाव घेत जखमी अवस्थेतील सौरभला तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. उपचारादरम्यान १४ फेब्रुवारी रोजी दुपारी सौरभने शेवटचा श्वास घेतला. याप्रकरणी अकोटफैल पोलिसांनी आरोपी अंकुश कदम याच्या विरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. आरोपीला अटक करून न्यायालयात हजर केले

### तिरंदाजी स्पर्धेत पवन जाधव यांना कास्य पदक

**अकोला :** काटेपुर्णा वन्य जीव अभयारण्यातील वनपरिक्षेत्र अधिकारी पवन जाधव हे २८ जानेवारी ते १४ फ्रेब्रुवारी दरम्यान उत्तराखंडमध्ये झालेल्या ३८ व्या राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेत तिरंदाजी फेरीच्या सांघीक स्पर्धेत कास्य पदकाचे मानकरी ठरले आहेत.आपल्या शालेय जीवनात देखील पवन जाधव यांनी धनुरविद्या मध्ये विविध राष्ट्रीयस्पर्धांम ध्ये ६ सुवर्ण पदकासह १७ पदके मिळविली होती. गेल्या सलग तीन राष्ट्रीय वन क्रिडा स्पर्धांमध्येही ते सुवर्ण पदकाचे मानकरी ठरले होते. त्यांचे सहकाऱ्यांकडून अभिनंदन केल्या जात आहे.

## मुंडगाव येथील रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी सार्वजनिक बांधकाम उपविभाग अकोटचा दुजा भाव

**अकोट :** तालुक्यातील संत नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंडगाव येथील रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी गेल्यावर काही दिवसांपूर्वी सर्व रहिवाशांना नोटीस बजावण्यात आल्या होत्या परंतु मोबाईल टॉवर सुद्धा रस्त्यात असल्यावरही मोबाईल टॉवर काढण्यासाठी सार्वजनिक बांधकाम उपविभाग अकोटच्या उपविभागीय अधिकारी यांनी नोटीस बजावली नसल्याचे समजते. रस्त्यावर असलेले अतिक्रमण काढून रस्ता मोकळा करण्यात येणार असल्याचे नोटीस मध्ये उल्लेख केला परंतु संबंधित अकोट बांधकाम उपविभाग अकोटच्या उपविभागीय अधिकारी यांनी यावेळी पक्के घरे पाडली परंतु रस्त्यावर असलेल्या मोबाईल टॉवर सुद्धा काढण्यात यावा अशी मागणी सुद्धा येथील नागरिकांनी केली आहे.जेव्हा मोबाईल टॉवर चे अतिक्रमण काढल्या नाही तर आम्हा गरीबांच्या झोपड्या कशाला पाडता अशी मागणी सुद्धा येथील नागरिकांनी केली आहे. तसेच अतिक्रमण काढायचे असेल तर पुर्णपणे पणे काढा दुजा भाव कशाला करता सर्व प्रथम मुंडगाव येथील मोबाईल टॉवर रस्त्यावरुन हटवा त्या नंतरच घरे पाडा असे सुद्धा येथील नागरिक बोलत आहेत. तसेच अतिक्रमण काढायचे बाबतीत येथील काही नागरिकांनी संबंधित ठेकेदार व उपविभागीय अधिकारी यांना आदेश मागीतला परंतु संबंधितांनी कोणत्याही प्रकारचा आदेश दाखविला नाही व अतिक्रमण बंद करुन काढता पाय घेतला तेव्हा अकोट सार्वजनिक बांधकाम उपविभाग चे उपविभागीय अधिकारी हे मोबाईल टॉवर चे अतिक्रमण काढतात किंवा नाही या कडे येथील सुजाण नागरिकांचे लक्ष लागले आहे.व आता संबंधित अधिकारी केव्हा अतिक्रमण काढतात या कडे संपुर्ण गावाचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात

### हंगामपश्चात गुलाबी बोंड अळीचे व्यवस्थापन

**अकोला :** कापूस संशोधन विभाग डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ यांच्या वतीने कीटकनाशक प्रतिकारक क्षमता व्यवस्थापनः गुलाबी बोंड अळी व्यवस्थापन रणनीतीचा प्रसार या केंद्रशासन पुरस्कृत प्रकल्प अंतर्गत जिल्ह्यातील बाशीटाकळी तालुक्यातील जिन मिल यांना भेटी देऊन तेथील जिन मिल मालक व कर्मचारी यांना गुलाबी बोंड अळीच्या व्यवस्थापन व निरीक्षणासाठी करावयाच्या उपायोजना याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. तसेच कामगंध सापळे लाऊन गुलाबी बोंड अळी नियंत्रण याबद्दल माहिती देण्यात आली. या कार्यक्रमांमध्ये वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ व कीटक शास्त्रज्ञ यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन सहाय्यक मंगेश खाडे आणि प्रकल्प सहाय्यक श्रीकांत सरप यांनी जीन मिल मालक व तेथील कर्मचारी यांना मार्गदर्शन केले.

### प्लास्टिक पिशव्यांचा वापर वाढला

**अकोला :** शहरात प्लास्टिक पिशव्यांचा वाढता पर्यावरणाच्यादृष्टीने चिंतेचा विषय बनला आहे. प्लास्टिक बंदी असतानाही अनेक ठिकाणी सर्रासपणे प्लास्टिक पिशव्या वापरल्या जात आहेत. त्यामुळे कचऱ्याचे प्रमाण वाढून नाल्या तुंबण्याचे प्रमाण वाढले आहे. शहरातील मुख्य बाजारपेठ, जनता बाजार तसेच रस्त्यावर विक्रेत्यांकडून मोठ्या प्रमाणात प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर होत आहे. काही दुकानदार कागदी पिशव्यांचा वापर करत असले तरी अनेक ठिकाणी प्लास्टिकचा सर्रास वापर सुरू आहे.

### ओक हॉल मार्गावर देखील तयार कापडाच्या हातगाड्या

**अकोला :** मोकळी जागा दिसली की थाटा दुकान असे चित्र सध्या अकोला शहरात पहावयास मिळत आहे. आपटे लॉज ते खुलेनाट्यगृह हा मार्ग फळ विक्रेत्यांनी बळकावला आहे. खुले नाट्यगृह ते शहर कोतवाली. गांधी चौक हा मार्ग तयार कापडाच्या विक्री करणाऱ्या विक्रेत्यांनी बळकावला आहे. महानगर पालिकेच्या कंपाऊंड वॉलला लागुनच कापडाच्या हातगाड्या सर्रासपणे रोज दृष्टीस पडतात. त्यामुळे या मार्गावर वाहतुकीची कोंडी ही नित्याचीच बाब झाली आहे.नागरिकांना होत असलेला त्रास कमी आहे म्हणून की काय खुले नाट्य गृहापासून बस स्थानक मार्गावर दोन्ही बाजुने आता तयार कापडाच्या हातगाड्या लागल्या आहेत. खुले नाट्य गृह ते प्रमिलाताई ओक हॉल मार्ग या मार्गावर व्यवसायीकांनी आपले व्यवसाय थाटले आहे. दिवसेंदिवस बकाल शहर म्हणून अकोला शहराची गणना होऊ लागली आहे.दुर्देवाची बाब ही कोणालाही सर्वसामान्य नागरीकांना होत असलेल्या त्रासाबाबत काही घेणे देणे नसल्याचे दिसून येत आहे.

## संत गाडगेबाबा चौकातील अशोभनीय व अपघातास कारणीभूत ठरणाऱ्या मटन व्यवसाईकांचे दुकाने स्थलांतरीत करण्याची मागणी

▪**मुर्तिजापुर,दि.१४ (प्रतिनिधी):** उपविभागीय उपविभागीय अधिकारी साहेब व नगरपरिषद मुख्याधिकारी साहेब नगरपरिषद मुर्तीजापुर यांना गाडगेबाबा स्मारक समि ती अध्यक्ष राहुल भाऊ तिडके यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले आहे की निष्काम कर्मयोगी श्रीसंत वैराग्य मुर्ती गाडगेबाबा यांनी आपल्या संपुर्ण आयुष्यात पशु प्राण्यांच्या हत्तेचा विरोध केला. ऐवढेच नव्हे तर पशू पक्षांना अभय देवून आपल्या दशसुत्रीत स्थान देवून प्राणी मात्रांवर दयेचा आणि संगोपनाचा आग्रह धरला. असे असतांत नगर परिषद मुर्तिजापुरनेच अकोला नाका येथिल चौकाला श्रीसंत गाडगेबाबा चौक हे नाव देवून श्रीसंत गाडगेबाबाप्रती आपली जणु श्रध्दाच जपली या कार्याचे संत गाडगेबाबा स्मारक समिती मुर्तिजापुर, प्रतिक नगर आणि वृंदावन नगरवाशियांबरोबरच मुर्तिजापुरातील संत गाडगेबाबा यांच्या अनुयायांनी व विचार प्रेमींसह अनेकांनी नगर परिषदेचे कौतुक करुन अभिनंदन केले,तर संत गाडगेबाबा कर्मभूमी सेवा प्रतिष्ठान



ने आभार ही मानले. परंतू ज्या गाडगेबाबांनी पशू हत्तेचा व बळी प्रथेचा विरोध केला. त्याच विचारांची भर चौकात हत्या करुन कोंबड्या-बोकडांचे मटन विक्री केली जाते. सदर मटन व चिकन व्यवसायिकांबद्दल त्यांच्या मटन विक्रीस कुठलीच मनाई नाही पण या चोका व्यतिरिक्त ईतरत्र कुठे ही हालवावे.

## शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची बैठक संपन्न

▪**अकोला,दि.१५ (प्रतिनिधी):** शिवसेना उपनेते आमदार नितीन बापू देशमुख यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनात शिवसेनेची आढावा बैठक स्थानिक सर्किट हाऊस अकोला येथे संपन्न झाली. बैठकीमध्ये जिल्ह्याम ध्ये होऊ घातलेल्या जिल्हा परिषद,पंचायत समि ती, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपचायत तथा अकोला महानगरपालिका निवडणुका डोळ्यावर समोर ठेवून पक्ष बांधणीच्या कामाला सुरुवात करण्यात यावी.

सर्व प्रकारची मरगड बाजूला झटकून आपल्यातील खरा शिवसैनिक जागृत ठेवा. जेपक्ष सोडून गेले असतील त्यांचा कधीच विचार करू नका,गेले ते कावळे राहिले ते मावळे,असे आव्हान आमदार नितीन बापू देशमुख यांनी केले.सध्याचे सरकार शेतकऱ्यांच्या व सामान्य माणसांच्या कोणत्याही समस्या सोडवू शकत नाही, ते त्यांचं अपयश झाकण्या साठी हिंदुत्वचा वापर करत आहेत. जनतेनेच्या



डोळ्यात धूळ फ्रेकून राहिले आहेत. जनतेच्या समस्या आहेत त्या घेऊन आपण लोकमध्ये जाऊन जागृती करून यासाठी आंदोलन उभे करावे. जनतेच्या मनामध्ये सरकार विषयी असंतोष निर्माण होत आहे.त्याचा फायदा घ्यावा, त्या दृष्टीने जनतेचे प्रश्न घेऊन प्रत्येक तालुक्यात आंदोलन उभे केले पाहिजे. असे आवाहन यावेळी करण्यात आले. एवढेच नाही भाजप सरकारने सत्तेवर येताना शेतकऱ्यांना कर्जमाफीची घोषणा केली ही कर्जमाफी येत्या बजेट अधिवेशनात झाली नाही तर... अमरावती विभागातून हजारो शेतकऱ्यांना घेऊन मुंबई येथे विधानभवनावर ट्रॅक्टर मार्च काढु. त्याचे नियोजन सुद्धा आतापासूनच सुरु करण्यात यावे.

## प्रभातच्या विद्यार्थ्यांची डॉ. होमीभाभा बालवैज्ञानिक स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीमध्ये निवड



▪**अकोला,दि.१५ (प्रतिनिधी):** मुंबई सायन्स टिचर असोसिएशन, मुंबई तर्फे दरवर्षी घेण्यात येर्णाया डॉ. होमीभाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत प्रभात किड्स स्कूलचे विद्यार्थी घवघवीत यश संपादन करतात. यावर्षी देखील प्रभातच्या पाच बालवैज्ञानिकांची डॉ. होमीभाभा बालवैज्ञानिक स्पर्धेच्या तिर्सया फेरीसाठी निवड झालेली आहे. यामध्ये इयत्ता सहावीचा अर्जून जायभाये, नववीमधून प्रणिल नावकार, शुभ पटेल, शरयु राऊत व आर्या राठी हे पाच बालवैज्ञानिक तिसऱ्या फेरीसाठी पात्र ठरलेले आहेत.या सर्व बालवैज्ञानिकांना प्रभात स्पर्धा परिक्षा विभागप्रमुख व्ही. अनुराधा यांच्या मार्गदर्शनाखाली विज्ञान विभागप्रमुख मीता इंगळे, अमित जोशी, आनंद पदमन या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.प्रभातचे संचालक डॉ. गजानन नारे, संचालिका सौ. वंदना नारे, सचिव निरज आवंडेकर, प्राचार्य वृषाली वाघमारे उपप्राचार्य अर्चना बेलसरे, समन्वयक मो. आसिफ यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून तिर्सया फेरीसाठी शुभेच्छा दिल्या.

### धावत्या गाडीतुन उतरण्याच्या प्रयत्नात एक जखमी

▪**अकोला,दि.१५ (प्रतिनिधी):** धावत्या गाडीतुन उतरण्याच्या प्रयत्नात एक युवक जखमी झाल्याची घटना काल रोजी मुर्तिजापूर या ठिकाणी घडली आहे. या घटनेत गंभीर जखमी झालेल्या मनोज शरद खंडारे याला उपचारासाठी ईवन हॉस्पीटल अमरावती या ठिकाणी भरती करण्यात आले आहे. अमरावती- मुंबई एक्सप्रेसला मुर्तिजापूर या ठिकाणी थांबा नाही. परंतू मुर्तिजापूर स्थानकावर या गाडीचा वेग कमी झाल्यामुळे गाडीतून उतरण्याचा प्रयत्न खंडारे यांनी केला आणि त्यात तो जखमी झाला. त्याला तातडीने अगोदर मुर्तिजापूर येथील लक्ष्मीबाई देशमुख हॉस्पीटलमध्ये भरती करण्यात आले होते. परंतू प्रकृती गंभीर असल्या मुळे त्याला पुढील उपचारासाठी ईवन हॉस्पीटल या ठिकाणी रवाना करण्यात आले आहे.

## आज डॉ. हेडगेवार रुग्णालयात मोफत रोग निदान शिबीर

- शहरातील नामांकित डॉक्टरांची उपस्थिती
- शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन

▪**अकोला,दि.१५ (प्रतिनिधी):** डॉ. हेडगेवार रुग्णालय व अनुसंधान केंद्र हे धर्मदाय रुग्णालय असून या ठिकाणी येणाऱ्या सर्व रुग्णांना माफक दरात सुविधा उपलब्ध असतात. रुग्णालयाच्या वतीने विविध समाजसेवी उपक्रम नित्य चालत असतात त्याचाच एक भाग म्हणून डॉ. हेडगेवार रुग्णालय व अनुसंधान केंद्रच्या वतीने आज रविवार दि. १६.०२.२०२५ रोजी सकाळी १० ते ०१ वा. मुखर्जी बंगला, राऊत वाडी, अकोला येथे मोफत रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिराला अकोला शहरातील नामांकित मेडिसीन डॉ. तुषार चरखा, त्वचा रोग तज्ञ डॉ. भरत पटोकार, डॉ. चिन्मय पराडकर, डॉ. अनुप्रिता चौहान, स्त्री रोग तज्ञ डॉ. अमृता टापरे, बालरोग तज्ञ डॉ. अनुप चौधरी, डॉ. अभिजीत नालट, आर्थो रोग तज्ञ डॉ. प्रकाश मेटांगे, डॉ. दर्शन तातीया उपस्थित राहणार आहेत.

या शिबिरात हृदय व फुफ्फुसाच्या व्याधीचे निदान, विविध त्वचा रोगाचे निदान, स्त्री रोगाचे तसेच पीएपी स्मियरचे निदान, लहान मुलांच्या विविध आजारांचे निदान, सोबतच संधिवात, गुडघे दुखी, पाठदुखी, टाचदुखी, फ्रॅक्चर, मानदुखी, हाताला किंवा पायाला मुंग्या येणे, बधिर होणे, ठिसुळ हाड किंवा अन्य हाडांच्या रोगांचे निदान करण्यात येणार आहे. सोबतच प्रथम २५ येणार्या रुग्णांची ईसीजी आणि शुगर टेस्ट, आर्थो रु.१०००/- ची बीएमडी हाडांची ठिसुळता तपासणी मोफत करण्यात येईल. रुग्णांनी ९०२१४८२७५४ या क्रमांकावर नोंदणी करून शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन रुग्णालयाचे अध्यक्ष बाबासाहेब पाठक, प्रकल्प प्रमुख डॉ विनायक देशमुख यांनी केले आहे.

# मोहल्ला क्लिनिंग: उड्डाण दुसरा टप्पा, हद्दवाढ भागात

▪**अकोला,दि.१५ (प्रतिनिधी):** नवीन वर्षाच्या सुरुवातीसोबतच सामाजिक जाणीवेतून एक महत्त्वाचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.ॲड. धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्प आणि नीलेश देव मित्र मंडळाच्या वतीने दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी 'मोहल्ला क्लिनिंग अभियान' राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या अभियानाची सुरुवात १९ जानेवारी रोजी झाली असून, आता दुसरा टप्पा १६ फेब्रुवारी रोजी हद्दवाढ भागात राबविण्यात येणार आहे.

**अकोल्याची स्वच्छतेकडे वाटचाल**

कधीकाळी अकोला शहर 'स्वच्छ आणि सुंदर शहर' म्हणून ओळखले जात होते. नगराध्यक्ष विनयकुमार पाराशर यांच्या कार्यकाळात शहरातील स्वच्छता उल्लेखनीय



होती. अनेक महापालिकांचे अधिकारी आणि लोकप्रतिनिधी अकोल्याचा अभ्यास करण्यासाठी येथे येत असत. मात्र, काळाच्या ओघात या ओळखीवर ग्रहण लागले असून, शहर दररोज हजारो टन कचरा आणि प्लास्टिक प्रदूषणाचा सामना करत आहे.

**हद्दवाढ भागातील स्वच्छता आणि स्मशानभूमींची अवस्था**

हद्दवाढ भागात चार स्मशानभूमी आहेत, त्यापैकी खडकी येथील स्मशानभूमी व्यवस्थित आहे, परंतु उर्वरित तीन स्म शानभूमींची स्थिती अत्यंत दयनीय आहे. स्थानिक रहिवाशांना सहभागी करून खरप, गुढधी, आणि मलाकापूर भागातील स्म शानभूमींचे मोजमाप, अतिक्रमण आणि नागरिकांशी संवाद साधून त्यांचा विकास आवश्यक आहे. सध्या या भागांमध्ये सात हद्दवाढ झाल्या असून स्वच्छतेची स्थिती अत्यंत बिकट आहे.

**वाहतूक समस्या आणि दफनभूमीचा पर्याय**

नवीन तापडिया नगर, खरप, डुंबेवाडी आणि पंचशील नगर येथे जाण्यासाठी मुख्य मार्ग म्हणून तापडिया उड्डाणपूल आहे, परंतु सध्या तो केवळ दुचाकींसाठी खुला आहे. या भागातील नागरिकांना दुःखद प्रसंगी उमरी स्मशानभूमीपर्यंत मोठा प्रवास करावा लागतो. जर खरप येथील स्मशानभूमी व्यवस्थित विकसित केली असती आणि स्थानिक नागरिकांचा सहभाग घेतला असता, तर हा पर्याय अधिक सोयीस्कर ठरला असता. त्यामुळे मोहल्ला क्लिनिंग अभियानाच्या माध्यमातून या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे.

आवाहन:मोहल्ला क्लिनिंग अभियानात पर्यावरणप्रेमी नागरिक, सामाजिक आणि धार्मिक संस्थांनी सहभागी व्हावे आणि शहराच्या स्वच्छतेसाठी आपले योगदान द्यावे, असे आवाहन नीलेश देव मित्र मंडळाचे सामाजिक कार्यकर्ते नीलेश देव यांनी केले आहे.

## पश्चिम आकाशात १८ फेब्रुवारीपर्यंत तेजस्वी ग्रह शुक्र

▪**अकोला,दि.१५ (प्रतिनिधी):** सूर्यमालेतील सर्वात तेजस्वी म्हणून ओळखल्या जाणारा आणि सध्या पश्चिम आकाशात अधिराज्य गाजवणारा शुक्र ग्रह, कधी तारा म्हणून ओळखल्या जायचा. सध्या स्थितीत पृथ्वीच्या जवळ आल्याने त्याची तेजस्विता अधिकाधिक वाढलेली आहे. ही तेजस्विता १४ ते १८ फेब्रुवारीदरम्यान सर्वाधिक असल्याने शुक्र ग्रह पश्चिम आकाशात अधिक प्रकाशमान दिसेल. या खगोलीय घटनेचा आनंद घेण्याचे आवाहन विश्वभारतीचे प्रभाकर दोड यांनी केले आहे. शुक्र हा ग्रह पृथ्वी खालोखाल आकाराचा,सूर्यापासून क्रमांक दोनवर व पृथ्वी व सूर्य यांच्यात असल्याने या ग्रहाचा उदय व अस्त पूर्व वा पश्चिम क्षितिजावर होतो. म्हणून याला सायंकालीन किंवा प्रभात कालीन तारा समजून जुन्या काळी ग्रामीण भागातील लोक याच्या आकाश स्थिती वरून वेळ सुद्धा ठरवत असत. सुमारे ६५ टक्के सूर्यप्रकाश परावर्तित होत असल्याने हा एकमेव ग्रह भर दिवसा भर दुपारी, सूर्य असतांना आकाशात दिसू शकतो. अंधाऱ्या रात्री शुक्र प्रकाशात सावल्यासुद्धा पाहता येतात. अंतर्ग्रह असल्यामुळे एकशे तीस वर्षांत दोनदा सूर्य बिंबावरून अधिक्रमित होत असतो.

# विश्वासार्हतेच्या कसोटीवर काँग्रेस

डॉ. प्रवीण डबली
ज्येष्ठ पत्रकार, नागपूर
९४२२१२५६५६

भारताच्या राजकारणात काँग्रेस पक्षाने ऐतिहासिक आणि महत्त्वाची भूमिका बजावली आहे. स्वातंत्र्यलढ्यापासून ते आजपर्यंत, हा पक्ष सत्तेच्या शिखरावर पोहोचला आहे आणि संघर्षांमधूनही गेला आहे. पण सध्या काँग्रेसच्या विश्वासार्हतेबद्दल अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

याचे कारण म्हणजे एकेकाळी संपूर्ण देशावर राज्य करणारी काँग्रेस आता काही राज्यांपुरती मर्यादित आहे. ज्यामध्ये कर्नाटक, हिमाचल प्रदेश, केरळ हे प्रमुख आहेत. भाजप १७ राज्यांमध्ये सत्तेत आहे, तर त्यांचे मित्रपक्ष ६ राज्यांमध्ये सत्तेत आहेत. अशा परिस्थितीत काँग्रेसच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. काँग्रेस जनतेच्या विश्वासाला सार्थ ठरवू शकत नाही का, की त्यांचा पाठिंबा सतत कमकुवत होत चालला आहे?

**काँग्रेसची ऐतिहासिक विश्वासार्हता**

काँग्रेस पक्षाची स्थापना १८८५ मध्ये झाली आणि तिचे उद्दिष्ट भारताला ब्रिटिश राजवटीपासून मुक्त करणे होते. महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल आणि इतर नेत्यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले.

स्वातंत्र्यानंतर, पक्ष अनेक दशके सत्तेत राहिला आणि देशाच्या औद्योगिक, आर्थिक आणि सामाजिक विकासात योगदान दिले.

१९५० ते १९८० च्या दशकात काँग्रेसची विश्वासार्हता बरीच मजबूत होती. विकास आणि स्थिरतेचे प्रतीक मानले जात असल्याने जनतेचा या पक्षावर विश्वास होता. पण कालांतराने ते कमी होऊ लागले.

**विश्वासार्हतेवर शंका का ?**

गेल्या काही दशकांपासून काँग्रेसकडे प्रभावी नेतृत्वाचा अभाव आहे. इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांच्यानंतर काँग्रेसमध्ये करिष्माई नेतृत्व नव्हते. राहुल गांधी यांना पक्षाचा चेहरा बनवण्यात आले, परंतु ते जनता आणि कार्यकर्त्यांचा विश्वास जिंकण्यात पूर्णपणे यशस्वी होऊ शकले नाहीत. याचे उदाहरण सध्याच्या हरियाणा, महाराष्ट्र आणि दिल्लीच्या निवडणुकांमध्येही दिसून येते.

काँग्रेसमध्ये गटबाजी आणि अंतर्गत कलह वाढत आहेत. अनेक प्रमुख नेत्यांनी पक्ष सोडला आहे, ज्यामुळे पक्षाची विश्वासार्हता धोक्यात आली आहे.

काँग्रेसची धोरणे अनेकदा अस्पष्ट असतात. कधीकधी हा पक्ष धर्मनिरपेक्षतेची बाजू घेतो तर कधीकधी सरल हिंदुत्वाचा मार्ग स्वीकारण्याचा प्रयत्न करतो. या दुविधेमुळे जनतेमध्ये त्याची विश्वासार्हता कमी झाली आहे.

काँग्रेस पक्षात झालेल्या २जी घोटाळा, राष्ट्रकुल घोटाळा आणि कोळसा घोटाळा यासारख्या अनेक भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमुळे काँग्रेसच्या प्रतिमेला मोठे नुकसान झाले आहे. विरोधकांनी याला 'भ्रष्टाचाराची जननी' म्हटले, ज्यामुळे जनतेचा विश्वास कमकुवत झाला.

**घसरणारी लोकप्रियता**

प्रादेशिक पक्षांसोबत निवडणुका लढवून प्रादेशिक पक्षांचे वाढते महत्त्व काँग्रेसला जनतेपासून दूर करत आहे. २०१४ आणि २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसचा मोठा पराभव झाल्याने जनतेचा विश्वास सतत कमी होत असल्याचे सिद्ध झाले.

पक्षाने २०१४ मध्ये ४४ आणि २०१९ मध्ये ५२ जागा जिंकल्या, जे त्यांच्या ऐतिहासिक कामगिरीपेक्षा खूपच वेगळे होते. २०२४ मध्येही कांग्रेस नी सर्व प्रादेशिक पक्षांना एकत्र घेऊन निवडणूक लढवली आणि तेव्हाच आम्हाला ९९ जागा मिळवता आल्या.

२०२५ च्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाची कामगिरी निराशाजनक होती. गेल्या दोन विधानसभा निवडणुकीत पक्षाला एकही जागा जिंकता आलेली नाही, ज्यामुळे त्याचे राजकीय अस्तित्व जवळजवळ नगण्य झाले आहे.

२०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत काँग्रेस आणि त्यांच्या आघाडी 'महाविकास आघाडी'ला मोठा धक्का बसला जिथे त्यांना एकूण फक्त ५० जागा जिंकता आल्या तर भाजपच्या नेतृत्वाखालील 'महायुती'ने २३० हून अधिक जागा जिंकल्या.

आता बिहारमध्ये येणाऱ्या २०२५ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेससमोर मोठे आव्हान आहे. पक्षाची स्थिती मजबूत करण्यासाठी, त्यांना त्यांच्या आघाडीतील भागीदारांसह रणनीती आखावी लागेल.

काँग्रेस आपली विश्वासार्हता पुन्हा स्थापित करू शकेल का?

काँग्रेसकडे अजूनही संधी आहेत, पण त्यासाठी पक्षाला मोठे बदल करावे लागतील.

**सशक्त नेतृत्व :** काँग्रेसला अशा नेतृत्वाची गरज आहे जे केवळ पक्षाला एकसंध ठेवत नाही तर लोकांचा विश्वासही जिंकू शकेल.

**राजकारणाला अनुकूल बदल :** भाजपच्या आक्रमक रणनीती आणि सोशल मीडियाच्या प्रभावी वापराला तोंड देण्यासाठी काँग्रेसला आपली रणनीती बदलावी लागेल.

**नेत्यांना संधी:** पक्षाने केवळ घराणेशाहीवर अवलंबून राहू नये, तर तळागाळातील नेत्यांना उदयास येण्याची संधीही दिली पाहिजे.

**स्पष्ट धोरणे आणि विचारसरणी :**

काँग्रेसला त्यांची विचारसरणी स्पष्ट करावी लागेल आणि जनतेला खात्री द्यावी लागेल की ती एक स्थिर आणि मजबूत पर्याय आहे. काँग्रेसच्या धोरणांमुळे जनता गोंधळून जात आहे. सनातन विचारसरणीवरील काँग्रेसच्या धोरणांमुळे काँग्रेस सनातनविरोधी असल्याची प्रतिमा निर्माण करत आहे. मित्रपक्षांनी केलेल्या विधानांवर काँग्रेसचे मौन लोकांचा विश्वास उडवत आहे.

काँग्रेस पक्षाची विश्वासार्हता आज प्रश्नचिन्हाच्या भोवऱ्यात आहे. यामागील कारणे म्हणजे कमकुवत नेतृत्व, गटबाजी, धोरणातील अस्पष्टता आणि भ्रष्टाचार. तथापि, जर काँग्रेसने आपली रणनीती बदलली, जनतेशी थेट संवाद स्थापित केला आणि एक ठोस धोरणात्मक चौकट स्वीकारली तर ती पुन्हा विश्वासार्हता मिळवू शकते. पण काँग्रेस स्वतःला बदलण्यास तयार आहे का? हे आगामी निवडणुका आणि पक्षाच्या कार्यशैलीवर अवलंबून असेल.

■ ■ ■

# अजातशत्रू आबा...



राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व अशी ओळख असलेले निष्कलंक चारित्र्याचे माजी उपमख्यमंत्री रावसाहेब राजाराम पाटील उर्फ आर आर पाटील यांचा आज स्मृतिदिन.

आजच्याच दिवशी म्हणजे १६ फेब्रुवारी २०१५ रोजी आरआर पाटील यांचे अल्पशा आजाराने निधन झाले होते. आर आर पाटील यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला होता. आर आर पाटील म्हणजे राजकारणातील आम आदमी. शेतकरी असोत की सर्वसामान्य नागरिक, गरीब असोत की वंचित प्रत्येकाला आर आर पाटील आपले वाटत होते.

राजकारणात उपमुख्यमंत्री पदासारख्या मोठ्या पदापर्यंत पोहचूनही कायम जमिनीवर राहून जनतेशी नाळ टिकवलेले आर आर पाटील सर्वसामान्यांचे नेते होते म्हणूनच त्यांना सर्वसामान्य नागरिक त्यांना प्रेमाने आबा म्हणत. १६ ऑगस्ट १९५७ रोजी सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील अंजनी गावात एका गरीब शेतकरी कुटुंबात आबांचा जन्म झाला. घरची परिस्थिती गरिबीची असल्याने आबांनी कमवा आणि शिका या योजनेतून शिक्षण घेतले. बी ए झाल्यानंतर त्यांनी एलएलएलबीचेही शिक्षण घेतले.

कॉलेज जीवनातच त्यांनी शेतकऱ्यांचे, सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न शासन दरबारी मांडायला सुरुवात केली. त्यांच्यातील नेतृत्व गुण वसंत दादा पाटलांनी हेरले आणि त्यांना राजकारणात आणले. कोणतीही राजकीय पार्शवभूमी नसताना समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द, मनाला भिडणारी भाषण शैली आणि स्वच्छ प्रतिमेच्या जोरावर त्यांनी अल्पावधीत राजकारणात बस्तान बसवले.

१९७९ साली पहिल्यांदा जिल्हा परिषद सदस्य म्हणून आबा निवडून आले. १९७९ ते १९९० असे एकवीस वर्ष आबा जिल्हा परिषद सदस्य होते. १९९० साली आबांनी पहिल्यांदा विधानसभेची निवडणूक लढवली आणि प्रचंड मतांनी जिंकली. त्यानंतर २०१४ पर्यंतच्या विधानसभेच्या सर्व निवडणुका आबांनी जिंकल्या.

१९९५ साली आबा दुसऱ्यांदा आमदार झाल्यावर राज्यात युतीचे सरकार आले. विरोधी पक्षात असलेल्या आबांनी राजकीय आयुधांचा वापर करून अनेकदा सत्तधाऱ्यांना कोंडीत पकडले. विरोधी पक्षात असूनही आबांनी विधानसभा गाजवून सोडली. १९९९ साली राष्ट्रवादीची स्थापना झाल्यावर ते राष्ट्रवादीत आले. शरद पवार यांचे अत्यंत विश्वासू साथीदार अशी त्यांची ओळख बनली.

त्यांनीही राष्ट्रवादी घराघरात पोहचवण्यासाठी जीवाचे रान केले. ते काही काळ राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्याचे अध्यक्ष होते. राज्य मंत्रिमंडळात त्यांना अनेक महत्वाची पदे मिळाली. आर आर पाटील ग्रामविकास मंत्री असताना त्यांनी संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान यशस्वीपणे राबवून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. पुढे राज्याचे गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारीही त्यांनी स्वीकारली.

गृहमंत्री असताना त्यांनी राज्यातील डान्स बार बंद करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. डान्स बार बंद करण्याचा त्यांच्या निर्णयाला कडाडून विरोध झाला पण ते आपल्या निर्णयावर ठाम राहिले. गृहमंत्री असतानाच त्यांनी महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान राबवले. खाजगी सावकारी विरूध्दही दंड थोपटले होते तसेच गुटखा बंदी करण्याचा देखील निर्णय घेतला होता.

त्यांच्या याच धडाकेबाज निर्णयांनी त्यांनी सर्वसामान्यांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले होते. गृहमंत्री, उपमुख्यमंत्री अशी मोठी पदे भूषवूनही आबांनी तळागळातील कार्यकर्त्यांशी असलेला संवाद तुटू दिला नाही. सत्ता येते आणि जाते जोडलेले माणसे टिकवली पाहिजेत हे आबांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले.

उच्च पदावर पोहचूनही आबांनी आपला साधेपणा कायम ठेवला. इतक्या मोठ्या पदावर असतानाही आबांनी आपल्या पाल्यांना महागड्या इंग्रजी शाळेत न घालता जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत घातले होते. आबांसारखे तळागळातून आलेले स्वच्छ चारित्र्याचे निष्कलंक, अजातशत्रू व्यक्तिमत्व राजकारणात विरळच.

सध्याच्या गढूळ राजकीय वातावरणात तर आबांसारख्या निष्कलंक चारित्र्याच्या नेत्याची आवर्जून आठवून येते. राजकारणात त्यांनी जो आदर्श घालून दिला आहे त्याचे अनुकरण आजच्या राजकीय नेत्यांनी केले तरच राजकीय नेत्यांवरील जनतेचा उडालेला विश्वास पुन्हा प्राप्त होईल. आबांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

■ ■ ■

# जनगणना कधी होणार?

करोना साथीमुळे २०२१ मध्ये रखडलेली जनगणना होणार तरी कधी हा प्रश्न सातत्याने उपस्थित केला जात आहे. लोकसभा निवडणुकीनंतर जनगणना केली जाईल, अशी शक्यता वर्तविली जात होती. पण निवडणूक पार पडून आता वर्ष होत आले तरीही केंद्र सरकारकडून जनगणनेचे नावच घेतले जात नाही. २०२५ या वर्षातही जनगणना होण्याबाबत साशंकताच व्यक्त केली जाते आहे. कारण केंद्रीय अर्थसंकल्पात जनगणनेसाठी फक्त ५७४ कोटी ८० लाख रुपयांची करण्यात आलेली तरतूद. जनगणनेसाठी सुमारे १२ हजार कोटींची आवश्यकता असताना केवळ ५७५ कोटी म्हणजे एकूण अपेक्षित खर्चाच्या पाच टक्के तरतूद. एवढी अल्प तरतूद लक्षात घेता यंदाही जनगणना करण्याची मोदी सरकारची इच्छा दिसत नाही.

-------------

दर दहा वर्षांने होणारी जनगणना लक्षात घेता २०२१ मध्ये जनगणना होणे अपेक्षित होते. त्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने डिसेंबर २०१९ मध्ये जनगणनेच्या कामासाठी ८,७५४ कोटी तर राष्ट्रीय लोकसंख्या कार्यक्रमाकरिता ३,९४१ कोटींच्या खर्चाला मान्यता दिली होती. करोनाची साथ आटोक्यात येऊन जनजीवन सुरळीत झाल्यावर जनगणना केली जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. २०२१-२२ या वर्षात जनगणनेच्या कामासाठी ३,७६८ कोटींची तरतूदही करण्यात आली होती. पण जनगणनेला अद्यापही मुहूर्त मिळालेला नाही. जनगणना कधी करणार या संदर्भात संसदेत विचारण्यात आलेल्या प्रश्नांवर लवकरच, असे मोघम उत्तर वेळोवेळी देण्यात आले.



संजय मते
ओबीसी समिती,
भंडारा.

गेल्या वर्षी अर्थसंकल्प सादर करताना मूळ अर्थसंकल्पीय तरतुदीत जनगणनेसाठी १,३०९ कोटींची तरतूद करण्यात आली होती. पण नंतर सुधारित अर्थसंकल्पात ही रक्कम कमी करून ५७२ कोटी करण्यात आली होती. २०२५-२६ आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात जनगणनेच्या कामासाठी फक्त ५७५ कोटींची तरतूद करण्यात आल्याने यंदाच्या वर्षातही जनगणना होण्याबाबत साशंकताच व्यक्त केली जाते. याशिवाय तरतूद करण्यात आलेली बहुतांश रक्कम ही अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते तसेच कार्यालयीन कामावर खर्च होणार आहे.

जनगणना असो वा जातनिहाय जनगणना, केंद्रातील भाजप सरकारचा कोणत्याही मोजणीस विरोधच दिसतो. काँग्रेससह विरोधकांनी जातनिहाय जनगणनेची मागणी सातत्याने लावून धरली आहे. पण जातनिहाय जनगणनेला भाजपने कायम विरोधच केला. जातनिहाय जनगणनेच्या विरोधात केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले होते. बिहार सरकारने जातनिहाय जनगणनेचा निर्णय घेतला असता, राज्यांना असा अधिकारच नाही, असा युक्तिवाद केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात केला होता.

जनगणना करायची झाल्यास त्यात जातनिहाय जनगणना हा कळीचा मुद्दा ठरू शकतो. देशातील ओबीसी, मागास घटकांकडून जातनिहाय जनगनणेची सातत्याने होणारी मागणी लक्षात घेता, केंद्रातील भाजपच्या शीर्षस्थ नेत्यांना जातनिहाय जनगणना करण्याच्या मागणीकडे दुर्लक्ष करता येत नाही. जनगणना करण्याचा निर्णय घेतला आणि त्यात जातनिहाय जनगणना नसल्यास तो पुन्हा राजकीय मुद्दा होणार. शिवाय जातनिहाय जनगणना केल्यास त्याचे सारे श्रेय काँग्रेसला जाईल. यामुळेच केंद्र सरकारकडून जनगणनेचा मुद्दा बाजूला ठेवला जात असावा.

अर्थसंकल्पातील अल्प तरतूद लक्षात घेता केंद्राची सध्या तरी तशी इच्छा दिसत नाही. दुसरीकडे जातनिहाय जनगणनेची मागणी जोर धरू लागली आहे. ह्यपलटूरामह्न म्हणून प्रसिद्ध असलेल्या बिहारच्या मुख्यमंत्र्यांनी, नितीशकुमार यांनी भाजपशी पुन्हा हातमिळवणी करण्यापूर्वी राज्यात जातनिहाय जनगणना केली होती. त्यात बिहारमधील ६५ टक्क्यांच्या आसपास लोकसंख्या ही मागास व दुर्बल घटकांमधील असल्याचे आढळले होते.

दोनच दिवसांपूर्वी तेलंगणातील काँग्रेस सरकारने जातनिहाय जनगणनेचे निष्कर्ष जाहीर केले. तेथेही ५६ टक्के लोकसंख्या मागास व दुर्बल घटकांमधील असल्याची आकडेवारी समोर आली. कर्नाटकातील काँग्रेस सरकारने जातनिहाय जनगणना केली असली तरी लिंगायत व वोकलिंग या राजकीयदृष्ट्या प्रमुख जातींच्या विरोधामुळे निष्कर्ष अद्याप जाहीर करण्यात आलेले नाहीत. शिवाय जातनिहाय जनगणना झाली तरी पुढे काय हा प्रश्न अनुत्तरित राहतो.

केंद्राने जातनिहाय जनगणना करून त्या निष्कर्षाच्या आधारे नोकरीत आरक्षण, निधी वाटप करावे, अशी विविध सामाजिक संघटनांची भूमिका आहे. भाजपसाठी हे सारे अडचणीचे असावे. कदाचित यातूनच जनगणना नको नि जातनिहाय जनगणनाही नको, अशीच मोदी सरकारची भूमिका असावी. जनगणना बाजूला ठेवण्यातून २०२६ मध्ये करावी लागणारी मतदारसंघांची पुनर्रचना लांबणीवर टाकून उत्तर विरुद्ध दक्षिण अशी होऊ घातलेली दरीही टाळण्याचा प्रयत्न असावा.

राजकीय कारणे काहीही असो, जनगणना होणार की नाही व झाली तर कधी हे प्रश्न अनुत्तरितच राहतात.जनगणना केल्यास लोकांच्या सामाजिक आर्थिक राजकीय परिस्थिती चे विश्लेषण स्पष्ट होईल.त्यामुळे सरकारला दुर्बल घटकांना न्याय द्यावा लागेल.अर्थसंकल्पात तरतूद करावी लागेल. त्यामुळे खाजवून अवधान आणायच्या भानगडीत पडूच नये या मानसिकतेत सरकार आहे.

■ ■ ■

# भारत विकसित करतोय पाचव्या पिढीतील लढाऊ विमाने



भारत स्वतःच्या ५ व्या पिढीच्या लढाऊ विमानांच्या एएमसीए प्रकल्पावर काम करत आहे, जे २-३ वर्षांत पूर्ण होईल. रशियानेही हे लढाऊ विमान भारताला विकण्याची ऑफर दिली आहे. रशियन शस्त्रास्त्र कंपनीने बेंगळुरू एअर शोमध्ये सांगितले की, विमानांचा पुरवठा करण्याव्यतिरिक्त, आम्ही भारतात त्याचे संयुक्त उत्पादन देखील करू.

पंतप्रधान नरेंद्र मोदींशी द्विपक्षीय चर्चेनंतर अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प म्हणाले की, अमेरिका या वर्षापासून भारताला अनेक अब्ज डॉलर्सची लष्करी उपकरणे विकेल. यामुळे एफ 35 स्टेल्थ लढाऊ विमाने पोहोचवण्याचा मार्गही मोकळा होईल.

ट्रम्प यांनी भारताला एफ 35 विमाने देण्याची ऑफर दिली असली तरी, हा करार पुन्हा रुळावर आणणे सोपे होणार नाही. अमेरिकेला त्यांच्या संसदेची, काँग्रेसची मान्यता घ्यावी लागेल. मग भारत खचार्चा विचार करेल.

एप्रिल २०२४ मध्ये, कॅबिनेट कमिटी ऑन सिक्युरिटीने स्वदेशी पाचव्या पिढीतील लढाऊ विमानांच्या डिझाइन आणि विकासासाठी १५,००० कोटी रुपयांच्या प्रकल्पाला मंजुरी दिली. या लढाऊ विमानाचे नाव 'ॲडव्हान्स्ड मीडियम कॉम्बॅट एअरक्राफ्ट' (एएमसीए) आहे.

हे हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड द्वारे उत्पादित केले जाणार आहे. विमान विकास संस्था ही कार्यक्रम राबविण्यासाठी आणि विमानाची रचना करण्यासाठी नोडल एजन्सी आहे. एडीए संरक्षण संशोधन आणि विकास संघटना (डीआरडीओ) अंतर्गत येते. हे भारतीय हवाई दलाच्या इतर लढाऊ विमानांपेक्षा मोठे असेल. शत्रूच्या रडारपासून वाचण्यासाठी त्यात प्रगत स्टेल्थ वैशिष्ट्ये असतील. हे जागतिक स्तरावर वापरात असलेल्या इतर पाचव्या पिढीतील स्टेल्थ लढाऊ विमानांशी तुलनात्मक किंवा त्याहूनही श्रेष्ठ असेल.

एफ-३५ लढाऊ विमान हे पाचव्या पिढीतील विमान आहे. या विमानाचे उत्पादन २००६ मध्ये सुरू झाले. २०१५ पासून, ते अमेरिकन हवाई दलाचा एक महत्त्वाचा भाग आहे. एफ-३५ हे अमेरिकन संरक्षण विभाग पेंटागॉनच्या इतिहासातील सर्वात महागडे विमान आहे.

■ ■ ■

# लाल की हिरवी मिरची, कोणती फायदेशीर?



भारतीय स्वयंपाकात मिरचीला महत्त्वाचे स्थान आहे. हे केवळ चव वाढवत नाही तर आरोग्यासाठी अनेक प्रकारे फायदेशीर आहे. सर्वसाधारणपणे हिरवी मिरची आणि लाल मिरची या दोन्ही गोष्टी प्रत्येक स्वयंपाकघरात वापरल्या जातात, पण बऱ्याचदा प्रश्न पडतो की यापैकी कोणती गोष्ट आरोग्याच्या दृष्टीने चांगली आहे?

हिरव्या आणि लाल मिरची दोन्हीमध्ये पोषक असतात, परंतु त्यांचे गुणधर्म आणि प्रभाव भिन्न असतात. एका संशोधनानुसार हिरवी मिरची अँटीऑक्सिडंट्समध्ये समृद्ध असते आणि कॅलरी कमी असते, ज्यामुळे वजन कमी करणाऱ्यांसाठी ही एक चांगली निवड बनते. त्याचबरोबर लाल मिरची पावडरमुळे चयापचय वेगवान होण्यास मदत होते आणि त्यात असलेले कॅप्सॅसिन साखरेची पातळी नियंत्रित करण्यास उपयुक्त ठरते. मोठ्या प्रमाणात त्यांचे सेवन केल्याने नुकसान देखील होऊ शकते, विशेषतः पोटाच्या समस्या असलेल्या लोकांना.

आता प्रश्न असा आहे की, या दोन मिरच्यांपैकी कोणती मिरची आरोग्यासाठी अधिक फायदेशीर आहे आणि कोणत्या परिस्थितीत त्यांचे सेवन करणे योग्य ठरेल? याबाबत योग्य माहिती असणे गरजेचे आहे जेणेकरून तुम्ही तुमच्या आहारात संतुलित पद्धतीने मिरचीचा समावेश करू शकू आणि त्याचा जास्तीत जास्त फायदा घेऊ शकू.

जर तुम्ही ताजेपणा, जीवनसत्त्वे आणि नैसर्गिक घटकांबद्दल बोलत असाल तर हिरवी मिरची हा एक चांगला पर्याय आहे. याचे सेवन ताज्या स्वरूपात केले जाते, जेणेकरून त्यात असलेले पोषक घटक शरीराला पूर्णपणे उपलब्ध होतात. त्याचबरोबर लाल मिरची पावडर अधिक प्रभावी असून त्यात काही औषधी गुणधर्मही आहेत. पण त्याचे अतिसेवन आरोग्यास हानी पोहोचवू शकते.

हिरवी मिरची अँटीऑक्सिडंट्समध्ये समृद्ध असते आणि कॅलरी कमी असते, ज्यामुळे वजन कमी करणाऱ्यांसाठी ही एक चांगली निवड बनते. लाल मिरची पावडरमुळे चयापचय वेगवान होण्यास मदत होते आणि त्यात असलेले कॅप्सॅसिन साखरेची पातळी नियंत्रित करण्यास उपयुक्त ठरते. ■ ■

# सूर्याच्या वर्णमय आवरणातील आयनीभवन



मेघनाद साहा हे भारतीय भौतिकशास्त्रज्ञ होते. त्यांनी ऊष्मीय आयनीकरणाचे समीकरण मांडून त्यांचा उपयोग तारकेय वर्णपटांच्या स्पष्टीकरणासाठी केला. खगोल भौतिकीतील या महत्त्वाच्या कार्याकरिता ते प्रसिद्ध आहेत. साहा यांचा जन्म डाक्का जिल्ह्यातील सिओरात्तली आता बांगला देश येथे ६ ऑक्टोबर १८९३ रोजी झाला. त्यांनी कोलकाता येथील प्रेसिडेन्सी कॉलेजात प्रफुलचंद्र रॉय व सर जगदीशचंद्र बोस यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेऊन १९१५मध्ये एमएस्सी आणि नंतर सापेक्षता सिद्धांत व प्रारण दाबाचे मापन यावर संशोधन करून पीएचडी संपादन केली. त्यानंतर त्यांनी लंडनच्या इंपिरियल कॉलेजमध्ये संशोधन करून डीएस्सी. पदवी मिळविली.

--------------------

ते कोलकाता विद्यापीठात भौतिकी विषयाचे खैरा प्राध्यापक- १९२१-२३, अलाहाबाद विद्यापीठात भौतिकीचे प्राध्यापक- १९२३-३८, पलित प्राध्यापक- १९३८-५२ आणि गुणश्री प्राध्यापक होते. साहा यांनी आणवीय सिद्धांत आणि पुंजयामिकी यांमधील तत्त्वांचा वापर करून तारकेय वर्णपटांच्या चित्रलिपीचा सांकेतिक अर्थ शोधून काढण्यास सर्वप्रथम प्रयत्न केला.

तारकेय वातावरणातील तापमानाला- ६,०००ओसे. किंवा अधिक ताऱ्याचे घटक असलेल्या पुष्कळशा अणूंच्या बाह्य कवचातील इलेक्ट्रॉन छेदले जातात. या आणवीय छेदन प्रक्रियेला इलेक्ट्रॉन गमावल्यामुळे आयनीकरण म्हणतात आणि छेदित अणूला आयन-विद्युत्भारित अणू म्हणतात. अशा प्रकारे तारकेय वातावरणात मुक्त इलेक्ट्रॉन आणि छेदित अणू यांचे वायुमय मिश्रण असते. साहा यांनी यास वायूचा गत्यात्मक सिद्धांत आणि ऊष्मागतिकी यांचे नियम लावले.

मेघनाद साहा हे लहानपणापासूनच अतिशय हुशार होते. विज्ञान विषयाची त्यांना अधिक आवड होती. वर्गात त्यांनी विचारलेल्या प्रश्नांनी शिक्षकही थक्क होत होते. एकदा त्यांनी सूर्याभोवती वर्तुळ आकारात फिरणाऱ्या आवरणाबद्दल विचारले. ज्याचे उत्तर त्यांचे शिक्षक देऊ शकले नाही. आर्थिक परिस्थितीमुळे वडील त्यांना बाहेरगावी शिक्षणासाठी पाठविण्यास तयार नव्हते. डॉ.अनंत दास यांनी मेघनाद साहा यांना पुढील शिक्षणासाठी मदत केली. मेघनाद यांनी दुसऱ्या गावातल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेतला.

पुढे ते डॉ.अनंत कुमार यांच्या घरी राहत होते. आपल्या मेहनतीच्या जोरावर मेघनाद साहा यांनी केवळ आपल्या शाळेतच नाही तर संपूर्ण ढाका जिल्ह्यात आठवीत सर्वाधिक मार्क मिळवले. त्यानंतर मेघनाद साहा यांना शिष्यवृत्ती मिळू लागली. सोबतच त्यांना ढाका येथील सरकारी हायस्कूलमध्ये प्रवेश मिळाला.

याच काळात देशभर स्वातंत्र्यलढ्याची आग धगधगत होती. मेघनाद याशी प्रभावित झाले होते. बंगालचे राज्यपाल त्यांच्या शाळेला भेट देणार होते. राज्यपालांच्या आगमनानिमित्त मेघनाद साहा यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह आंदोलनात भाग घेतला. परिणामी, मेघनाद यांची शिष्यवृत्ती बंद करून मेघनाद यांना त्यांच्या साथीदारांसह शाळेतून काढून टाकण्यात आले. मात्र त्यांना किशोरीलाल ज्युबिली स्कूल या खाजगी शाळेत प्रवेश मिळाला.

पुढे साहा हे इंटरमिजिएट परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. नंतर कलकत्ता विद्यापीठात साहा यांनी संपूर्ण विद्यापीठात दुसरा क्रमांक पटकावला. हलाखीच्या परिस्थितीवर मात करत साहा यांची वाटचाल प्रगती आणि विकासाच्या दिशेने सुरू झाली.

कोणत्याही मूलद्रव्याच्या अणुंकरिता छेदन किंवा आयनीभवन केवळ उच्च तापमानामुळे घडून येत नसून ते नीच दाबामुळेसुद्धा घडते, हे साहा यांनी सप्रमाण सिद्ध केले. दाबातील न्यूनीकरणामुळे छेदन झाल्यानंतर उरलेला अणू आणि मुक्त इलेक्ट्रॉन यांची गाठ पडण्याची संधी अधिक कमी होते आणि पुनःसंयोग होण्याचा वेग कमी होऊन आयनीकरण वेग बदलत नाही. साहा यांनी १९२० मध्ये सूर्याच्या वर्णमय आवरणातील आयनीभवन या विषयावरील एक निबंध फिलॉसॉफिकल मॅगझीनमध्ये प्रसिद्ध केला. रेडिओ तरंगांचे प्रेषण, ज्योतींचे संवहन, प्रज्योत आणि स्फोटक विक्रियांची रचना यांमधील समस्या सोडविण्याकरिता साहा यांचा आयनीभवन सिद्धांत उपयुक्त ठरला आहे.

साहा यांनी कोलकाता येथील इन्स्टिट्यूट ऑफ न्यूक्लिअर फिजिक्स ही संस्था स्थापन करण्यात पुढाकार घेतला. ते या संस्थेचे संचालक होते. त्यांच्या मृत्यूनंतर या संस्थेला त्यांचे नाव देण्यात आले. ते लंडनच्या रॉयल सोसायटीचे १९२७ साली फेलो होते. १९३४ मध्ये भारतीय विज्ञान परिषद संस्थेच्या एकविसाव्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत स्वतंत्र उमेदवार म्हणून ते लोकसभेवर निवडून आले होते. आयुष्याच्या अखेरच्या काळात त्यांनी आपले लक्ष विज्ञानाच्या सामाजिक कार्याकडे वळविले. त्यांनी इतिहास, संस्कृती व विज्ञान यांना वाहिलेले सायन्स अँड कल्चर हे नियतकालिक सुरू केले. अशा या महान वैज्ञानिकाचे १६ फेब्रुवारी १९५६ रोजी दिल्ली येथे निधन झाले.



कृष्णकुमार आनंदी
गोविंदा निकोडे
गडचिरोली.
९४२३७१४८८३

■ ■ ■

# त्रिजटा स्नानाचे विशेष महत्त्व

महाकुंभातील संगमच्या वाळूवर कल्पवासींना पुण्य मिळवण्याची प्रक्रिया अजूनही सुरू आहे. माघ पौर्णिमेनंतरही, हजारो भाविक तीन दिवस त्रिजटा स्नान करून त्यांचे आध्यात्मिक संकल्प पूर्ण करत आहेत.

त्रिजटा स्नानाचे महत्त्व अशा भक्तांसाठी आहे जे माघ पौर्णिमेनंतरही संगमात स्नान करून त्यांच्या धार्मिक श्रद्धेचे पालन करतात. असे मानले जाते की त्रिजटात स्नान केल्याने संपूर्ण माघ महिन्यात स्नान केल्याचे पुण्य मिळते.

'त्रिजटा' म्हणजे तीन प्रवाह - गंगा, यमुना आणि अदृश्य सरस्वती. हे स्नान कर्म, भक्ती आणि ज्ञान यांचे संगम मानले जाते, जे भक्तांना आध्यात्मिक ऊर्जा देते.

कल्पवासी संपूर्ण महिना संयम, ध्यान आणि तपश्चर्येने संगमच्या वाळूवर झोपतात. त्यांना त्यांच्या ध्यानात कोणतीही कमतरता राहू द्यायची नाही, म्हणून ते पौर्णिमेच्या स्नानानंतरही तीन दिवस स्नान करतात. त्रिजटा स्नान हे अपूर्ण स्नान पूर्ण होण्यासारखे देखील मानले जाते, ज्यामुळे कल्पवासाचा संकल्प पूर्ण होतो.

भाविक तीन दिवस त्रिजटा स्नान करून आपला आध्यात्मिक संकल्प पूर्ण करत आहेत.

भाविक तीन दिवस त्रिजटा स्नान करून आपला आध्यात्मिक संकल्प पूर्ण करत आहेत.

महाशिवरात्रीच्या स्नानानंतर गर्दी कमी होईल

महाकुंभातील मुख्य स्नान विधी संपले असले तरी, भाविकांच्या श्रद्धेची लाट अजूनही संगमाकडे वाहत आहे. ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### फुकटाच्या सवलती

देशाच्या स्वयंपूर्णतेसाठी
घातक फुकटी प्रवृत्ती
भिकेची वेळच येऊ नये
अशी राबवा रोजगार निती

पुणे लुटून करता
साताऱ्याला दान
अशा नीतीने नेत्यांनो
देश बनेल का महान?..

रोटी मकान दवाखाना
शासन देतेय फुकट
मग सांगा का करावे कष्ट?
कार्य प्रेरणाच होतेय नष्ट ..!

# मॅक्सिव्हिजन ग्रुप ऑफ आय हॉस्पिटल्स, ने महाराष्ट्र उपक्रम अंतर्गत ओजस ग्रुप ऑफ आय हॉस्पिटल, मुंबई सोबत भागीदारीची घोषणा

**मुंबई, १५ फेब्रुवारी :** डोळ्यांची देखभाल करणाऱ्या नेटवर्कच्या भारतातील प्रमुख शृंखलांपैकी एक असलेल्या मॅक्सिव्हिजन ग्रुप ऑफ आय हॉस्पिटल्स, मुंबईतील जगप्रसिद्ध आणि प्रतिष्ठित नेत्रसेवा प्रदाता असलेल्या ओजस ग्रुप ऑफ आय हॉस्पिटल सोबत धोरणात्मक भागीदारीद्वारे महाराष्ट्रात प्रवेश करण्याची घोषणा केली. या भागीदारीचा औपचारिक शुभारंभ डॉ. जीएसके वेलू, प्रवर्तक आणि अध्यक्ष, मॅक्सिव्हिजन सुपर स्पेशालिटी आय हॉस्पिटल्स आणि डॉ. नितिन देधिया, प्रवर्तक आणि अध्यक्ष, ओजस ग्रुप ऑफ आय हॉस्पिटल्स, डॉ. रोहन देधिया, प्रवर्तक आणि संचालक ओजस ग्रुप ऑफ आय हॉस्पिटल्स, सीए प्रणव देधिया, सीईओ, ओजस ग्रुप ऑफ आय हॉस्पिटल्स, सीए प्रणव देधिया यांच्या उपस्थितीत करण्यात आला. मॅक्सिव्हिजन सुपर स्पेशालिटी आय हॉस्पिटल्स एकत्रितपणे, नव्याने स्थापन झालेल्या संयुक्त उपक्रम - ओजस मॅक्सीव्हिजन आय हॉस्पिटल्सचे संपूर्ण महाराष्ट्रात कारभार वाढवण्यासाठी ५०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचे उद्दिष्ट आहे.

डॉ. नितिन देधिया यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली, आय हॉस्पिटल्स चा ओजस ग्रुप सध्या मुंबई-वांद्रे (प.) आणि कांदिवली (ई) येथे तीन प्रमुख केंद्रे चालवत आहे-तज्ञ नेत्र शल्यचिकित्सक आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांच्या टीमद्वारे रूग्णांना आंतरराष्ट्रीय दर्जाची असाधारण नेत्रसेवा प्रदान करते. मागील ४० वर्षात ५,००,००० हून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार केल्याने, डॉ. देधिया आणि त्यांची टीम वैयक्तिक रूग्ण सेवेवर लक्ष केंद्रित करून डोळ्यांच्या काळजीमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानात आघाडीवर आहे. त्यांनी कॉर्निया, काचबिंदू, डोळयातील पडदा, मोतीबिंदू आणि अपवर्तक डोळ्यांच्या शस्त्रक्रियांमध्ये प्रगत डोळ्यांच्या उपचारांची सुरुवात केली आहे. दृष्टी सुधारण्यासाठी फ्लॅपलेस ELITA SILK प्रक्रिया, 3D इमेजिंग आणि रोबोटिक मोतीबिंदू प्रक्रिया, खूप उच्च डोळ्यांची शक्ती सुधारण्यासाठी फॅकिक लेन्स उपचार आणि आगाऊ




कोरड्या डोळ्यांचे उपचार यांसारख्या प्रगत नेत्र उपचारांचा परिचय करून देणारे ओजस हे पश्चिम भारतातील पहिले आय हॉस्पिटल आहे. रूग्णांना सर्वोत्कृष्ट दृश्य परिणाम देण्यासाठी रुग्णालय अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास समर्पित आहे.

मॅक्सिव्हिजन सुपर स्पेशालिटी आय हॉस्पिटल्सचे प्रवर्तक आणि अध्यक्ष डॉ. जीएसके वेलू यांनी या विलीनीकरणाबद्दल उत्साह व्यक्त करताना सांगितले की, ओजस आय हॉस्पिटल्ससोबतची आमची भागीदारी महाराष्ट्रात सर्वोत्कृष्ट डोळ्यांची निगा राखणाऱ्या उपचारांसाठी सामायिक वचनबद्धतेचे प्रतीक आहे. भारतातील जागतिक दर्जाच्या आरोग्य सेवा वितरणाचा एक गुंतवणूकदार आणि प्रवर्तक या नात्याने माझा ठाम विश्वास आहे की रुग्णालये त्यांचे नेतृत्व करणाऱ्या डॉक्टरांइतकीच चांगली आहेत. आमचे भागीदारी मॉडेल वाढीस चालना देऊन, अत्याधुनिक तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक करून आणि मजबूत व्यवस्थापन कौशल्य आणि कॉर्पोरेट गव्हर्नन्सचा समावेश करून उत्कृष्ट डोळ्यांची काळजी घेण्याच्या पद्धतींना समर्थन देण्यासाठी डिझाइन केलेले आहे. डॉ. नितिन देधिया आणि त्यांच्या टीमसोबतचे हे सहकार्य, पुढील काही वर्षांमध्ये रु. ५०० कोटींच्या गुंतवणुकीसह संपूर्ण महाराष्ट्रात विस्तार करण्याच्या मॅक्सिव्हिजनच्या दृष्टीकोनाशी सुसंगत आहे.

डॉ. नितिन देधिया, प्रवर्तक आणि अध्यक्ष, ओजस आय हॉस्पिटल्स, त्यांचा दृष्टीकोन सामायिक करत म्हणाले, मॅक्सिव्हिजनच्या भागीदारी मॉडेलने आम्हाला त्यांच्याशी हातमिळवणी करण्यास प्रेरित केले. नैतिक पद्धती, सामुदायिक सेवा अभिमुखता आणि क्लिनिकल प्रॅक्टिशनर्सना सशक्त करण्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी त्यांची प्रतिष्ठा आमच्या मूल्यांशी पूर्णपणे जुळते. हे सहकार्य आम्हांला मॅक्सिव्हिजनच्या व्यावसायिक व्यवस्थापन आणि गुंतवणुकीच्या क्षमतांचा लाभ घेण्यासाठी मुंबई आणि महाराष्ट्रात आमचा सराव वाढविण्यास सक्षम करते. एकत्रितपणे, आम्ही अधिकाधिक रुग्णांना प्रगत, वैयक्तिकृत आणि सर्वसमावेशक नेत्रसेवा प्रदान करणे सुरू ठेवू, जेणेकरून त्यांना डोळ्यांच्या काळजीतील सर्वोत्तम तंत्रज्ञान आणि सेवांचा फायदा होईल. सर्वांना दयाळू आणि उच्च-गुणवत्तेची दृष्टी काळजी देण्याचे आमचे सामायिक ध्येय साध्य करण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत.

मॅक्सिव्हिजन सुपर स्पेशालिटी आय हॉस्पिटल्सचे ग्रुप सीईओ सुधीर व्हीएस पुढे म्हणाले, डॉ नितिन, डॉ रोहन आणि त्यांच्या ओजस आय हॉस्पिटल्स मधील प्रतिष्ठित चिकित्सकांच्या टीमसोबत सामील होऊन, तृतीय आणि माध्यमिक देखभाल रुग्णालयांच्या मिश्रणाद्वारे महाराष्ट्रात उच्च दर्जाची नेत्रसेवा सुरू करण्याचे आमचे ध्येय आहे. ओजसचे अतुलनीय कौशल्य आणि मॅक्सिव्हिजनचे भक्कम व्यवस्थापन आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान यांच्यातील ताळमेळ या प्रदेशातील आय केअर मध्ये क्रांती घडवून आणेल. आम्ही एकत्रितपणे पुढील २४ महिन्यांत संपूर्ण मुंबईत पाच नवीन केंद्रे उघडण्याची आणि हळूहळू महाराष्ट्राच्या इतर भागांमध्ये विस्तारित करण्याची योजना आखत आहोत. हे सहकार्य सुलभता वाढविण्याच्या आणि डोळ्यांच्या काळजीमध्ये नवीन बेंचमार्क स्थापित करण्याच्या आमच्या वचनबद्धतेला अधोरेखित करते.

## आयपीओ द्वारे २००० कोटी पर्यंत जमा करण्यासाठी इनोव्हेटिव्ह्यू इंडिया लि. ने सेबीकडे DRHP फाइल केला

**नागपूर, १५ फेब्रुवारी :** परीक्षा, निवडणुका तसेच मोठ्या प्रमाणात होणाऱ्या कार्यक्रमांसाठी स्वयंचलित सहाय्यक सुरक्षेसाठी उपकरणे निर्माण करणाऱ्या Innovatiview India Limited या तंत्रज्ञान-चलित कंपनीने बाजार नियामक सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया कडे ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस दाखल केला आहे.

कंपनीने २०,०००.०० दशलक्ष पर्यंतच्या विक्रीच्या ऑफरचा समावेश असलेल्या इक्विटी शेअर्सच्या (फेस व्हॅल्यू प्रत्येकी ५) प्रारंभिक सार्वजनिक ऑफरद्वारे निधी उभारण्याची योजना आखली आहे. (एकूण ऑफर)

इनोव्हेटिव्ह्यू इंडिया लि.ने ही भारतातील परीक्षा एकात्मिक सुरक्षा उपायांमध्ये सर्वात मोठी कंपनी आहे, ज्याचा २०२४ या आर्थिक वर्षामध्ये महसुलाच्या संदर्भात बाजार वाटा ७३.७% आहे. परीक्षा सुरक्षा आणि निगराणी ठेवण्याच्या व्यवसायात तिचा बाजार हिस्सा आर्थिक वर्ष २०२४ मध्ये वार्षिक ६९.०७% इतका वाढला आहे.

रेड हेरिंग प्रॉस्पेक्टसद्वारे ऑफर केले जाणारे इक्विटी शेअर्स बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड वर सूचीबद्ध करण्याचा प्रस्ताव आहे. (सूचीचे तपशील)

DAM कॅपिटल डव्हायझर्स लिमिटेड, ICICI सिक्युरिटीज लिमिटेड, JM फायनान्शियल लिमिटेड, मोतीलाल ओसवाल इन्व्हेस्टमेंट डव्हायझर्स लिमिटेड आणि शॅनन डव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड हे या इश्यूचे बुक रनिंग लीड मॅनेजर आहेत.

## #FinanciallyEverAfter जोडप्यांना पैशाबद्दल चर्चा करण्यास प्रोत्साहित करून HDFC बँकेने व्हॅलेंटाईन्स डे साजरा केला

**नागपूर, १५ फेब्रुवारी :** व्हॅलेंटाईन्स डे च्या निमित्ताने HDFC बँक या देशातील खाजगी क्षेत्रातील आघाडीच्या बँकेने जोडप्यांना आर्थिक गोष्टींबाबत शिक्षित करण्यासाठी #FinanciallyEverAfter हे एक अनोखे अभियान सुरू केले आहे. हे अभियान जोडप्यांना दोघांनी मिळून आपले अर्थ-व्यवस्थापन करण्याची कल्पना देते, जो आजकालच्या नात्यांमधला एक महत्त्वाचा पण काहीसा दुर्लक्षित पैलू आहे.

हे अभियान जेन Z आणि तरुण मिलेनियल जोडप्यांना दोघांनी मिळून एकत्रितपणे आर्थिक बाबी हातळण्यासाठी ज्ञान आणि साधने देऊन सक्षम करण्याचा प्रयत्न करते. या बँकेने या उद्देशासाठी समर्पित https://www.moneymadeeasy.org/ ही एक मायक्रोसाइट तयार केली आहे, ज्यामध्ये एक परस्परसंवादी फायनॅनष्यली एव्हर आफ्टर क्विझ आहे, जे मजेदार आणि माहितीपूर्ण पद्धतीने जोडप्यांना त्यांच्यातील आर्थिक अनुरूपता जोखण्याची संधी देते. हे क्विझ आर्थिक निर्णयांच्या बाबतीतील त्यांची वृत्ती कशी आहे हे दर्शविते आणि कोणत्या बाबतीत त्यांच्यात सहमती आहे आणि कोणत्या बाबतीत मतभेद आहेत हे देखील उघड करते.

या वेबसाइटमध्ये काही माहितीपूर्ण व्हिडिओ आणि लेख देखील आहेत, जे एक जोडपे म्हणून आर्थिक व्यवस्थापन कसे करावे याचे व्यावहारिक मार्गदर्शन देतात. यामध्ये बँकेच्या फायनॅनष्यल जॉकी एफ. जे. मोनिशा यांनी संकल्पना समजावून दिल्या आहेत आणि अवघड आर्थिक संज्ञांचे अर्थ उलगडून दाखवले आहेत.

## ग्लोबल स्कूल्स ग्रूप आणि निकॉनच्या सहकार्याने जीआयआयएस नागपूरमध्ये फोटोग्राफी क्लबची सुरुवात



**नागपूर, १५ फेब्रुवारी :** द ग्लोबल स्कूल्स ग्रूपने अत्यंत अभिमानाने जीआयआयएस नागपूरमध्ये ग्लोबल स्कूल्स निकॉन स्कूल ऑफ क्रिएटिव्हिटीची सुरुवात करत असल्याची घोषणा केली आहे. जीएसजीच्या भारतातील २६ कॅम्पसमधील या प्रकारच्या पहिल्याच अत्याधुनिक फोटोग्राफी क्लबसाठी निकॉन या इमेजिंग आणि ऑप्टिक्समधील जागतिक आघाडीच्या कंपनीसोबत सहकार्य करण्यात आले आहे.

या उपक्रमाबद्दल बोलताना, नागपूर येथील ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या श्रीम. निधी गुप्ता म्हणाल्या, आमच्या विद्यार्थ्यांसाठी हा सर्जनशील उपक्रम सुरू करताना आम्हाला खूप आनंद होत आहे. निकॉनसोबत भागीदारी केल्याने आम्हाला सर्जनशीलता, कल्पनाशक्ती आणि स्वातंत्र्याला चालना देणारा एक रोमांचक शिक्षण अनुभव मिळतो. आम्हाला विश्वास आहे की हा उपक्रम विद्यार्थ्यांना त्यांच्या कलात्मक क्षमतांचा शोध घेण्यास आणि भविष्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्यास प्रेरित करेल.

जीआयआयएस नागपूर येथील नव्याने उद्घाटन झालेल्या क्लबला उत्कृष्ट कलाकार, शिल्पकार आणि डिझायनर ललित विकमशी यांच्या उपस्थितीचा लाभ मिळाला. फाइन आर्ट्स, सार्वजनिक जागेतील इन्स्टॉलेशन्स आणि नाविन्यपूर्ण मेकर स्पेसेस यातील दरी त्यांनी आपल्या कामाने सहजगत्या भरून काढली आहे. आयआयएम नागपूरसाठी केलेले शिल्प आणि भारतीय रेल्वेसाठीचा उपक्रम यासारख्या उल्लेखनीय कामांचा यात समावेश आहे. त्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणातून कला, अभियांत्रिकी आणि समुदाय-चलित सर्जनशीलतेचे मिश्रण करण्याची त्यांची सखोल आवड दिसून येते.

या नव्या उपक्रमाबद्दल निकॉन युथ अँड किड्स प्रोग्रामच्या महाव्यवस्थापक आर्या चित्रा म्हणाल्या, निकॉन युथ अँड किड्स प्रोग्राम अंतर्गत सुरू झालेल्या भारतातील पहिल्या जीएसजी कॅम्पसच्या उद्घाटनात तुम्हा सर्वांचे स्वागत करणे हा आमच्यासाठी सन्मानाचा क्षण आहे. देशभरातील फोटोग्राफीप्रेमी आणि तरुण सर्जनशील लोकांसाठी हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. शिकणे, प्रयोग करणे आणि प्रगति करणे यासाठी खास आणि समर्पित जागा देऊ करण्याच्या आमच्या ध्येयाच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणजे हे कॅम्पस. सर्व इच्छुक छायाचित्रकारांना प्रेरणादायी प्रवासासाठी शुभेच्छा! चला, या कॅम्पसला सर्जनशीलता, आवड आणि नावीन्यपूर्णतेचे केंद्र बनवूया.

जीआयआयएस नागपूर येथील ग्लोबल स्कूल्स निकॉन स्कूल ऑफ क्रिएटिव्हिटी ग्लोबल स्कूल्स ग्रुपच्या समग्र शिक्षणाप्रती असलेल्या वचनबद्धतेला अधोरेखित करते. सतत विकसित होत असलेल्या सध्याच्या जगात शिकण्यासाठी, निर्मिती करण्यासाठी आणि भरभराटीसाठी विद्यार्थ्यांना दमदार संधी येथे उपलब्ध आहेत.

## ट्रायडंटचे २०२७ पर्यंत भारतातील व्यवसायात ३ पट प्रगतीचे लक्ष्य

**नागपूर, १५ फेब्रुवारी :** ट्रायडंट ग्रूप या होम टेक्सटाइल उद्योगातील कंपनीसमूह आणि आघाडीच्या ब्रँडने आज भारत टेक्स २०२५ मध्ये २०२७ पर्यंत आपल्या भारतातील व्यवसायात तीनपट प्रगती करण्याच्या लक्ष्यासह काही महत्त्वाकांक्षी योजना सादर केल्या. या दमदार प्रगतीच्या योजनांना आर्थिक वर्ष २५-२६ मधील १००० कोटी रुपयांच्या भांडवली खर्चाचे बळ मिळणार आहे. होम टेक्सटाईल, यार्न आणि ऊर्जा व्यवसाय अशा त्यांच्या विविध विभागांमधील शाश्वतता, आधुनिकता आणि मालमत्ता वाढीसाठी हा खर्च केला जाणार आहे.



ट्रायडंट ग्रुपचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. राजिंदर गुप्ता यांनी आपला दृष्टिकोन मांडताना म्हटले की, 'ट्रायडंटमध्ये, आम्ही नवोन्मेष आणि शाश्वततेचा मेळ घालून कापड उद्योगाच्या भविष्याला नवा आकार देण्यासाठी वचनबद्ध आहोत. आधुनिकीकरण, मूल्य निर्मिती आणि जागतिक विस्तारावर लक्ष एकाग्र करणे हे आमच्या प्रगतीचे कारण आहे. भारत टेक्स २०२५ हा एक महत्त्वचा टप्पा आहे जिथे पड उद्योगातील एक पॉवरहाऊस म्हणून भारताच्या प्रचंड क्षमतेवर प्रकाश टाकला जातोय आणि या प्रवासात योगदान देत असल्याचा ट्रायडंटला अभिमान आहे. प्रगत तंत्रज्ञान, शाश्वत पद्धती आणि बाजार-चालित उपायांमध्ये गुंतवणूक करून, आम्ही केवळ आमचे नेतृत्व स्थान मजबूत करत नाही तर होम टेक्सटाइल उद्योगातील उत्कृष्टतेच्या मानकांनाची नवी व्याख्या तयार करीत आहोत'

मायट्रायडंटच्या अध्यक्षा नेहा गुप्ता बेक्टर यांनी ब्रँडच्या विस्तारावर आणि लक्झरी मार्केटमध्ये प्रवेशावर प्रकाश टाकला. त्या म्हणाल्या, 'लक्झ्युरी होम फर्निशिंग सेगमेंटमध्ये आमची उपस्थिती वाढवणारे लक्झरी होम म्हणजे मायट्रायडंटसाठी एक परिवर्तनकारी पाऊल आहे. आमच्या कारागिरी आणि उत्पादन उत्कृष्टतेच्या वारशाचा फायदा घेऊन, आम्ही भारतीय ग्राहकांसाठी जागतिक दर्जाची लक्झ्युरी आणत आहोत. आधुनिक भारतीय घरांच्या आकांक्षा पूर्ण करणाऱ्या, विचारपूर्वक डिझाइन केलेल्या, उच्च-गुणवत्तेच्या उत्पादनांसह घराच्या सुंदरतेची पुनर्परिभाषा करण्यावर आमचे लक्ष आहे. भविष्यकालीन आणि जबाबदार कापड उद्योगावरील भारत टेक्सच्या लक्ष्यांशी सुसंगत असणारे हे कलेक्शन सादर करताना आम्हाला खूप आनंद होत आहे.'

मायट्रायडंटच्या प्रगतीशील योजनांवर भाष्य करताना मायट्रायडंटचे मुख्य कार्यकारी अधिकारी रजनीश भाटिया म्हणाले, आम्ही आमचे रिटेल टच पॉइंट्स सध्याच्या ७,००० वरून १०,००० पर्यंत वाढवत आहोत. या विस्तारामुळे भारतातील एक आघाडीचे होम फर्निशिंग ब्रँड म्हणून आमचे स्थान मजबूत होईल आणि देशांतर्गत बाजारपेठेत आमचा ठसा वाढेल. पुढील वाढीसाठी, आम्ही HORECA आणि संस्थांमधील प्रमुख संधींवर लक्ष केंद्रित करत आहोत, या क्षेत्रांमध्ये आमचा बाजार हिस्सा वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवत आहोत. याव्यतिरिक्त, आम्ही कॉर्पोरेट गिफ्टिंगमधील संधी शोधत आहोत, या क्षेत्रातील अफाट क्षमतांचा वेध घेत आहोत. ग्राहकांना सेवा देण्यातील गती आणि चपळता हे ब्रँडचे मुख्य लक्ष्य आहे आणि अशा प्रकारे आम्ही सर्व प्रमुख ई-कॉमर्स आणि क्विक कॉमर्स पोर्टलशी सहयोग करत आहोत.

भारत टेक्स २०२५ मध्ये मायट्रायडंटचे स्प्रिंग समर '२५ कलेक्शन सादर झाले. या कलेक्शनची प्रेरणा भारताच्या समृद्ध कापड वारशातून घेतली आहे. या कलेक्शनमध्ये चार युगांचा प्रवास प्रतिबिंबित करण्यात आला आहे - पुराण युग, वीर युग, पूर्व आधुनिक युग आणि उन्नती युग - पारंपारिक कारागिरीला आधुनिक तंत्रे आणि नाविन्यपूर्ण साहित्यांसह एकत्रित करून कापडाच्या भविष्यासाठी एक भविष्यसूचक दृष्टिकोन तयार करण्यात आला.

## तुळजापूर भवानी मंदिराच्या जिर्णोद्धारासाठी पंधरा दिवसांत बैठक

**मुंबई (प्रतिनिधी) :** तुळजापूरच्या आई भवानी माता मंदिराच्या जिर्णोद्धारासह रायगड किल्ल्याचा विकास आणि एक पडदा चित्रपटगृहांसाठी सवलतीच्या योजनेबाबत लवकरच ठोस निर्णय घेतला जाणार आहे. यासंबंधी सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड. आशिष शेलार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. पुढील १५ दिवसांत या तिन्ही विषयांवर स्वतंत्र बैठक घेण्यात येणार आहे.

**तुळजापूर भवानी मंदिर जिर्णोद्धार**

तुळजापूरच्या भवानी माता मंदिराचा संरचनात्मक अहवाल (स्ट्रक्चरल ऑडिट) शासनास सोमवारी सादर केला जाणार आहे. मंदिराच्या दुरुस्तीचे काम करणाऱ्या दोन एजन्सींमध्ये समन्वय साधून काम वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश मंत्री शेलार यांनी दिले.

मंदिराच्या मुख्य गर्भगृहातील खांबांना तडे गेल्याने दैनंदिन पूजा, मूर्तीची देखभाल यावर काय परिणाम होईल, याबाबत अभ्यासक, पुजारी, मंदिर ट्रस्ट आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी बैठक घेऊन उपाय सुचवावेत, असे निर्देशही त्यांनी दिले. पुढील १५ दिवसांत सर्व संबंधितांशी चर्चा करून पुढील कार्यवाही ठरवली जाईल.

**रायगड किल्ला संवर्धनासाठी ६०० कोटींचा आराखडा**

रायगड विकास प्राधिकरणाने ६०० कोटी रुपयांचा कृती आराखडा तयार केला आहे. रायगड किल्ला आणि परिसराचा विकास करण्यासाठी या आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले असून याचा अभ्यास करून लवकरच संयुक्त बैठक घेण्यात येणार आहे.

## सोनी सबवरील वागले की दुनिया मालिकेत डीपफेक सापळ्यात अडकली सखी

**मुंबई, १५ फेब्रुवारी :** सोनी सबवरील वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से मालिका त्यातील वेधक कौटुंबिक क्षणांमुळे प्रेक्षकांना नेहमी आपलीशी वाटते. प्रेक्षकांनी पाहिले आहे की, विद्या (सुकन्या सुर्वे) आपल्या जुळ्या मुलांना सांभाळण्याचे आव्हान पेलताना तारेवरची कसरत करताना वंदनाकडे (परिवा प्रणती) मन मोकळे करते. पण, त्यात एक गैरसमज होतो. त्यांचे संभाषण राधिका (भारती आचरेकर)च्या कानावर पडते आणि तिला ते श्रीनिवास (अंजन श्रीवास्तव) आणि तिच्याबद्दल आहे असेच वाटते. त्यामुळे वागले कुटुंबात एक भावनिक उलथापालथ होते. या गोंधळाच्या परिणामांना हे कुटुंब तोंड देत असते, तेव्हाच एक धक्कादायक गोष्ट घडते आणि सखी (चिन्मयी साळवी) भयंकर संकटात सापडते. प्रेक्षकांच्या मनातील उत्कंठा वाढू लागते.



आगामी भागांमध्ये सखीच्या जीवनाला एक भयंकर वळण मिळते जेव्हा ती नकळतपणे एका दुष्ट सापळ्यात अडकते. आपल्या रिलेशनशिपबद्दल बोलण्यासाठी आपण विवान (नमित शाह)ला भेटायला जात आहोत असे वाटून सखी त्याने तिच्यासाठी पाठवलेली कॅब घेते आणि गाडीत बसल्यावर तिला समजते की तिचा पाठलाग करणाऱ्या एका इसमाने तिचे अपहरण केले आहे. यापेक्षा भयंकर ट्विस्ट? हा इसम विवानचा डीपफेक व्हिडिओ वापरुन तिला फसवतो. वागले कुटुंबियांना धडकी भरते. या वेळी अधिक उशीर होण्याअगोदर सखीला वाचवण्यासाठी राजेश आणि विवान यांना परस्परांतील मतभेद बाजूला ठेवून एकमेकांच्या साथीने पावले उचलण्याची वेळ येते. ते वेळेत तिच्यापर्यंत पोहोचू शकतील का आणि तिला सुरक्षित परत आणू शकतील का, की शत्रू त्याआधीच पुढचे पाऊल उचलणार?

राजेश वागलेची भूमिका करणारा सुमित राघवन म्हणतो, एक पिता म्हणून आपल्या मुलांना संकटात बघणे हे राजेशसाठी खूप क्लेशदायक आहे. जेव्हा त्याला सखीचे अपहरण झाले असल्याचे समजते, तेव्हा त्याचे संपूर्ण जग उलट-पालट होते. यात आणखी भयंकर गोष्ट ही आहे की, यामध्ये टेक्नॉलॉजीची देखील भूमिका आहे. डिजिटल जग किती भयंकर होऊ शकते हे यात दाखवले आहे. या भागात भावना, निकड आणि आपल्या मुलांच्या संरक्षणासाठी पालक किती खंबीरपणे उभे राहतात हे बघायला मिळते. हे कथानक प्रेक्षकांना नक्कीच खिळवून ठेवेल.

## राशीभविष्य

**मेष :** खराब आर्थिक स्थितीमुळे तणाव निर्माण होईल. ज्याचे घरचे लोक पुन्हा पुन्हा टोमणे मारतील. यामुळे मन अतिशय उदास होईल. सरकारी मदतीचे काही फायदे मिळू शकतात.

**वृषभ :** पैशाचे उत्पन्नाचे स्रोत वाढवण्याचा प्रयत्न करा. आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागेल. जास्त भावनिकता टाळा. वैवाहिक जीवनात एकमेकांच्या भावनांचा आदर करा.

**मिथुन :** जमीन, इमारती आणि वाहनांच्या खरेदी-विक्रीमध्ये गुंतलेल्या लोकांना फायदा होईल. तुम्हाला तुमच्या सासरच्या लोकांकडून एक मौल्यवान भेट मिळू शकते. मान-सन्मान व प्रतिष्ठा वाढेल.

**कर्क :** आज आरोग्य सुधारेल. घर आणि कौटुंबिक आरोग्याबाबत तुमची चिंता संपेल. तुम्ही तुमच्या आरोग्याबाबत खूप जागरूक आणि सावध राहाल. ज्यामुळे तुम्ही तणावमुक्त आणि निरोगी राहाल.

**सिंह :** आज आरोग्यासंबंधी किरकोळ समस्या निर्माण होतील. खाताना व्यायाम करा. विशेषत: प्रवासात आरोग्याकडे अधिक लक्ष द्या. आरोग्य लाभ मिळण्याचे संकेत आहेत.

**कन्या :** मनात सकारात्मकता राहील. राजकीय क्षेत्रातील लोकांना महत्त्वाची मोहीम मिळू शकते. प्रवासात मौल्यवान वस्तूंची काळजी घ्या. व्यवसायात जोडीदाराचे विशेष सहकार्य मिळेल.

**तुळ :** कोणत्याही महत्त्वाच्या कामातील अडथळे सरकारी अधिकाजयाच्या मदतीने दूर होतील. रस्त्यावर वाहने खराब झाल्याने समस्या उद्भवू शकतात. व्यावसायिक नियमांमुळे त्रास होईल.

**वृश्चिक :** आज व्यवसायात उत्पन्न वाढवण्याचे प्रयत्न फलदायी ठरतील. व्यवसायात नवीन करारांमुळे व्यवसायाची स्थिती सुधारेल. तुम्हाला भरपूर पैसे मिळतील. पैसा हुशारीने वापरण्याचा प्रयत्न करा

**धनु :** आज घनिष्ठ नातेसंबंधांमध्ये आनंद मिळून समाधान मिळेल. वरिष्ठ प्रिय व्यक्तीकडून तुम्हाला विशेष प्रेम आणि सहकार्य मिळेल. कोणत्याही महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर होतील.

**मकर :** सामाजिक दृष्ट्या लाभदायक परिस्थिती निर्माण होईल. आर्थिक स्थितीत मोठे चढ-उतार येतील. वडिलोपार्जित संपत्ती अचानक प्राप्त होऊ शकते. व्यवसायात उत्पन्नापेक्षा खर्च जास्त होईल.

**कुंभ :** आज घरात वादाचे वातावरण असू शकते. अनावश्यक धावपळीमुळे शारीरिक व मानसिक त्रास संभवतो. भाऊ विरोधापासून सुरक्षित राहिले. चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही बातम्या मिळू शकतात.

**मीन :** व्यवसायात उत्पन्न चांगले राहील. नोकरीत बढतीसह उत्पन्नही वाढेल. तुम्हाला एखाद्या जवळच्या मित्राकडून मौल्यवान भेट मिळू शकते. धार्मिक कार्यात आर्थिक लाभ होईल. आर्थिक स्थिती मजबूत होईल.

## शब्दकोडे क्रमांक २०३५



**आडवे शब्द :-**

१) विलंब
४) वडिलांचे वडील
६) स्त्रीलंपट पुरुष
९) शहर
१०) काम
११) मध्यस्थ
१३) विळखा
१५) एक वाद्य
१७) सांपत्तिक सामर्थ्य शक्ती
१८) वनाची शोभा, सौंदर्य
२०) एक प्रकारची दारू
२२) खोगीर, आच्छादन
२४) तरुण
२५) राजीवलोचन
२८) श्रीकृष्णाचे एक नाव
३०) नावाडी
३१) हत्ती
३२) दुलई
३३) बारीक तांदूळ
३४) मुस्लीम धार्मिक शाळा
३६) माणसाद्वारे तयार केलेले
३८) चिवचिवाट, आवाजांचा गोंधळ
४१) मनाला टोचणारे दु:ख
४४) थडगे
४६) पत्राने लिहून (कळविणे)
४८) एक चर्मवाद्य
५०) नातेवाईक
५१) चणचण
५३) फळाचे साल
५४) वाघ सिंहाची गर्जना
५६) चांगला
५७) बोडका, झाडे, झुडपे नसलेला डोंगर
५९) चीर, फट
६०) परमेश्वर
६१) वाळवंट
६२) सर्वनाश
६४) कबूतर
६५) रविवासर
६७) जिनसांची यादी
६८) आश्रय
६९) द्रव्य, देवताविशेष
७०) किरकिर, गडबड
७१) स्तुती करणारा
७२) लांबट चौकोन
७३) मऊ, मुलायम (कापड)
७४) गाय

**उभे शब्द :-**

१) सूर्याचे एक नाव
२) वर्ण ३) हवेतील थंडावा
४) चालू दिवस
५) बाल्यावस्था
६) रद्द, आऊट(क्रि)
७) छोटा
८) टपाल
१०) कागद, कापड कापण्याचे साधन
१२) हवा, वैताग
१४) दिखाऊ, वरवरचे
१६) कांतार
१७) घोषणा, वटहुकूम
१९) श्रीमान
२१) मध
२२) विजार
२३) उद्या
२६) सुसर
२७) पर्वत
२८) मला
२९) तारणारा
३०) थोडक्यात चाणक्यनीति
३२) दही घुसळण्याचे साधन
३३) रचलेले कारस्थान
३५) श्वशुर, मामंजी
३७) सत्तावीस मोत्यांची माळ
३९) भानगड, पीडा, शुक्लकाष्ठ
४०) प्रेत(हिं)
४२) कृष्णसखी
४३) निर्धन, दरिद्री
४५) फणसाचा एक प्रकार
४६) पराजय
४७) दरवाजा
४९) तडाखा, प्रहार
५०) प्रवासवर्णन
५२) संकट
५५) अंगातील जोम, मस्ती,
५७) पुढे अर्धे वाकणे
५८) गल्ली
६०) देऊळ
६१) सूर्य पुत्र यम किंवा कर्ण
६२) भयंकर, कुरूप
६३) धातूची काडी, सळई
६४) पारद
६५) आवाज, ध्वनी
६६) ठराविक रक्कम
६७) गावाखालची जमीन
६८) ऐट, दिमाख

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# भक्तिमार्ग

## लडाखमधला बौद्ध धर्म...

लेह-लडाख परिसरात बौद्ध धर्माचे अनुयायी मोठ्या संख्येने आढळतात. मोन आणि दार्द हे लडाखचे मूळ निवासी मानले जातात. विविध पुराणांमध्ये याबाबतचे उल्लेख आढळतात. पहिल्या शतकाच्या आसपास लडाख कुषाण राज्याचा भाग होता. इसवीसनातल्या दुसऱ्या शतकात बौद्ध धर्म काश्मीरमधून लडाख परिसरात पसरला. या काळात पूर्व लडाख आणि पश्चिम तिबेटमध्ये पारंपरिक बोन धर्माचं पालन होत असे. बौद्ध भिख्खू हेनसांगने सातव्याा शतकात या परिसराचा उल्लेख केलाय. आजघडीला लडाख जम्मू काश्मीर राज्याचा भाग आहे. लडाखच्या उत्तरेला काराकोरम तर दक्षिणेला हिमालय पर्वत आहे. लेह परिसरातल्या लोकांचे पूर्वज तिबेटी असून लडाखी भाषा बोलतात पण पश्चिमेला



कारगिल परिसरातले लोक मुस्लीम धर्माचे अनुयायी आहेत.

बौद्धांचे सर्वाधिक मठ लेह लडाख मध्ये आहेत. त्यामुळे या भागाला मठांचं नगर असंही म्हटलं जातं. शेय, ठिकसे, हेमिस, लामायुरू, आलुची, शांती, शंकर, स्तकन, माठो हे प्रसिद्ध बौद्ध मठ या ठिकाणी आहेत. या मठांमध्ये बौद्ध संस्कृती बहरतेय. शेय गोम्पा हे लडाखमधलं महत्त्वाचं स्थान मानलं जातं. लेहपासून १२ किलोमीटर अंतरावर शेय या ठिकाणी हा मठ आहे. १६३३ मध्ये या मठाच्या बांधकामाला सुरूवात झाली. लेहच्या दक्षिण पूर्वेकडे हेमिस गोम्पा म्हणजे बौद्ध मठ आहे. हा लडाखमधला सर्वात सुंदर बौद्ध मठ आहे. बौद्ध धर्माच्या अनुयायांसोबतच इतर धर्माचे लोकही या मठांना आवर्जुन भेटी देतात.

धर्म देशोदेशीचे

## श्रीमंत योगी

**शिवाजी महाराज हे नाव उच्चारताच नतमस्तक होत नाही असा मराठी माणूस बघायला मिळणं विरळा... भूमी सुफलाम-सुफलाम आणि परचक्रापासून बंधमुक्त करण्याचं स्वप्न पाहणाऱ्या त्यांच्या तेजस्वी डोळ्यांनी जनसामान्यांमध्ये दडलेलं क्षात्रतेज जोखलं आणि हवा मिळताच ठिणगीने आगीच्या लोळाचं रूप घ्यावं तशा पद्धतीने स्वराज्याचा हा यज्ञ चेतला. शिवजयंतीच्या निमित्ताने या लोकोत्तर राजाला विनम्र अभिवादन.**



शिवाजी महाराज या युगपरुषाची जयंती साजरी करण्यामागे केवळ उत्सवाचा आनंद लुटण हा विषय महत्त्वाचा नाही तर या विचारिक कक्षेच्या खूप पुढे जाऊन या राजाच्या, त्याच्या विचारसरणीचा, त्याच्या मोहिमंचा, धोरणीपणाचा आणि या सगळ्याच्या परिणामांचा विचार करणं गरजेचं आहे. कारण भारतभूमीत राजेरजवाडे कमी होऊन गेले अशातला भाग नाही. विलासी, जनतेला नाडणाऱ्या राजांची संख्या मोठी आहे त्याचबरोबर कल्याणकारी राजांची मांदियाळीही बरीच मोठी आहे. पण असं असताना एखादा राजा साडेतीन शतकांनंतरही जनतेच्या हृदयात सम्राट म्हणून जागा व्यापून राहतो, घराघरांमध्ये देवाच्या स्वरुपात त्याची पूजा होते तेव्हा त्याच्यातील विलक्षण गुणांचा धांडोळा घेणं गरजेचं ठरतं. शिवाजी महाराज प्रत्येक अर्थाने इतरांपेक्षा वेगळे होते. त्यांचं वेगळेपण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात नसून विचारात आहे. हा राजा मळलेली वाट, अर्थव्यवस्थेची रेखीव चौकट, प्रचलिती युद्धनिती, स्त्रीयांकडे बघण्याच्या चुकीच्या धारणा यांना लंघून बाहेर पडला म्हणूनच तो लोकोत्तर ठरला. स्वराज्याचा निर्माता ठरला. त्यांनी केलेली प्रत्येक कृती एका नव्या धारणेचा, विचारांचा, बांधणीचा, पुनर्निमितीचा आरंभ ठरला. म्हणूनच शिवाजी महाराजांच्या जयजयकार करणाऱ्या प्रत्येकाने त्यांच्या या गुणांचा अभ्यास करुन ते तत्व आचरणात आणण्याचा प्रयत्न करायला हवा.

अवघ्या १२ वर्षांचे शिवबा १६४२ मध्ये पुण्यात आले. आपल्या पित्याचं चांगलं राज्य निर्माण करण्याचं स्वप्न उरी कवटाळूनच त्यांनी आपली माता आणि पित्याच्या काही निष्ठावान कारभाऱ्यांसह पुण्यात पाऊल ठेवलं आणि हाच त्यांच्या कार्ययज्ञाचा आरंभबिंदू ठरला. पित्याने अष्टप्रधान मंडळ नेमून दिलं होतं. नीलकंठ रांजेकर, माणकोजी दहातोंडे आदींचा त्यात समावेश होता. त्यांच्या निवासाची सोय म्हणून लालमहालाची निर्मिती झाली. इथे जिजाऊने त्यांच्यावर रामाचे चारित्र्य आणि कृष्णाची रणनिती सांगून संस्कार केले. असा संघर्ष करायचा असेल तर तुलाही त्यांच्यासारखीच युद्धनिती अनुसरायला लागेल हे त्यांनी शिवरायांच्या बालमनावर बिंबवले. मावळे आणि सह्याद्री यांची साथ असल्याशिवाय तुझा संघर्ष सफल होणार नाही हेही त्यांनी निदर्शनास आणून दिलं. यातूनच शिबवांना गडकोटाच्या अभ्यासांची आणि सामान्य जनांचं सुखदु:ख जाणून घेण्याची प्रेरणा मिळाली. आदिलशाही सत्तेने शहाजीराजांच्या जहागिरीवर आक्रमण करुन ती बेचिराख केली. आधी गाढवाचा नांगर फिरवलेल्या या भूमीवर जिजाऊने बारा वर्षाच्या शिवबांच्या हस्ते सोन्याचा नांगर फिरवला आणि एका सुवर्णकाळाचा आरंभ झाला. एकाअर्थी ही भूमी शापमुक्त झाली. त्याचबरोबर शिवबाने यवनांनी उद्ध्वस्त केलेल्या कसबा गणपती मंदिराचं जीर्णोद्धार केला. अशा प्रकारे एका नव्या युगाला, आरंभाला गणेशाचे आशीर्वाद मिळाले. दुसरीकडे शिवबांनी उद्ध्वस्त जहागिरीची पुनर्रचना करण्यास सुरुवात केली. त्यांनी देशमुख-देशपांडे या वतनदारांच्या माध्यमातून रयतेशी संपर्क साधला आणि पुनर्वसाहतीसाठी नागरिकांचं सहकार्य मागितलं. पण जनता अस्मानी आणि सुलतानी संकटाने ग्रासलेली होती. त्यांच्याकडे घालायला कपडा, पोटाला घास, दावणीला बैल आणि राहण्यासाठी निवारा नव्हता. जमीन पडीक पडली होती. ही विदारक अवस्था जाणल्यानंतर शिवबाने प्रत्येकाला गरज असेल ती मदत करण्याचं जाहीर केलं. अवजारं नसतील त्यांना अवजारं दिली, अन्नाचा घास नसणाऱ्यांना खंडी दोन खंडी धान्य दिलं, शेतीच्या कामासाठी बैल नसणाऱ्यांनी ती मदत देऊ केली. अशा प्रकारे त्यांनी रयतेची मूलभूत प्रश्नांपासून सुटका केली. एवढंच करुन ते थांबले नाहीत तर जो शेतकरी पडीक जमीन लागवडीखाली आणेल त्याला पाच वर्षे सारा माफ केला. सतराव्या शतकात अशा प्रकारे करमुक्त व्यवस्था निर्माण करुन शिवबाने पडीक पडलेली जमीन लागवडीखाली आणून कृषीप्रधान देश बनवण्याचा एक आरंभ केला. म्हणजेच त्याच्या प्रयत्नाने एके काळचा सुवर्णभारत नव्याने उदयाला येण्याची आशा निर्माण झाली. इथे त्यांची आपल्या भूमीला सुजलाम् सुफलाम् करण्याची दूरदृष्टी दिसून येते. अशा प्रकारचा भारतातील हा पहिलाच प्रयत्न म्हणता येईल. म्हणूनच महाराज स्वराज्याबरोबरच सुराज्याचे पुरस्कर्ते ठरतात.

अशा प्रकारे आवाहन केल्यावर लोकांचा पोटाचा, अवजाराचा, बी-बियाणांचा, निवाऱ्याचा प्रश्न मिटला. त्यामुळे सगळे राजांच्या मागे एकजुटीने उभे राहिले. पण हे करताना महसूल वाढवण्यासाठी राजांनी आणखी एक परिणामकारक उपाय योजला. त्यांनी आदिलशाही सत्ता, निजामशाही आणि मुघल यांची सत्ता आकारात असणारा साठ टक्के कर ३३ टक्क्यावर आणला. अर्थातच हा सारा सुपीक जमिनीसाठी होता. म्हणजेच आजच्या भाषेत बोलायचं तर कराचं प्रमाण निम्म्यावर आलं. साहजिकच या निर्णयामुळे शहाजी राजांच्या जहागिरीतला शेतकरी कामाला जुंपला. पहिल्यावर्षी दहा टक्के, दुसऱ्या वर्षी दहा टक्के असं करत करत पाचव्या वर्षांपर्यंत शहाजीराजांच्या जहागिरीतली शंभर टक्के भूमी लागवडीखाली आली. शिवाजी महाराज पुणे प्रांतात येण्याआधी या जहागिरीतील केवळ चाळीस टक्के भूमी लागवडीखाली होती ती अवघ्या पाच वर्षात शंभर टक्क्यांपर्यंत पोहचली. अर्थातच या सगळ्या निर्णयामागे शिवाजी महाराजांना मातेबरोबरच दादोजी कोंडदेव, बाजी पासलकर, कान्होजी जेधे या जाणकारांचं मार्गदर्शन होतं. या मार्गदर्शनाच्या बळावरच शिवाजी नावाच्या प्रभूरामचंद्राने निर्माण केलेलं हे स्वराज्य, त्यातील सुख पाहून जनतेच्या मनात साहजिकच उन्नत विचार उत्पन्न झाले. शिवाजी राजाने आपला विचार करुन निर्माण केलेलं हे साम्राज्य शाश्वत टिकवायचं हा विचार प्रत्येकाच्या मनात बळावला आणि हे सुराज्य टिकवायचं तर शिवाजी टिकला पाहिजे, शिवाजीचं रक्षण झालं पाहिजे हा विचार सामान्यातली सामान्य मनापर्यंत पोहचला. ही भूमिका दुसरी कुठली नसून राष्ट्रवादाची आहे. हे राष्ट्र माझं आणि मी या राष्ट्राचा या विचाराची पायाभरणी कदाचित याच आरंभपर्वाचा अंश असेल.

भक्ती लेख

एकदा ही राष्ट्रवादाची भूमिका उत्पन्न झाली की सुराज्याचं रक्षण ही बाब अवघड रहात नाही. हेच शिवरायांच्या स्वराज्याबद्दल घडलं. हे स्वराज्य टिकवण्यासाठी केवळ सैनिकच नव्हे तर कष्टकरी, कारागीर, बारा बलुतेदार सगळेच कामाला लागले आणि राज्याच्या रक्षणाला सिद्ध झाले. मग शिवाजी महाराजांनी गवंड्यांना सांगितलं 'आपल्याला गडकोट उभे करायचे आहेत.' त्यानुसार गवंडी कामाला लागले. सुतारांना त्यांच्या योग्यतेचं काम मिळालं. अशा प्रकारे प्रत्येकाच्या हाताला काही ना काही काम मिळालं. मुख्य म्हणजे प्रत्येक जण सुराज्याशी जोडला गेला. या अद्वैतामुळेच सामान्य शेतकऱ्याच्या जन्मलेला तानाजी मालुसरेसारखा माणुस आपल्या पोटच्या मुलाचं लग्न बाजूला ठेवून सुराज्याच्या कामासाठी पुढे सरसावला. बाजीप्रभू देशपांडे यांचे उदाहरण यापेक्षा वेगळं नाही. सुराज्य राखण्याच्या कामी आलेले हे हिरे शिवरायांच्या मुशीत घडले होते. ते सगळेजण राष्ट्रीयत्वाच्या भावनेने प्रेरित झालेले होते. माणसं जन्माला घालणं आणि घडवणं या दोन पूर्णत: भिन्न बाबी आहेत. शिवरायांनी माणसं घडवण्याचं काम केलं. त्यांचं हेच कसब सामान्यातल्या असामान्यांना जन्म देऊन गेलं. शिवरायांनी अतिशय माफक क्षमतेनिशी बलाढ्य शत्रूशी दोन हात करण्याची नवी युद्धनिती आखली. आज हाच गनिमी कावा रणनितीतील एक महत्त्वाचा भाग म्हणून अभ्यासला जातो. तो काळ शत्रू पक्षातील स्त्रियांकडे उपभोग्यवस्तू म्हणून बघण्याचा होता. विजय मिळवल्यावर शत्रूच्या गोटातील मुली आणि महिलांना वाटून घेण्याचा तेव्हा शिरस्ता होता. आपल्या राज्यातील महिला, मुलींकडे बघण्याचीदेखील रासवट आणि रानटी भूमिका होती. मात्र शिवरायांनी कायमच स्त्रियांचा सन्मान केला. परस्त्रीला मातेचा दर्जा देणारा हा राजेश्वर होता. महिलांवर अत्याचाराच्या हेतूने उठणारे हात कलम करण्याचं धारिष्ट्य त्यांच्यात होतं. किल्लेदार फितूर होणार नाही याची दक्षता घेतली गेलीच, मात्र एखादा किल्लेदार फितूर असल्याची शंका आल्यास आणि खात्री पटल्यास त्याचा शिरच्छेद करुन, प्रत्येक गडावर त्याचं शिर मिरवून भीती निर्माण करण्याचा उपायही त्यांनी योजला. पण त्याचवेळी गावकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही स्पर्श न करण्याची ताकीद देणारा हा राजा होता. म्हणजेच शिवरायांनी एका वेळी अनेक व्यवधाने पाळली. आरमार उभारणी, शत्रुचा बंदोबस्त, शत्रूच्या युद्धनितीची नेमका अभ्यास, शत्रू गाफील असल्याचं पाहून नेमकी वेळ साधणं, अतिशय शांत डोक्याने शत्रुला पराजित करण्याची रणनिती आखणं आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे जगभर रुढ असणाऱ्या सरंजामशाही पद्धतीला बाद करणं या सर्वाचा आरंभ शिवाजी महाराजांपासूनच होतो. म्हणूनच काही जण शिवरायांमध्ये शिवाचा अंश शोधतात तर काहीजण त्यांना विष्णूरुप मानतात. या लोकोत्तर राजामध्ये या दोन्ही देवतांची तत्त्वं समरस झाली आहेत. म्हणूनच त्यांना देवत्त्व मिळालं आहे.



## महत्त्व चारधाम यात्रेचं...

हिंदू धर्मात विविध यात्रांना खूप महत्त्व आहे. अमरनाथ यात्रा, नर्मदा परिक्रमा, कैलास मानसरोवर अशा यात्रा केल्या जातात. चार धामांच्या यात्रेलाही खूप महत्त व आहे. उत्तराखंड राज्यातल्या गंगोत्री, यमुनोत्री, बद्रीनाथ आणि केदारनाथ या स्थानांच्या यात्रेला चार धाम यात्रा असं म्हटलं जातं. चार धाम यात्रेमुळे पापांपासून मुक्ती मिळतेच शिवाय जन्म आणि मृत्यूच्या चक्रातूनही जीवाची सुटका होते, असं म्हटलं जातं. या चारही धामांना पवित्र मानलं गेलंय. हिंदू धर्मग्रंथांमध्येही या स्थानांचा उल्लेख आढळतो.

या स्थानी आलेली प्रत्येक व्यक्ती पुण्यवान असते, अशा लोकांची या जन्मतली पापं धुतली जातात. तसंच हे जीव जन्म-मृत्यूच्या बंधनातूनही कायमचे मुक्त होतात, असा उल्लेख धर्मग्रंथांमध्ये आढळतो. या स्थानी पृथ्वी आणि स्वर्ग एकाच ठिकाणी येतात, असं मानलं जातं. या स्थानी आल्यानंतर यमुनोत्री आणि गंगोत्री या स्थानांचं सर्वात आधी दर्शन घेतलं जातं. इथल्या पवित्र जलाने केदारनाथाचा अभिषेक केला जातो. या यात्रेत सर्वप्रथम हरिद्वार मग ऋषीकेश, देव प्रयाग, टिहरी, धरासु, यमुनोत्री, उत्तरकाशी, गंगोत्री, त्रियुगनारायण, गौरीकुंड आणि अखेरीस केदारनाथाचं दर्शन केलं जातं.

तीर्थक्षेत्र

यात्रेचा हा मार्ग अत्यंत पवित्र मानला जातो. केदारनाथला जाण्यासाठी वेगळा मार्ग घ्यावा लागतो. ऋषीकेशहून देवप्रयाग, श्रीनगर, रूद्रप्रयाग, अगस्तमुनी, गुप्तकाशी आणि गौरीकुंड यांचं दर्शन केल्यानंतर केदारनाथला पोहोचता येतं. केदारनाथजवळच मंदाकिनी नदीचं उगम स्थान आहे. ही नदी रूद्रप्रयाग येथे अलकनंदा नदीत जाऊन मिळते.

## फेंगशुई शास्त्रातून...

**भारतीय वास्तूशास्त्रासोबतच फेंगशुई शास्त्राचा वापरही वाढतच चाललाय. फेंग म्हणजे वायू आणि शुई म्हणजे जल. याचाच अर्थ फेंगशुई शास्त्र वायू आणि जल या तत्त्वांवर आधारलंय. फेंगशुई शास्त्राचा वापर अत्यंत सोपा आहे. त्यामुळे त्याचा अवलंब मोठ्या प्रमाणावर केला जातोय. घरात सुख, शांती आणि समृद्धी आणण्यासाठी तुम्हाला या टिप्सची मदत घेता येईल.**

घराच्या पूर्वोत्तर दिशेला कारंजं किंवा तलाव असणं शुभ मानलं जातं पण यातल्या पाण्याचा प्रवाह घराच्या दिशेने असणं गरजेचं आहे.

* फेंगशुई शास्त्रात ड्रॅगनला खूप महत्त्व आहे. ड्रॅगन हा घराचा रक्षक असतो. त्यामुळे घरात ड्रॅगनची मूर्ती ठेवण्याविषयी सांगण्यात आलंय.

* फेंगशुई शास्त्रात कॉस्मिक ब्रेथ किंवा लाईफ फोर्स ऊर्जा असते. ही ऊर्जा घराच्या प्रवेशद्वारातून आत येते. म्हणूनच घराच्या प्रवेशद्वारालगत किंवा आसपास कोणतंही सामान असू नये.

* घराला नकारात्मक ऊर्जेपासून मुक्त ठेवण्यासाठी मातीच्या भांड्यात मीठ घालून हे भांडं पूर्व दिशेला ठेवा. दर चोवीस तासानंतर भांड्यातलं मीठ बदलत रहा.

* ऑफिसमधल्या कॉन्फरन्स हॉलमध्ये धातूची सुंदर मूर्ती ठेवायला हवी. यामुळे अनेक लाभ होतात.

वास्तू भक्ती

* घरात झरा, नदी यांची चित्रं उत्तर दिशेला लावावी. घरात हिंसक चित्रं लाऊ नयेत. यामुळे घरात नकारात्मक ऊर्जा प्रवेश करते.

* लव्ह बर्ड, मेंडरिन डकसारख्या पक्ष्यांच्या मूर्ती ठेवल्याने पती-पत्नींच्या आयुष्यात आनंद बहरतो.



* विंड चाईममुळे घरात सकारात्मक ऊर्जेचा वावर राहतो.

* घराबाहेर काळं कासव, लाल पक्षी, पांढरा वाघ, हिरवा ड्रॅगन असेल तर नकारात्मक ऊर्जा घरात प्रवेश करू शकत नाही.

* फेंगशुई शास्त्रात बोन्साय तसंच कॅक्टसला अशुभ माानण्यात आलंय. त्यामुळे ही झाडं घरात ठेऊ नयेत.

## सकारात्मक आयुष्याच्या दिशेने...

नवं वर्ष सुरू झालंय. नव्या वर्षात आपण अनेक संकल्प केले असतील. आयुरारोग्य उत्तम रहावं यासाठी झटायचं ठरवलं असेल. शारीरिक आरोग्यासाठी झटताना आपण मानसिक आरोग्याचाही विचार करायला हवा. प्रतिकूल परिस्थितीतही सकारात्मकतेला विसरून चालण्यासारखं नाही. सकारात्मक वृत्ती असेल तर आपण प्रत्येक संकटाला, समस्येला दूर सारू शकतो. संकटं प्रत्येकावर येत असतात. आपलं आयुष्य कधीही सरळ साधं नसतं. त्यात अनंत चढ-उतार असतात. पण विपरित परिस्थितीत डगमगणारा मनुष्य आयुष्यात सुखी होऊ शकत नाही. मानवी जीवनात मानसिकतेचं स्थान उच्च आहे. आपल्या मानसिकतेवर सर्व काही अवलंबून असतं. आपल्या आयुष्यात येणारी दु:खं, यश, अपयश, सुख हे सगळं मानसिकतेवर अवलंबून असतं. आपल्या मनात नकारात्मकता असेल तर चांगल्या गोष्टी कधीही घडू शकत नाहीत पण सकारात्मक विचारसरणीने आपण बरंच काही बदलू शकतो.



आपल्या मनात सगळं काही सामावून घेण्याची शक्ती असते. मन सर्वात शक्तीशाली मानलं जातं. मानसिकतेच्या जोरावर आपण मृत्यूलाही परतवून लाऊ शकतो. म्हणूनच मनाची शक्ती प्रचंड महत्त्वाची मानली जाते. आपल्या मानसिकतेत रोगनिवारणाची ताकदही आहे. आपलं मन कायम उदास असेल तर आयुष्यात सकारात्मकतेचा प्रवेश होऊ शकत नाही. प्रत्येक व्यक्तीची मानसिकता वेगळी असते. म्हणूनच प्रत्येकाचं नशीबही वेगळं असतं. आपण आपल्या भविष्याप्रती आशादायी असलं पाहिजे. सकारात्मक विचार केला तर आयुष्यात सकारात्मक घडेल हे कायम लक्षात ठेवा. आपल्या कामाचा आनंद घ्या. कामाप्रती निष्ठावान रहा. भविष्यात आपलं चांगलं होईल, हा विचार करत रहा. नशीब घडवणारे आपणच असतो. ही बाब कायम लक्षात ठेवा, असं स्वामी विवेकानंद यांनी सांगितलंय. कोणत्याही कामात आपण रस घेतला नाही तर फळ मिळणार नाही. आयुष्यात अपयशच येणार. त्यामुळे सकारात्मक मनोवृत्ती ठेवा आणि पुढे जा. नव्या वर्षात प्रत्येकाने हा संकल्प करायला

भक्ती आणि बोध

## खुणा अध्यात्मिक जागृतीच्या...

आपल्या प्रत्येकात एक शक्ती दडली आहे. प्रत्येकाने आध्यात्मिकदृष्ट्या जागृत होणं खूप गरजेचं आहे. आध्यात्मिक जागृतीच्या काही खुणा आहेत. या खुणा दिसत असतील तर आपली वाटचाल आध्यात्मिक जागृतीच्या दिशेने होतेय हे नक्की! या खुणांविषयी...

* आध्यात्मिक जागृती झाल्यानंतर आपल्या शरीरातले विविध अवयव दुखू लागतात. मान, खांदे आणि पाठीच्या वेदना वाढतात. तुमच्या डीएनएमध्ये बदल घडत असल्याने या वेदना जाणवू लागतात.

* कोणत्याही कारणाशिवाय आतून दु:खी असल्यासारखं वाटत राहतं. आपण आपला भूतकाळ बाहेर टाकत असल्याने दु:खाची भावना निर्माण होते.

* कोणत्याही कारणाशिवाय रडणं ही सुद्धा आध्यात्मिक उन्नतीची, जागृतीची खूण आहे. अश्रूंच्या रूपात आपली दु:खं वाहून जातात. ही खूण आरोग्यदायी आणि सकारात्मक मानली जाते. यामुळे शरीरातली नकारात्मक ऊर्जा दूर सारली जाते.

* नोकरी किंवा व्यवसायात अचानक झालेला बदल ही सुद्धा आध्यात्मिक जागृतीची खूण मानली जाते. तुमच्यात बदल झाला की आसपासची परिस्थितीही बदलते.

* कौटुंबिक नात्यांमधून आलेली विरक्ती ही अध्यात्मिक उन्नतीची खूण आहे. आधीच्या जन्मातील कर्मांमुळे तुम्हाला एक कुटुंब मिळतं. या कर्माच्या चक्रातून मुक्ती मिळाली की नात्यांचे बंध सुटू लागतात. कुटुंब आणि मित्रांपासून तुम्ही दूर जाऊ लागता.

अध्यात्म

* झोपेचं चक्र बिघडणं ही आणखी एक खूण मानली जाऊ शकते. रात्री २ ते ४ या वेळेत तुम्ही उठता. तुमच्या मनात अनेक गोष्टी सुरू असतात.

* युद्ध, मारामारीची स्वप्नं, कुणी तरी पाठलाग



करतंय असं स्वप्न पडणं ही सुद्धा आध्यात्मिक उन्नतीची लक्षणं आहेत.

* पावलं जमिनीवर ठेवता येत नाहीत किंवा आपण दोन जगांच्या मधून चालतोय अशी भावना निर्माण होणं ही सुद्धा आध्यात्मिक उन्नतीची खूण असू शकते.

* तुम्ही स्वत:शी बोलू लागता, संवाद साधता. स्वत:शी संवाद साधण्याचं प्रमाण वाढणं हे सुद्धा आध्यात्मिक जागृतीचं लक्षण आहे.

* आसपास माणसं असतानाही एकटेपणा जाणवणं हे लक्षण आध्यात्मिक उन्नतीकडे अंगुलीनिर्देश करतं.

* सगळ्या इच्छा मरणं, काहीही करावंसं न वाटणं तुम्हाला आध्यात्मिक उन्नतीकडे घेऊन जाऊ शकतं.

* तुम्हाला घरी परतण्याची ओढ लागते. पृथ्वीवरचा आपला वास संपवून खऱ्या घराची म्हणजे स्वर्गाची ओढ लागू लागते.

## वेगवेगळ्या भाषांमधील रामायण

रामायण म्हटलं की आपल्याला वाल्मिकी रामायण आठवतं. यासोबतच रामचरितमानसही आपल्याला माहित आहे. वाल्मिकी रामायण हे हिंदू धर्मातलं खूप मोठं महाकाव्य आहे. या रामायणात २४ हजार श्लोक आहेत. रामायण त्रेतायुगात घडलं असं मानलं जातं. तुलसीदासानेही रामचरितमानस हा ग्रंथ लिहिला. वाल्मिकी रामायणाप्रमाणे रामचरितमानसातही रामाचे गोडवे गाण्यात आले आहेत. यात रामाचं आयुष्य वर्णन करण्यात आलंय पण या दोन रामायणांव्यतिरिक्त इतरही रामायणं आहेत. त्याविषयी जाणून घेऊ या...

* राम अस्तित्त्वात असताना वाल्मिकी रामायण लिहिण्यात आलंय. त्यामुळे रामाविषयीचा हा सर्वात प्रामाणिक ग्रंथ मानला जातो. या ग्रंथात रामाविषयी सर्व काही आढळतं.

* तुलसीदासांनी रामचरितमानस लिहिलं. हा ग्रंथ अवधी भाषेत असून त्याचा अनुवाद विविध भाषांमध्ये झाला आहे.

* यासोबतच तमिळमध्ये कम्बन रामायण, आसाममध्ये आसामी रामायण, ओरिसामध्ये विलंका रामायण, कन्नड भाषेत पंप रामायण, काश्मीरमध्ये काश्मीरी रामायण, बंगालमध्ये रामायण पांचाली आणि मराठीत भावार्थ रामायण लोकप्रिय आहे.

जाणून घ्या

* भारतासह विविध देशांमध्येही रामायणं आहेत. मलेशियातलं हिकायत सेरीराम, थायलंडमधलं रामकियेन, नेपाळमधलं भानुभक्तकृत रामायण प्रसिद्ध आहे.

* जगभरात रामायणाशी संबंधित ग्रंथांची संख्या ३०० हून जास्त आहे. अद्भूत रामायण, अध्यात्म रामायण आणि आनंद रामायण महत्त्वाची मानली जातात. उक्त रामायणात रामकथेशी संबंधित नव्या गोष्टी कळतात.

* नेपाळ, लाओस, कंबोडिया, मलेशिया, इंडोनेशिया, बांगलादेश, भूतान, श्रीलंका, बाली, सुमात्रा, जावा, थायलंडसारख्या ठिकाणी आजही रामाचं ग्रंथरूपात अस्तित्त्व आहे. चीनमध्येही रामायण आहे. चीनी रामायणाला अनामकं जातकम आणि दशरथ कथानम असं म्हटलं जातं. चीनमधल्या रामायणातल्या पात्रांची नावं वेगळी आणि घटनाही वेगळ्या आहेत पण भारतीय संस्कृतीतल्या रामाशी याचं साधर्म्य आहे.



* मंगोलियामध्येही रामाचं महत्त्व आहे. इथल्या लामांच्या स्थानी वानरपुजेशी संबंधित पुस्तकं आाणि मूर्त्या सापडल्या आहेत.

* तिबेटमध्ये रामकथेला किंरस पुस पा असं म्हटलं जातं. इथल्या लोकांना वाल्मिकी रामायणाविषयी माहिती आहे.

# महाकुंभातील संगम जल नागपुरात

**अभिषेक सोहळ्याला सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांची उपस्थिती ■ रेशीमबाग मैदानावर भव्य अध्यात्मिक अनुभूतीचा योग**

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

प्रयागराज येथे सध्या सुरू असलेल्या महाकुंभादरम्यान त्रिवेणी संगमावर करोडो लोक पवित्र स्नानाचा लाभ घेत आहेत. पण ज्यांना तेथे जाणे शक्य नाही अशांनाही या पवित्र संगम जलाच्या दर्शनाची अनुभूती घेता यावी, या अनुषंगाने तेथील हजारो लिटर पवित्र जल नागपूर येथे आणण्यात आले आहे.

या समारंभात शनिवारी दुपारी १ वाजता महाराष्ट्राचे सांस्कृतिक मंत्री श्री आशिष शेलार सामील झाले आणि त्यांनी महाआरतीमध्ये सहभाग घेतला. शनिवारी सायंकाळी ६.३० वाजता प्रसिद्ध गायक कैलाश खेर यांच्या भक्तीसंध्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. रविवारी सकाळी १० वाजता महाआरतीमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहभागी होणार आहेत.



भाविकांना दिव्य अनुभूती मिळावी, याकरिता व्हॅल्युएबल ग्रुपच्या वतीने आयोजित आणि सत्संग फाउंडेशनच्या सहयोगाने या भव्य 'महाकुंभप्रयाग योग'मध्ये दोन्ही दिवस सांस्कृतिक कार्यक्रम, भक्ती संगीत, सत्संग, किर्तन, भजन, प्रवचन आयोजित करण्यात आले आहे.

यासोबतच महाराष्ट्रातील प्रसिद्ध ब्रम्हवृंदाद्वारे 'शिवशक्ती याग', संतांच्या पादुका व जलकुंभ अभिषेक, पवित्र जलाभिषेक असा भरगच्च कार्यक्रम भाविकांसाठी आयोजित करण्यात आला आहे. आधुनिक तंत्राच्या सहायाने उपस्थित भाविकांवर प्रयाग येथून आलेल्या पवित्र तीर्थजलाचा वर्षाव केला जात आहे. रविवारीही हा अध्यात्मिक कार्यक्रम होणार असून, भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या दिव्य स्नानाची अनुभूती घ्यावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने नरेंद्र हेटे, अमेय हेटे आणि मंजिरी हेटे यांनी केले आहे.

शनिवारी १५ फेब्रुवारी रोजी 'श्री गुरू पादुका दर्शन व संगम जल अभिषेक सोहळा' आयोजित करण्यात आला. सकाळी ८ वाजता गजानन महाराज मंदिर चौक ते रेशीमबाग मैदान या मार्गावर भव्य शोभायात्रा व पादुकांची रथयात्रा काढण्यात आली सकाळी ९ ते रात्री ९ दरम्यान भाविकांवर पवित्र जलाचा वर्षाव करण्यात आला.

यावेळी विविध अध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सत्संग फाउंडेशनचे संस्थापक व आध्यात्मिक गुरू पद्मभूषण एम यांच्या आशीर्वचनांचा लाभ भाविकांना यावेळी घेता आला.

# महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांना सीएमडी लीडरशिप पुरस्कार प्रदान

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १५ :

महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांना देशभरातील ऊर्जा कंपन्यांमधून सीएमडी लीडरशिप गटातून सर्वोत्कृष्ट अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक म्हणून शुक्रवारी मुंबईत गौरविण्यात आले.



गव्हर्नन्स नाऊ या प्रतिष्ठित नियतकालिकाने देशभरातील ऊर्जा कंपन्यांसाठी आयोजित केलेल्या वेस्टेक सिम्पोसियम अँड अवॉर्ड २०२५ सोहळ्यात हा पुरस्कार देण्यात आला. महावितरणला सायबर सुरक्षितता आणि डेटा संरक्षण, नव्या तंत्रज्ञानाचा अंगिकार आणि कौशल्य विकासासाठीचा पुढाकार या तीन प्रवर्गात सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी पुरस्कार देण्यात आले.

महावितरणला मिळालेले पुरस्कार वरिष्ठ अधिकारी दिनेश अगरवाल, अविनाश हावरे, दत्तात्रय बनसोडे, पंकज तगलपल्लीवार आणि मंगेश कोहाट यांनी स्वीकारले. यावेळी अधिकारी ब्रदर्स टेलिव्हिजन नेटवर्कच्या संचालिका कांचन अधिकारी आणि अभिनेते महेश ठाकूर उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना लोकेश चंद्र यांनी सांगितले की, महावितरणला मिळालेल्या पुरस्काराचे श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाला आणि महावितरणमध्ये काम करणाऱ्या ९० हजार कर्मचाऱ्यांना जाते. राज्यातील तीन कोटीहून अधिक घरगुती, कृषी, औद्योगिक आणि व्यावसायिक वीज ग्राहकांना सातत्यपूर्ण आणि दर्जेदार वीज पुरवठा व्हावा यासाठी महावितरण काम करत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात गेल्या अडीच वर्षात राज्यात ऊर्जा क्षेत्रात परिवर्तनासाठी केलेल्या कार्यामुळे राज्यातील वीज ग्राहकांना लाभ होत आहे तसेच आपले राज्य पर्यावरणपूरक रिन्युएबल एनर्जीच्या वापराचे उद्दीष्ट गाठणार असल्याचेही ते म्हणाले.

देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यात शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज पुरवठा करण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० राबविण्यात येत आहे. या योजनेचे काम मार्च २०१६ मध्ये पूर्ण होईल त्यावेळी कृषी क्षेत्राला संपूर्णपणे सौर ऊर्जेचा पुरवठा करण्यात येईल. या कल्पक प्रकल्पामुळे तसेच दरदृष्टीने केलेल्या किफायतशीर ऊर्जा खरेदी करारांमुळे आगामी काळात महावितरणच्या वीज खरेदी खर्चात मोठी बचत होईल व त्याचा लाभ ग्राहकांना वीजदरातील कपातीच्या स्वरुपात होईल, अशी माहिती त्यांनी दिली.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० हे महाराष्ट्राने देशासमोर निर्माण केलेले मॉडेल आहे. त्याची प्रशंसा केंद्र सरकारने केली असून इतर राज्यांना अनुकरण करण्याची सूचना केली आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या विजेच्या खर्चात मोठी बचत होणार आहे. परिणामी उद्योगांवरील वार्षिक १३,५०० कोटी रुपयांचा क्रॉस सबसिडीचा बोजा कमी होईल. उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा हटविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याचा आवर्जून उल्लेख व्यवस्थापकीय संचालक लोकेशचंद्र यांनी केला.

# सर्व वाद न्यायालयात सोडविता येत नाही...

**राष्ट्रीय विधी विद्यापीठ दीक्षांत सोहळ्यात सरन्यायाधीशांचे मत**

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :

येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाचा (एमएनएलयु) तिसरा दीक्षांत समारंभ शनिवारी विद्यापीठाच्या वर्धा मार्गावरील वारंगा परिसरात पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून न्या. संजीव खन्ना उपस्थित होते. सरन्यायाधीश खन्ना यांनी वाद संपुष्टात आणण्याबाबत मोठे विधान केले. सर्व प्रकारचे वाद मिटविण्यासाठी न्यायालय हे योग्य ठिकाण नाही, असे परखड मत न्या. खन्ना यांनी व्यक्त केले.

ज्याप्रकारे समस्यांना एका चौकटीत मोडता येत नाही, अगदी त्याच प्रकारे त्यांच्या समाधानाला एका चौकटीत ठेवता येत नाही. समस्या नवे रूप धारण करत आहे, त्यामुळे त्यांच्या निराकरणासाठी आपल्याचा लवचिक असणे आवश्यक झाले आहे. सर्व वाद न्यायालयीन खटल्यांसाठी योग्य नाही. मध्यस्थीच्या माध्यमातून समस्यांचे निराकरण यावर योग्य पर्याय आहे, असे मत सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी व्यक्त केले.

वाद संपुष्टात आणण्यासाठी मध्यस्थी हा सर्वोत्तम पर्याय आहे. यामुळे हो किंवा नाहीच्या पलीकडे जाऊन सर्जनशील उत्तरे मिळविली जाऊ शकतात. यामाध्यमातून केवळ वाद मिटत नाही तर लोकांमधील संबंध अधिक बळकट करण्यात मदत मिळते. न्यायाच्या पारंपारिक पद्धतीच्या पलीकडे जाऊन वेळेत आणि किफायतशीर न्याय मिळविण्यात मदत होईल, असे न्या. संजीव खन्ना म्हणाले.



प्रत्येक खटल्याला मानवी पैलू देखील असतात. यात कुटुंबातील संपत्तीचा वाद असो किंवा समुदायांचा मूलभूत हक्कांसाठी संघर्ष, यावर कायद्याच्या तसेच मानवी दृष्टीकोनातून उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्याचेही न्या. खन्ना यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाचे भावी सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाचे तत्कालीन न्या. विकास सिरपूरकर यांच्यामुळे नागपूरमध्ये राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या स्थापनेची संकल्पना पुढे आली. औरंगाबाद की मुंबई? या वादात नागपूरचा फायदा झाला. नागपूरचे विधी विद्यापीठाचे संकुल देशातील सर्वोत्तम विधी विद्यापीठांपैकी एक असल्याचे गौरवोद्‌गार त्यांनी काढले.

### आदिती बैसला सात पदके

दीक्षांत समारंभात आदिती बैस या विद्यार्थीनी1ने सर्वाधित सात पदके प्राप्त केली. विश्वजीत राव आणि आकांक्षा बोहरा यांना विद्यापीठ सुवर्ण पदकाने सन्मानित करण्यात आले. याशिवाय समर्थ भारद्वाज, अभिमन्यु पालीवाल, श्रुती मंडोरा, दिव्यांश निगम, ऋषिकेश पाटील, हर्षदा नंदेश्वर, प्रज्ञा संचेती, शबनम शेख आणि वंजुल सिन्हा या विद्यार्थ्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. दीक्षात समारंभात पीएचडी धारकांचाही सन्मान करण्यात आला.

## ट्रॅव्हल्सची दुचाकीला धडक
# बापलेकीचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, गोंदिया, दि. १५ :

पत्नीला माहेरी सोडून आपल्या मुलीसोबत स्वगावी (देवरी) परतणाऱ्या दुचाकी चालकाला ट्रॅव्हल्सने धडक दिल्याने घडलेल्या अपघातात दुचाकी चालक वडील व चिमुकलीच्या जागीच मृत्यू झाला .

सडक अर्जुनी तालुक्यातील खडकी बाह्मणी येथे शुक्रवारी १४ फेब्रुवारी रोजी रात्री साडेआठ ते नऊच्या सुमारास ही घटना घडली. सूरजलाल वासाके (३२) व वेदिका सूरजलाल वासाके (४) असे या घटनेतील मृतकांची नाव आहेत.

कोहमारा कडून देवरीला मोटरसायकलने वडील आणि मुलगी जात होती. पण एकेरी वाहतूक सुरू असल्यामुळे व दुसरा रस्ता खोदून ठेवल्यामुळे मोटरसायकल चालकांना कमालीचा त्रास होतो. देवरीच्या दिशेने येणारी ट्रॅव्हल्स वेगात होती. तिने मोटरसायकलला जोरदार धडक दिली. या धडकेत वडील सूरजलाल वासाके (३२) व चिमुकली वेदिका सूरजलाल वासाके (४) या दोघांचाही मृत्यू झाला. घटनेनंतर संतप्त नागरिकांनी आंदोलन केले . ट्रॅव्हल्स चालकावर गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# समृद्धीलगत ३० सूसज्ज सुविधा केंद्र

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :

समृद्धी महामार्गावर वाहनचालकांच्या सोयीसाठी स्वच्छतागृह, इंधन केंद्र, वाहन दुरुस्ती केंद्र, उपाहारगृह यांसारख्या मूलभूत सुविधांनी सज्ज एकूण ३० केंद्रे उभारण्यात येणार आहेत. या केंद्रांची निर्मिती जलदगतीने करण्यासाठी महाराष्ट्र रस्ते विकास प्राधिकरण प्रतिबद्ध आहे, अशी हमी महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी उच्च न्यायालयात दिली.

समृद्धी महामार्गावर होणाऱ्या अपघातांबाबत सामाजिक कार्यकर्ते अनिल वडपल्लीवार यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. याचिकेवर न्या. नितीन सांबरे आणि न्या.वृषाली जोशी यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान महाराष्ट्र रस्ते विकास प्राधिकरणाने न्यायालयात शपथपत्र दाखल करत महामार्गावरील प्रस्तावित सुविधांबाबत माहिती सादर केली. यावेळी महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी स्वतः प्राधिकरणाच्यावतीने बाजू मांडली. महामार्गावर प्रस्तावित ३० केंद्रांपैकी १६ केंद्रांवर सर्व सुविधा उपलब्ध राहतील. ८ केंद्रावर केवळ इंधनाची सुविधा आणि स्वच्छतागृह राहतील. सहा केंद्र भाडेतत्त्वावर विकसित केले जातील. केंद्रावर स्वच्छता ठेवण्यासाठी उपाययोजना केली जाणार असल्याचे ॲड. सराफ यांनी सांगितले.

# भानगडीमुळेच सत्तार मंत्रिपदापासून वंचित

■ वृत्तसंस्था, जालना, दि. १५ :

सिल्लोडमध्ये पाकिस्तान सारखी परिस्थिती असल्याचा आरोप भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी केला आहे. तर मंत्रिपदाच्या कार्यकाळ अब्दुल सत्तार यांनी केलेल्या भानगडी मुळेच त्यांचे मंत्री पद गेले असल्याचा दावा देखील दानवे यांनी केला आहे. यासंबंधी आपल्याकडे अनेक गोष्टींची माहिती आहे. मात्र, ही सर्व माहिती खासगीत सांगतो, असे देखील दानवे यांनी म्हटले आहे. या माध्यमातून पुन्हा एकदा भाजप विरुद्ध एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना आमदारांमध्ये असलेला सिल्लोडमधील वाद समोर आला आहे.



भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे सध्या मराठवाड्याच्या दौऱ्यावर असून त्यांच्या उपस्थितीमध्ये उद्धव ठाकरे गटाचे सुरेश बनकर यांनी भारतीय जनता पक्षात घरवापसी केली. त्यांच्या या निर्णयामुळे उद्धव ठाकरे यांना मराठवाड्यात हा पुन्हा एक मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.

उद्धव ठाकरे यांनी सुरेश बनकर यांना विधानसभा निवडणुकीत सिल्लोड विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली होती. मात्र, अब्दुल सत्तार यांचा विजय होऊन सुरेश बनकर यांचा पराभव झाला होता. त्यानंतर आता बनकर यांनी पुन्हा भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यानंतर सुरेश बनकर आणि रावसाहेब दानवे यांनी अब्दुल सत्तारांवर निशाणा साधला.

दानवे म्हणाले की, सिल्लोड मधील प्रत्येक चौकांची नावे पाहा. तेथे ना सुभाषचंद्र बोस, ना महात्मा गांधी, ना श्यामाप्रसाद मुखर्जी किंवा पंडित नेहरू यांच्या नावाचाही चौक नाही. चौकाच्या नावावरूनच सिल्लोड गावाची रचना कळते. खायचे इथले आणि गायचे दुसरीकडेच, अशी म्हणजेच पाकिस्तान सारखी परिस्थिती तेथे निर्माण झाली असल्याचा आरोप दानवे यांनी केला.

# मोबाईल कव्हर ते होम थिएटर...
# सिद्धांत देशमुखची उत्तुंग भरारी!

आठव्या, नवव्या वर्गात शिकताना शिक्षणाकडे अधिक लक्ष पुरविण्याच्या वयात त्याने व्यवसाय क्षेत्रात प्रवेश केला. अगदी सुरूवातीला मोबाईल कव्हर आणि ईयर फोन विक्रीचे दुकान सुरू करण्यापासून उभारलेला व्यवसाय आज लक्षावधीच्या उलाढालीत पोहचवला. ही किमया साधली आहे तरणाबांड सिद्धांत गजानन देशमुख याने.



**उद्योगाची यशोगाथा**

नागपूर शहरालगतच्या भरतवाडा, पारडी येथील सिद्धांत गजानन देशमुख याने कमी वयातच यशस्वी भरारी घेत तरूणांसमोर एक आदर्श ठेवला आहे.

दै. महासागरला मुलाखत देताना त्याने व्यवसायातील अनेक पैलू उलगडून दाखविले.

सिद्धांत सांगतो... हायस्कुलचे शिक्षण सुरू असले तरी आपलाही एखादा व्यवसाय असावा, असेच मनात घोळत होते. मोबाईल शॉपीचा व्यवसाय असलेल्या मालकाकडे वडील गजाननराव काम करायचे. ८ व्या वर्गात शिकत असतानाच वडिलांसोबत त्या दुकानात अनेकदा जात असे.

बाबा... आपणही असेच दुकान टाकू म्हणून वडीलांकडे हट्ट धरला. आर्थिक परिस्थिती बेताचीच. घरात पैशाची खूप अडचण होती, वडील दुसऱ्याकडे नोकरी करायचे. पैशाची जुळवाजुळव करणे दिव्यच होते. तशाही स्थितीत बाबांनी ५० हजार रुपयांची तरतूद करून दिली. वयाच्या अवघ्या १५ व्या वर्षी मी व्यवसायात पाऊल ठेवले. चाळीत भाड्याने खोली घेतली आणि मोबाईल कव्हर, ईयर फोन, ॲक्सेसरीज, डाटा केबल विक्रीचे दुकान सुरु केले.

स्वप्नील पुढे त्याच्या व्यवसायातील प्रवासाविषयी सांगतो, या सामानाच्या विक्रीची बरीच दुकाने असल्याने सुरूवातीला फारसा नफा मिळत नसे. परंतु, वस्तूंचा दर्जा, वाजवी किंमत यामुळे ग्राहकांची संख्या वाढत गेली.

त्यानंतर २०१९ मध्ये मी दुकानावर ५० हजार रुपयांचे कर्ज काढले आणि मोबाईल संलग्न साहित्याबरोबरच इतर ईलेक्ट्रानिक्स साहित्य विक्रीस ठेवले. सर्व काही सुरळीत सुरू होते, व्यवसायात वाढीस लागला होता. मात्र, पुन्हा एक समस्या उभी ठाकली. कोरोनाला सुरुवात झाली आणि दुकानाला कुलूप लावावे लागले. कोरोनाने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असले तरी, नंतरच्या काळात मी ते भरून काढले आणि स्थिरावलो आहे.

व्यवसाय आणि शिक्षण याची सांगड कशाप्रकारे घातली? या प्रश्नावर स्वप्नील म्हणतो, आठव्या वर्गापासूनच मी स्वतः मोबाईल शॉपी सांभाळत असलो तरी शिक्षणात खंड पडू दिला नाही. व्यवसाय सांभाळून मी बारावी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले . आता बी. कॉम. प्रथम वर्षाला असून, प्रथम सेमिस्टरची परीक्षा दिली आहे. शालेय शिक्षणाबरोबरच हार्डवेअर, सॉफ्टवेअरचा कोर्स केला. परिणामी, मोबाईल रिपेरिंग देखील करू लागलो. मोबाईल साहित्याची विक्री, रिपेरिंग बरोबरच आता टीव्ही, वाशिंग मशीन, अलमारी, पंखे, होम थिएटर, फ्रिज अशा जवळपास सर्वच इलेक्ट्रॉनिक वस्तू दुकानात विक्रीस ठेवल्या आहेत. ग्राहकांची मागणी आणि आवडीनिवडीनुसार रेडमी, विवो, रियलमी, ओप्पो, मोटोजी, वनप्लस, अशा सर्व प्रकारचे मोबाईल फोन विक्रीस उपलब्ध आहेत. सण, उत्सवाच्या निमित्ताने ग्राहकांना स्पेशल ऑफर देतो. त्यामुळे ग्राहकांचा प्रतिसादही उत्तम असल्याचे तो सांगतो.

आपला व्यवसाय वृद्धींगत करण्यासंदर्भात स्वप्नील प्रचंड आशावादी आहे. पुढील काही वर्षात नागपूर शहरात वेगवेगळ्या ठिकाणी ४ नवीन दुकान सुरू करण्याचा मानस असून, त्यादृष्टीने प्रयत्न सुरू केल्याचेही त्याने सांगितले.

तरुण उद्योजक म्हणून सध्याच्या तरुणांना काय सांगशिल? या प्रश्नावर स्वप्नील म्हणतो, नोकरीचा नाद सोडून छोटा मोठा व्यवसाय सुरु करा. नोकरीच्या नादात आई-वडिलांचा पैसा आणि स्वतःचा वेळ वाया घालवण्याऐवजी स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे धाडस करा, जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिकपणा कायम ठेवा, मेहनत करण्यास नाही म्हणू नका... बघा, यश तुमच्या पायावर लोळण घेईल.

------------
■ प्रेमानंद हटवार
------------

## ठाकरेंना कोकणात धक्का भास्कर जाधव नाराज

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १५ :

उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना पक्षाचे कोकणातील एकमेव आमदार भास्कर जाधव हे सध्या नाराज असल्याचे दिसून येत आहे. माझ्या क्षमतेप्रमाणे मला काम करण्याची संधी मिळाली नाही, हे दुर्दैव असल्याचे भास्कर जाधव यांनी म्हटले आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे उद्धव ठाकरे गटात चिंता पसरली आहे.



गेल्या काही दिवसांपासून उद्धव ठाकरे गटाचे अनेक नेते त्यांना जय महाराष्ट्र करत आहेत. त्यात जाधव यांनी देखील थेट नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे ठाकरे यांना कोकणात पुन्हा मोठा धक्का बसतो का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

भास्कार जाधव म्हणाले की, माझी राजकारणाची सुरुवात झाली त्याच वेळी मला हिंदुह्रदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्यासमोर भाषण करण्याची संधी मिळाली. त्यावेळच्या शिबिरात मला हमखास भाषण करायला संधी मिळायची. त्या वेळेला शिवसेना नेते मनोहर जोशी सरांना बाळासाहेब अनेक वेळा म्हणाले की, या मुलाला महाराष्ट्रात फिरवायचे आहे, असे शिवसेनाप्रमुखांचे आशीर्वाद मला लाभले. महाराष्ट्र मध्ये मला मानणारा एक वर्ग आहे, मी लोकांशी संवाद साधतो त्यावेळी त्यात कोणताही नाटकीपणा नसतो, मला खोटे बोलण्याची सवय नाही. महाराष्ट्रातील लोकांना हे भावते. मात्र प्रत्येक वेळी माझे दुर्दैव आडवे आले आहे. मला माझ्या क्षमतेप्रमाणे काम करण्याची संधी मिळू शकली नाही, हे माझे दुर्दैव असल्याचे भास्कर जाधव म्हणाले.

भास्क जाधव यांनी गेल्या काही दिवसांपासून शिंदेसेनेचे मंत्री उदय सामंत यांची स्तुती चालविली आहे. त्यामुळे भास्कर जाधव उबाठात नाराज असल्याची आणि ते शिंदेसेनेत जाणार असल्याची चर्चा आहे.

# मृतदेह जळालेल्या अवस्थेत

**हत्या की आत्महत्या? संभ्रम कायम**

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :

दुचाकीसह जळालेल्या अवस्थेत युवकाचा मृतदेह आढळल्यामुळे खळबळ उडाली. त्या युवकाची आत्महत्या की कुणीतरी त्याचा जाळून खून केला? याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. पोलिसांनी मात्र, जळालेल्या अवस्थेत युवकाचा मृतदेह ताब्यात घेतला असून मृत्यूचे गुढ उकलण्यासाठी दोन पथके सज्ज केली आहे.

ही घटना शनिवारी खापरखेड्यातील बर्फाच्या कारखान्यासमोर उघडकीस आली. या घटनेमुळे गावात वेगवेगळ्या चर्चा असून युवकाच्या मृत्यूचे नेमके कारण काय, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आली नाही. ललीत वस्त्राने (३२) असे मृत युवकाचे नाव आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ललीत वस्त्राने हा पॉवर प्लॉटमध्ये पोकलँड वाहनाचा चालक म्हणून कार्यरत होता. त्याला दारुचे व्यसन होते. त्याने कंपनीत कुणाशीतरी वाद घातला होता. त्यामुळे त्याला कामावरुन काढून टाकण्यात आले होते. गेल्या तीन दिवसांपासून तो तणावात होता. त्यातून तो घरी पत्नीसोबत भांडण करीत तिला लहानसहान कामासाठी मारहाण करीत होता.

शुक्रवारी ललीतने पत्नीला खापरखेडा पोलीस ठाण्यात कंपनीतील कुण्यातरी अधिकारी किंवा ठेकेदाराविरुद्ध तक्रार देण्यासाठी सोबत जाण्यासाठी तयार केले होते. मात्र, पत्नीने वेळेवर पोलीस ठाण्यात जाण्यास नकार दिला. त्यामुळे तो चिडला. त्याने पत्नीला मारहाण केली. तासाभरानंतर तो दारु पिऊन घरी आला. त्याने दुचाकीची तोडफोड केली. त्याला पत्नीला विरोध केला असता पुन्हा पत्नीशी भांडण करुन घराबाहेर पडला. शनिवारी सकाळी दहा वाजता तो घरातील दुचाकी आणि एक पिशवी घेऊन बाहेर पडला. तो थेट दुचाकी घेऊन खापरखेड्यातील बर्फाच्या कारखान्याच्या दिशेने निघून गेला.

**दुचाकीच्या पेट्रोल टँकला लावली आग**

ललीतने दुचाकी बर्फ कारखान्यासमोर उभी केली. दुचाकीची टँक उघडली आणि माचिसची काडी लावून दुचाकीला आग लावली. काही वेळातच गाडीचा मोठा भडका उडाला. काही मिनिटातच दुचाकी आणि ललीतचा कोळसा झाला. ही घटना तेथील एका कंपनीच्या सुरक्षारक्षकाच्या लक्षात आली. त्याने लगेच घटनास्थळाकडे धाव घेतली. त्यावेळी ललीत हा जळत असताना त्या सुरक्षारक्षकाला दिसला.

**घटना सीसीटीव्हीत कैद**

खापरखेड्यातील एपी भारत कंपनीच्या प्रवेशद्वारावर लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात हे जळीतकांड कैद झाले. त्यामुळे खापरखेडा पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज जप्त केले. फुटेजममध्ये ललीत एकटात दुचाकी घेऊन घटनास्थळाकडे जाताना दिसत आहे. ललीत वस्त्राने याचा जळालेल्या अवस्थेत मृतदेह आढळला. प्राथमिक अहवालावरुन आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत, अशी प्रतिक्रिया खापरखेड्याचे ठाणेदार अरविंदकुमार कतलाम यांनी दिली.

# जेईई मेन्स परीक्षेत नारायणा कोचिंग सेंटरचे घवघवीत यश

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

नारायणा कोचिंग सेंटर, नागपूरने जेईई मेन्स २०२५ परीक्षेत उत्कृष्ट यश मिळवले आहे. अनेक विद्यार्थ्यांनी ९९+ पर्सेंटाइल आणि त्याहून अधिक स्कोअर केले आहेत.

नारायणा ग्रुपकडून बाणी ब्रता मजीने ३०० पैकी ३०० चा परफेक्ट स्कोर मिळवला, ज्यामुळे त्यांना १०० पर्सेंटाईल मिळाले. नारायणा ग्रुपच्या ५ विद्यार्थ्यांनी १०० पर्सेंटाईल मिळवले आहे. नारायणाने जेईई मेन्स परीक्षेत ८ राज्य टॉपर्स तयार केलेत.



नारायणा कोचिंग नागपूर शाखेचे एकलव्य सिंह, निखिल कुमार कुंवर, अर्णव एस विटंकर व वेदांत उरकुडे या ४ विद्यार्थ्यांनी ९९+ पर्सेंटाइल, १२ विद्यार्थ्यांनी ९८+ पर्सेंटाइल, २० विद्यार्थ्यांनी ९७+ पर्सेंटाइल स्कोअर मिळवला. विद्यार्थ्यांच्या या यशाचा अभिमान असल्याचे नारायणा कोचिंग नागपूरचे केंद्र प्रमुख श्रीराम पांडे यांनी सांगितले. अथक परीश्रम, समर्पण आणि अद्वितीय शिक्षण पद्धतीचा हा परिणाम असून, नारायणाच्या हैदराबाद शैक्षणिक प्रणालीद्वारे वैयक्तिक लक्ष केंद्रित करून दिल्याचे ते म्हणाले. पालकांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.